# हाकारा






वर्ष : सहावे । अंक : पहिला । जानेवारी-मार्च १९८५

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

मार्गदर्शक : प्रा. गं. बा. सरदार

## कार्यकारी मंडळ :–

अध्यक्ष : जनार्दन वळवी
उपाध्यक्ष : शरद कुलकर्णी
चिटणीस : रा. के. मुटाटकर
सहचिटणीस : लक्ष्मण कुलकर्णी
खजिनदार : बाबुल पठाण
सभासद : विजय भानू
गोविंद गारे
सुधीर जोग
छायाताई सुरतवंती
सुरेखा दळवी
एकनाथ बावनकर


## यांच्या सहकार्याबद्दल परिषद आभारी आहे

१. महाराष्ट्र साहित्य संस्कृती मंडळ.
२. शिक्षण व युवक कल्याण मंत्रालय, भारत सरकार.
३. भारतीय सामाजिकशास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केन्द्र.
४. आदिवासी कल्याण संचलनालय, महाराष्ट्र शासन.
५. वनविकास महामंडळ, महाराष्ट्र.
६. कम्युनिटी एड अब्रॉड, ऑस्ट्रेलिया.

वर्ष सहावे / अंक पहिला
जानेवारी–मार्च १९८५

**संपादक मंडळ :**
शरद कुलकर्णी
राजाभाऊ राजगडकर

**संपादक :**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक :**
सुषमा सोनक

**संपादन साहाय्य :**
रमाकांत पाटील

**मुखपृष्ठ :**
मिलन खानोलकर

**निर्मिती/व्यवस्थापन :**
विजय लेले
परफेक्ट कम्युनिकेशन सर्व्हिसेस,
१ मानसी, पत्रकारनगर, पुणे १६.
फोन : ५०६७२

परिषद/हाकारा संयुक्त
वार्षिक वर्गणी : २० रुपये
एका अंकाची किंमत : ४ रुपये

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**
रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४/३ आनंद पार्क, औंध,
पुणे ४११ ००७.

**प्रकाशक :**
प्रा. रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांनी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेसाठी सहकार मुद्रणालय, ५४० गणेश पेठ, पुणे २ येथे छापून प्रसिद्ध केले.

**कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता ।**

# हाकारा

## ( महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक )

## * अनुक्रमणिका *

| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | २ |
| २) | महाराष्ट्रातील प्रतिशोधात्मक चळवळी<br>– शरद कुलकर्णी | ३ |
| ३) | किसानसभा– आर्थिक मागण्यांचा गाभा | ६ |
| ४) | कष्टकरी संघटना– सतत संघर्षाची भूमिका | ९ |
| ५) | जागृत आदिवासी संघटना<br>– डॉ. सतीश गोगुलवार | १५ |
| ६) | जागृत भाऊबंदी संघटना— संस्थेकडून संघटनेकडे<br>–प्रदीप गायकवाड | १८ |
| ७) | श्रमिक क्रांति संघटना | २० |
| ८) | इंदरवेलीचे जागृत आदिवासी<br>– डॉ. सौ. शैलजा देवगावकर | २३ |
| ९) | आदिवासी संघटना– चर्चासत्र<br>– रमाकांत पाटील | २५ |
| १०) | सातवी पंचवार्षिक योजना व स्वयंसेवी संस्था | ३० |
| ११) | आदिवासी संघटना चर्चासत्र– सहभागी | ३१ |
| १२) | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे कार्य | ३२ |
| १३) | आदिवासी परंपरा जपाव्या<br>– गीता साने | ३३ |
| १४) | भेटलेल्या कविता<br>– भुजंग मेश्राम | ३५ |
| १५) | भूमिसेना चळवळीचे अभ्यासपूर्ण विवेचन<br>– सुधीर जोग | ३७ |
| १६) | बंद दरवाजा मासिक – स्वागत | ४५ |
| १७) | संस्था परिचय— जाणीव संघटना | ४७ |
| १८) | भटक्या विमुक्त जाती संघटनेचे ठराव | ५० |
| १९) | संवाद | ५२ |
| २०) | हाकारा– लेखनसूची जानेवारी-डिसेंबर १९८४ | ५३ |

संपादकीय

# आदिवासी संघटना

समाजात परिवर्तन कसं घडतं व का घडतं हा सामाजिक शास्त्राच्या अध्ययनाचा विषय आहे. त्याबाबत बरेच सिद्धांत मांडण्यात येतात. शेतीविषयक तंत्रज्ञानातील प्रगती, खनिजांचा वापर, शहरीकरण, शिक्षणाचा प्रसार, राजकीय व राष्ट्रीय पातळीवर संघटनात्मक बदल, इत्यादी अनेक कारणांमुळे सामाजिक–सांस्कृतिक परिवर्तन घडत असतं. प्रत्येक पातळीवर नेतृत्वाचा परिवर्तन घडविण्यातील वाटा महत्त्वाचा असतो. महाराष्ट्रात ज्ञानेश्वर, तुकारामा–पासून रानडे, टिळक, गोखले, विठ्ठल रामजी शिंदे, महात्मा फुले, बाबासाहेब आंबेडकर इत्यादी नावे समाज परिवर्तनाच्या संदर्भात घेतली जातात. आदिवासीत गोंड–भिल्लांची राज्ये होती. ती का, केव्हा व कशी लोप पावली याबद्दल फारसा पुरावा नाही किंवा त्या दृष्टीने प्रयत्न झाले नाही. वेगवेगळ्या आदिवासी जमातींबाबत वर्णनात्मक पुस्तके मानवशास्त्रज्ञांनी लिहिली पण त्यात त्यांच्या ऐतिहासिक आलेखाचे योग्य प्रतिबिंब नाही.

दलित हिंदूंच्या जातीसंस्थेतील एक अविभाज्य घटक, प्रत्येक गावकुसात त्यांची वस्ती, त्यामुळे त्यांची संघटना, चळवळ ही सुद्धा राज्यपातळीवर, देशपातळीवर होऊ शकली. आदिवासी अलग पडल्यामुळे जिल्हा, तालुका पातळीच्या वर एकत्र येऊ शकले नाहीत. स्थानिक पातळीवर आदिवासींना गुलामहाराज, अंबरसिंगमहाराज, नारायणसिंग उइके असे स्थानिक नेतृत्व लाभले व त्यांच्या विचारांनी सामाजिक-सांस्कृतिक परिवर्तनाला ओघ आला. धुळे जिल्ह्यातील डोंगराळ भागात जनार्दन महाराजांनी शिक्षणप्रसाराचे भरीव कार्य केले तसेच भिसे गुरुजींनी ठाणे भागात रचनात्मक कार्यक्रम राबविले. बाहेरून येऊन गोदुताईंनी किनार–पट्टीतील वारल्यांना जागं केलं. ताराबाई मोडक, अनुताई वाघ यांनी बालवाड्यांच्या द्वारे आधुनिक शिक्षणाचा पाया घातला. या सर्व उपक्रमांची माहिती, अभ्यास व्हावा तसा झालेला नाही.

'हाकारा'च्या या अंकात अशा प्रकारचे ऐतिहासिक व समकालिन चित्र पुढे आणण्याचा पहिलावहिलाच प्रयत्न केला आहे. आदिवासींची अस्मिता जागृत करण्यासाठी व फुलविण्यासाठी त्यांचा स्थानिक इतिहास, स्थानिक नेतृत्व यांची जाण राखावयास हवी. स्थानिक प्रयोगांचे मूल्यमापन व्हावयास हवे. राष्ट्राच्या प्रवाहात आदिवासींची अस्मिता टिकवून त्यांचे अभंगपण विलीन व्हावे असं नेहमी म्हटलं जातं. परंतु एकंदर कायदे, आर्थिक संघटन, प्रशासन यांचा रोख पाहिला तर मुख्य, प्रवाहातील वरच्या वर्गाची मिरासदारी टिकविण्यासाठी भांडवलदारी बळकट होण्यासाठी गरीब बिचारे आदिवासी मजूर कामाला येतात. आदिवासींचे आर्थिक, सामाजिक शोषण थांबविण्यासाठी त्यांच्या चळवळी कराव्यात, चळवळीसाठी संघटना उभाराव्यात, संघटनांद्वारे त्यांच्या संस्कृतीतील अंधश्रद्धा दूर कराव्यात असे प्रयत्न अलीकडे बऱ्याच प्रमाणात चालू आहेत. या संघटना बांधण्यात स्वयंसेवी संस्थांचा मोठा वाटा आहे. सगळ्याच स्वयंसेवी संस्था पूर्वनियोजित कार्यक्रम ठरवून उदयाला येतात असं नाही. दारू, स्त्री, लग्नगडीसंबंधी प्रश्न तसेच जमिनीचे हस्तांतरण, जंगलखात्याशी संबंध, व्यापाऱ्यांकडून होणारी पिळवणूक थांबविणे इत्यादी अनेक प्रश्न घेऊन भावी संघटना बांधल्या जात आहेत. त्यांचे अनुभव मोलाचे आहेत. संघटनांची नावे बघितली तरी काही आदिवासी नाव धारण करून तर काही वर्गाचे प्रतिनिधित्व करीत आहेत. जसे भूमिसेना, कष्टकरी, गरीब डोंगरी संघटना किंवा जागृत आदिवासी, जागृत भाऊबंदी, आदिवासी जाणीव जागृती केंद्र इ.

सर्व शोषितांनी एकत्र येऊन संघर्ष करावा हा विचार स्तुत्यच आहे. परंतु त्यास कालावधी लोटावा लागेल. इतिहासाच्या गर्भातून ज्या समस्या निर्माण झाल्या त्या सुट्या सुट्याही समजाव्या लागतील. सामान्य माणसाला तोच व्यवहार समजतो. या पार्श्वभूमीवर आदिवासींच्या बरोबरीने भटके, विमुक्त व इतर दलित यांचे प्रश्न कार्यकर्त्यांनी जाणून घेणे आवश्यक आहे. लक्ष्मण माने यांनी बंद दरवाजा हे मासिक प्रकाशित करून महाराष्ट्र संस्कृतीच्या एका कोंडकचाट्याला तोंड फोडले आहे. बंद दरवाजाचे 'हाकारा'तर्फे मन:पूर्वक स्वागत व अभिनंदन ! कार्यकर्त्यांच्या प्रबोधनास बंद दरवाजाने बरीच मदत होईल याबद्दल आम्हाला विश्वास वाटतो.

आदिवासी संघटनाविषयक हाकाराच्या अंकाबद्दल प्रतिक्रिया व सूचना वाचकांनी पाठवाव्या, त्याचे स्वागत होईल.

०००

# महाराष्ट्रातील प्रतिरोधात्मक चळवळी

□ श्री. शरद कुलकर्णी

**स्वातंत्र्य चळवळी**

स्वातंत्र्य प्राप्तीपूर्वी महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही झालेल्या आदिवासींच्या चळवळीत एक समान सूत्र होते. ह्या चळवळी बंडाच्या स्वरूपाच्या होत्या व ही बंडे प्रामुख्याने सावकारांचे जुलूम व जमिनींचे हस्तांतर ह्या विरुद्धची होती. सावकारांचा अन्याय आदिवासी सहन करीत आणि अशा अन्यायाची परिसीमा झाली की त्याविरुद्ध एखाद्या आदिवासी नेत्याच्या प्रोत्साहनाने बंड करीत. साहजिकच सरकारशी संघर्ष होई व शेवटी बंडाचा बिमोड होई. अशी अनेक बंडे त्या काळात महाराष्ट्रात झाली.

**धार्मिक चळवळी**

स्वातंत्र्यपूर्व काळात महाराष्ट्रात आदिवासींत दोन मोठ्या धार्मिक चळवळी झाल्या. त्यापैकी 'देवीची चळवळ' ही महाराष्ट्रापेक्षा गुजरातमध्ये अधिक प्रभावी ठरली. १९२० च्या सुमारास वसई भागातील मांगेला–कोळी समाजात काही बायकांच्या अंगात देवी येऊ लागली व त्यांनी लोकांना दारू व मांस वर्ज्य करावयास सांगितले. हळूहळू ही चळवळ ठाणे व नासिक जिल्ह्यातील आदिवासी भागात पसरली. देवी अंगात येण्याची एक साथच सुरू झाली. गुजरातमधील भडोच जिल्ह्यात व बडोदा संस्थानात ह्या चळवळीने अधिक उग्र स्वरूप धारण केले व आदिवासींनी पारशी कुटुंबाची कामे करण्याचे नाकारले. दारूचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर कमी झाला. बडोदा संस्थानात ह्या चळवळीला काही काळ बंदी घालण्यात आली. सन १९३० च्या सुमारास ही चळवळ ओसरू लागली. अशाच प्रकारची एक धार्मिक चळवळ 'गुल्या महाराज' नावाच्या आदिवासीने सन १९३० मध्ये धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागात सुरू केली. वारकरी समाजाशी व पुढे हिंदू गुजराथी संताशी परिचित झालेल्या ह्या अशिक्षित शेतमजुराने रोज सकाळी आरती करणे सुरू करून लोकांना दारू व मांस वर्ज्य करावयास सांगितले. गुल्या महाराजाच्या मृत्यूनंतर सन १९४० च्या सुमारास ह्या चळवळीची धुरा त्यांचा भाऊ 'रामदास महाराज' यांच्याकडे आली. जागृत आदिवासींनी पोलीस व जंगल खात्याचे कर्मचारी यांच्या अन्यायाविरुद्ध प्रतिकार करणे सुरू केले. त्यामुळे चळवळीला राजकीय स्वरूप येते असे वाटून सरकारने सामुदायिक आरतीवर बंदी घातली. रामदास महाराजांना जिल्ह्यातून हद्दपार करण्यात आले. त्यानंतर पोलीस व रामदास महाराजांच्या अनुयायांची चकमक होऊन रामदास महाराज व त्यांचे अनेक अनुयायांना अटक करण्यात आली. आदिवासींच्या चळवळीच्या संदर्भात रामदास महाराजांना पुन्हा एकदा कैद भोगावी लागली. उकाई धरणामुळे निर्वासित होणाऱ्या आदिवासींच्या पुनर्वसनासाठी त्यांनी त्यांच्या मृत्यूपर्यंत अविरत प्रयत्न केले.



ह्या दोन्ही चळवळी प्रामुख्याने धार्मिक असल्या तरी त्यांचा उद्देश आदिवासींत अस्मिता जागृत करणे हा होता व काही प्रमाणात तो निश्चित यशस्वी झाला.

**वारली चळवळ**

स्वातंत्र्यपूर्व काळात झालेल्या बंडाच्या स्वरूपाची किंवा धार्मिक स्वरूपाची नसलेली एक राजकीय–

आर्थिक चळवळ म्हणून गोदावरी परुळेकरांच्या नेतृत्वाखाली झालेल्या चळवळीचा उल्लेख करावा लागेल. किसान सभेच्या नेतृत्त्वाखाली जानेवारी १९४५ मध्ये 'टिटवाळा' येथे आदिवासींची एक मोठी परिषद होऊन आदिवासींना वेठबिगारीतून मुक्त होण्याचे तसेच गवत कापणी व शेतमजुरी यातील वेतन वाढविण्यासाठी लढण्याचे व सरकारी कर्मचाऱ्यांच्या अन्यायाला प्रतिकार करण्याचे आवाहन करण्यात आले. ह्या परिषदेनंतर अनेक छोटया-मोठया परिषदा झाल्या. सरकारने शामराव व गोदावरी परुळेकर आणि त्यांचे काही साथी यांना ठाणे जिल्हयाबाहेर तडीपार करण्याचा हुकूमही काढला. स्वातंत्र्यानंतरही ही चळवळ चालू राहिली. ह्या चळवळीच्या काळात डहाणू-तलासरी भागातील अनेक आदिवासी लग्नगडी मुक्त झाले. शेतमजुरांच्या 'लालबावटा' संघटना तयार झाल्या. मात्र ही चळवळ ठाणे जिल्हयातील डहाणू-तलासरी विभागापुरतीच मर्यादित राहिली. ती ठाणे जिल्हयाच्या इतर आदिवासी विभागात तसेच इतर जिल्हयातील आदिवासी विभागात पसरली नाही हे मान्य केले पाहिजे.

## स्वातंत्र्योत्तर चळवळी

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर झालेल्या आदिवासी चळवळी गुणात्मकदृष्टया पूर्वीच्या चळवळींपेक्षा अगदी वेगळया आहेत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदिवासींची सावकाराकडून होणारी पिळवणूक काहीशी कमी झाली. परंतु तीन प्रमुख गोष्टींविषयी आदिवासींमध्ये असंतोष निर्माण झाला. ह्या तीन गोष्टी म्हणजे आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण व जंगल जमिनीवरील अतिक्रमणे तसेच बांधील गडी ह्या होत.

## आदिवासी जमिनीचे हस्तांतरण

१९४७ नंतर व विशेषतः १९५१ मध्ये आर्थिक नियोजन सुरू झाल्यानंतर सरकारने शेती विकासावर फार मोठा खर्च केला. शेतीचे मोठया प्रमाणावर व्यापारीकरण झाले व शेतमालाच्या भावात वाढ होऊन शेतजमिनीची मागणी वाढली. दळणवळणाच्या साधनांतही खूप मोठी सुधारणा झाली. ह्या सर्वांचा एक परिणाम म्हणून आदिवासींच्या मालकीच्या शेतजमिनींचे फार मोठया प्रमाणावर हस्तांतरण होऊ लागले. हे हस्तांतरण दोन प्रकारांनी झाले. आदिवासींच्या जमिनींच्या हस्तांतरणावर काही कायदेशीर बंधने होती. परंतु ह्या कायद्यात असलेल्या अनेक पळवाटांचा फायदा घेऊन वरकरणी कायदेशीर मार्गाने आदिवासींच्या जमिनींचे हस्तांतरण झाले. त्याच बरोबर पूर्णतया बेकायदेशीररित्या देखील हस्तांतरण झाले. ह्या विरूद्ध फार मोठी चळवळ कै. अंबरसिंग सुरतवंती महाराज यांचे नेतृत्वाखाली महाराष्ट्रात सुरू झाली. त्याच सुमारास ठाणे जिल्ह्यातील पालघर विभागात श्री. काळूराम धोदडे व त्यांचे साथी यांचे नेतृत्वाखाली जमीन हस्तांतरणाविरूद्ध चळवळ झाली. ह्या दोन्ही चळवळींचे एक वैशिष्टच म्हणजे त्या आदिवासींची संघटना बांधून त्यांच्याद्वारे करण्यात आल्या. परिणामी सरकारने हस्तांतरणाला प्रतिबंध करणारे दोन कायदे केले. त्यापैकी पहिला कायदा 'महाराष्ट्र लँड रेव्हिन्यू कोड अँन्ड टेनन्सी लॉज (अमेंडमेंट अॅक्ट)' हा वटहुकूम म्हणून ६ जुलै १९७४ रोजी जाहीर झाला. ह्या कायद्याची अंमलबजावणी सर्वसाधारणपणे समाधानकारकरित्या झाली व हस्तांतरणाच्या प्रक्रियेला काही प्रमाणात तरी आळा बसला. हा कायदा प्रामुख्याने हस्तांतरणाला प्रतिबंध करणारा व बेकायदेशीररित्या हस्तांतरण झालेल्या जमिनी आदिवासींना परत मिळवून देण्यासाठी तरतुदी करणारा आहे.

दुसरा कायदा तत्कालिन कायद्यातील पळवाटांचा आधार घेऊन झालेल्या आदिवासींच्या हस्तांतरीत जमिनी त्यांना परत मिळवून देण्यासाठी करण्यात आला आहे. 'दि महाराष्ट्र रेस्टोरेशन ऑफ लँडस् टू शेडयूल्ड ट्राईब्ज अॅक्ट' हा कायदा त्यासंबंधीचे बिल संमत झाल्यानंतर तब्बल १ वर्षांनी अंमलात आला. त्यानंतर त्याविरूद्ध प्रथम मुंबई उच्च न्यायालयात व नंतर सर्वोच्च न्यायालयात स्थगिती आदेश मिळविण्यात आले. नुकताच म्हणजे डिसेंबर १९८४ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने हा कायदा घटनात्मकदृष्टया वैध आहे असा निकाल दिला आहे.

## जंगल जमिनींचा प्रश्न

आदिवासींच्या जमिनींचे मोठया प्रमाणावर हस्तांतरण झाल्यामुळे अनेक आदिवासी कुटुंबांनी जंगल जमिनी साफ करून त्या कसणे सुरू केले. ह्यापैकी

बरीचशी अतिक्रमणे सरकारी कर्मचाऱ्यांच्या संगनमताने झाली. मात्र वेळोवेळी आदिवासींना ह्या जमिनींवरून हुसकावून लावणे, उभी पिके नष्ट करणे ह्यासारख्या गोष्टी सरकारकडून झाल्या. ही अतिक्रमणे रीतसर करावीत ह्यासाठी अनेक ठिकाणी चळवळी झाल्या. पुलोद सरकारच्या काळात डिसेंबर १९७८ मध्ये अशी अतिक्रमणे रीतसर करणारा सरकारी आदेश जाहीर झाला. ह्या आदेशातील त्रुटींविरूद्ध विविध आदिवासी संघटनांनी आंदोलने सुरू केली. त्यासाठी विविध संघटनांची 'जबरन जोत आंदोलन कृती समिती' बनविण्यात आली. त्यानंतर ह्या आदेशात सुधारणा करून दुसरा आदेश सप्टेंबर १९७९ मध्ये जारी करण्यात आला. ह्या आदेशाची अंमलबजावणी व्हावी म्हणून अनेक संघटनांनी प्रयत्न केले. ही अंमलबजावणी पुरी होईपर्यंत आदिवासींना त्यांच्या जमिनींवरून हुसकावू नये म्हणून धुळे जिल्ह्यातील सत्यशोधक श्रमिक संघटनेने सर्वोच्च न्यायालयात स्थगिती मिळविली. अशाच प्रकारची स्थगिती ठाणे जिल्ह्यातही मिळाली आहे.

## बांधील गडी

आदिवासी विभागात लग्नगड्यांचे प्रमाण फार मोठे आहे. लग्नगड्यांना मुक्त करण्याची पहिली चळवळ किसान सभेने डहाणू-तलासरी विभागात १९४५-१९४८ ह्या काळांत केली. आणीबाणीच्या काळात बांधील श्रमपद्धती बेकायदा ठरविणारा कायदा केंद्र सरकारने केला. महाराष्ट्रांत बांधील श्रमपद्धती अस्तित्वात नाही अशी निखालस खोटी व बेजबाबदार भूमिका घेऊन महाराष्ट्र सरकारने ह्या कायद्याची अंमलबजावणी करण्याचे टाळले. तरीपण ह्या कायद्याची मदत घेऊन पालघर विभागातील भूमिसेनेने व वसई विभागातील श्रमजिवी संघटनेने अनेक बांधील मजूर सोडविले.

## आदिवासी संघटना

ह्या सर्व चळवळींचे वैशिष्टय म्हणजे त्या चालविण्यासाठी कायम स्वरूपाच्या व लोकांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर असणाऱ्या संघटना तयार करण्यात आल्या आहेत. आदिवासींना अन्यायाविरुद्ध संघटित करण्यासाठी त्यांच्यात जागृती निर्माण करण्यासाठी अनेक छोटे-मोठे गट प्रयत्न करीत आहेत. मात्र ह्या चळवळी केवळ प्रतिक्रियात्मक उठावाच्या होऊ नयेत म्हणून ह्या सर्व संघटना प्रयत्नशील आहेत. महाराष्ट्रांत अशा प्रकारचे ५० हून अधिक गट काम करीत असून विविध ठिकाणी आदिवासींच्या संघटना तयार झाल्या आहेत. आज ह्या संघटना प्रामुख्याने आदिवासींच्या असल्या तरीही ह्या संघटना सर्व गरीब, आदिवासी, बिगर आदिवासींच्या असाव्यात असा दृष्टिकोन आहे. अशा संघटनांच्या बांधणीत साहजिकच ग्रामीण धनिक, ग्रामीण पातळीवरील सहकारी कर्मचारी व इतर हितसंबंधियांचा अडथळा येतो. तरीपण संघटना बांधण्याचे काम अनेक ठिकाणी सुरू आहे. ह्यापुढे आदिवासींच्या चळवळी केवळ प्रसंगोपात व प्रतिक्रियात्मक राहणार नसून त्या अधिक व्यापक आणि सुस्थिर पायावर चालविल्या जात आहेत हे ह्या सर्व चळवळींचे सर्वात मोठे वैशिष्टच म्हणून सांगता येईल.

**शरद कुलकर्णी**
आदिवासी जाणिव जागृती केंद्र
कोथरूड, पुणे २९

हाकाराची वार्षिक वर्गणी ऑक्टोबरच्या अंकाबरोबरच संपली. अनेकदा केवळ विस्मरणामुळे अथवा कामाच्या गडबडीमुळे नवीन वर्गणी पाठवायचे राहून जाते म्हणूनच आम्ही जुन्या सभासदांना त्या अंकाबरोबरच मनिऑर्डरचा फॉर्म भरून पाठविला होता. वर्गणीचे नूतनीकरण अद्याप बाकी आहे अशा वाचकांनी वर्गणी लवकर पाठवावी ही विनंती.

हाकारा/परिषद यांची संयुक्त वार्षिक वर्गणी फक्त वीस रुपये.

वर्गणी पाठवायचा पत्ता—

द्वारा : रा. के. मुटाटकर
६४/३ आनंद पार्क, औंध, पुणे ४११ ००७.

# किसानसभा : आर्थिक मागण्यांचा गाभा

स्वातंत्र्यपूर्व काळातली ही हकीकत ठाणे जिल्ह्यातील डहाणू व तलासरी या भागात जास्त करून वारली लोकांची वस्ती आहे. इथे सावकार, व्यापारी, श्रीमंत जमीनदार आणि खास करून जंगल कंत्राटदार या सर्वांनी मिळून आदिवासींची पिळवणूक चालवली होती. याला आळा घालण्याचा प्रयत्न काही गांधीवादी करू लागले. दारूबंदी हे देखील त्यांचं एक उद्दिष्ट होतं. त्यावेळेस मुंबई राज्यात काँग्रेस सरकार होतं. त्याचे मुख्यमंत्री होते बाळासाहेब खेर. त्यांनी पुढाकार घेतला अन् 'आदिवासी सेवा मंडळ' ही संस्था स्थापली.

## मुकी बिचारी कुणी हाका

याच दरम्यान श्री. शामराव परुळेकर डहाणू भागात रहायला आले. ते कम्युनिस्ट पक्षाचे आघाडीचे कार्यकर्ते होते. त्यांना सरकारनं वैद्यकीय कारणांवरून नुकतंच स्थानबद्धतेतून सोडलं होतं. इथे वारल्यांची चाऱ्हीठाव नागवणूक होत होती. ती त्यांनी आपल्या डोळ्यांनी पाहिली. या सत्रात सावकार, जमीनदार, जंगल कंत्राटदार हे सगळेच आपापले हात धुवून घेत होते. ते जी मजुरी देत ती मीठभाकरीलाही पुरेशी नसे. लग्न-गड्याची विगार तर जोरावरच होती. जंगल कंत्राटदार वारली माणसाला जनावराहून वाईट वागवत. दिवसाला बारा बारा तास राबवून घेत. वर तोंडाला पानं पुसल्यासारखे मजुरीचे दर. कुठलीही दयामाया न दाखवता ते वारली माणसांना बेदम मारहाण करीत. कधी कधी त्यांना कोळशाच्या भट्टीत फेकत. या बिगर आदिवासी सावकार, कंत्राटदारांच्या वासनेचं आयतं भक्ष्य म्हणजे आदिवासी स्त्री. वारल्यांची जमात अतिशय लीन होऊन या जोरजुलुमापुढे मान टाकून व जीवावर दगड ठेवून हे सर्व सहन करीत होती. ही सर्व दशा पाहून शामराव परुळेकरांनी ह्या दडपशाही व अन्याया-विरुद्ध आदिवासींना संघटित करायचं ठरविलं. या कामापुढे आपल्या आजारपणाची त्यांनी फारशी पर्वा केली नाही. त्यांच्या पत्नी, गोदावरीबाई परुळेकर या कम्युनिस्ट पक्षाच्या आघाडीच्या सदस्या. आपल्या इतर काही सहकाऱ्यांबरोबर त्याही संघटनेच्या कामात सामील झाल्या.

## आदिवासींची पहिली परिषद

महाराष्ट्रातील आदिवासींची पहिली परिषद किसान-सभेने ठाणे जिल्ह्यात आयोजित केली. ही परिषद टिटवाळ्याला १९४५ च्या जानेवारी महिन्यात झाली. परुळेकर पतिपत्नींनी वारल्यांना वेठबिगार तोडायचं आवाहन केलं. लाल बावटा हाती घेऊन अन्याय व दडपशाहीला धुतकारण्याचा संदेश दिला.

दुसरी परिषद उंबरगाव तालुक्यात तलासरीला झाली. (सन १९६० मध्ये मुंबई राज्याचं विभाजन झालं. तेव्हा उंबरगाव तालुक्याची विभागणी झाली. २४ खेडी मिळून तलासरी तालुका झाला. हा तालुका महाराष्ट्रात आला.) तलासरीतील जागृतीच्या या नव्या लाटेकडे अनेक आदिवासी ओढले गेले. वेठबिगार तोडणे हा किसानसभेने हाती घेतलेला पहिला कार्यक्रम. कायद्याचा बडगा होता. तरीसुद्धा सर्वत्र ही प्रथा अगदी उघडपणे सुरू होती किसानसभेच्या कार्यकर्त्यांनी आवाहन केलं अन् काही वारल्यांनीं बिगार नाकारली. जमीनमालकांना कायदा ठाऊक होता. त्यामुळे त्यांनी लगोलग प्रत्युत्तर केलं नाही. या सर्वातून काय निष्पन्न झालं? गोदावरीबाईंनी लिहिलंय की वारली लोकांचा विश्वास कमवायला हा प्रसंग फार मोलाचा ठरला. त्यांना वाटू लागलं की जमीनमालक हिच्यापुढं नांगी टाकतात म्हणजे हिच्यापाशी काही विशेष बडगा आहे. मात्र त्यांना हे कळत नव्हतं की, काय कायदा आपल्या देशात लागू आहे.

मजुरीचे दर वाढवून घेण्यासाठीही किसानसभेने सन १९४५ च्या ऑक्टोबर महिन्यात सत्याग्रह केला. या आंदोलनाच्या सुरवातीलाच ठिणगी पडली. एका सभेत पोलीसांनी गोळीबार केला व दोघे आदिवासी ठार झाले. अनेकजण जखमी झाले. आता जमीन-दारांनीही आपलं शस्त्र उगारलं. लोकांना खावटी देण्याचं त्यांनी नाकारलं. (पावसाळ्याच्या अगदी सुरवातीला जेव्हा अगदी अर्धपोटी राहण्याची वेळ येते त्यावेळेस खावटी कर्ज देतात.) यानंतर किसानसभेने वेठबिगार नष्ट करायचीच या हेतूने उंबरगाव तालुक्या-तील जरी गावी सभा बोलवली. या सभेनंतर लाल

बावटा घेऊन वारली खेडोपाडी गेले. त्यांनी जागोजागी सभा घेतल्या आणि चळवळीचे लोण अख्ख्या तालुक्यात पसरले. आता पोलीसांनी दंडुकेशाहीचा यथेच्छ प्रयोग सुरू केला. अनेक ठिकाणी गोळीबार झाला. आदिवासी कम्युनिस्टांच्या चिथावणीवरून बिगर आदिवासी जमीनमालक व व्यापारी यांच्यावर हल्ले चढवित होते असं सरकारने त्यांच्या हिंसेचं समर्थन केलं.

कॉ. शामराव, कॉ. गोदावरीबाई यांना ऑक्टोबर १९४५ पासून उंबरगाव तालुक्यातून हद्दपार करण्यात आलं. यामुळे आदिवासी अजूनच भडकले. हा हुकूम मागे घेतला जावा म्हणून वारल्यांनी अनेक जमीनदारांकडे कामाला जायचं नाकारलं. नंतर हा हुकूम मागे घेण्यात आला.

आदिवासींची सभा सन १९४६ च्या जानेवारी महिन्यात डहाणू तालुक्यातल्या महालक्ष्मी गावी झाली. इथे भाडेपट्टी देण्याच्या प्रथेविरुद्ध आंदोलन उभारायचं ठरवलं गेलं. यापैकी बहुतांश म्हणजे आदिवासींना लुबाडण्यासाठी सावकाराने अक्कलहुशारी वापरून बनविलेले खोटया हिशेबाचं जाळं. याचबरोबर किसानसभेनं गवत कापणी व जंगलकामाच्या मजुरींचे दर वाढवून मागण्यासाठी लढा द्यायचं ठरवलं. किसान सभेचा प्रभाव कमी करण्यासाठी ठाण्याच्या कलेक्टरनं गवत कापणीच्या दरात आपणहूनच वाढ जाहीर केली. किसानसभेने ज्या कामाला दरडोई रु. २–५० व रु. १-५० ची मागणी केली होती त्याला कलेक्टरने रु. १-५० व रु. १–०० असे दर जाहीर केले. आदिवासींनी हे दर नाकारले व त्यांनी संप केला. अनेक जमीनदारांना व जंगल कंत्राटदारांना किसानसभेने ठरविलेले दर मानावे लागले. सरकारने आदिवासी कार्यकर्त्यांवर खोटेनाटे आरोप ठेवून त्यांना अटक केली. काही ठिकाणच्या वारली लोकांनी अटकेला विरोध केला. तर एका पोलिस सब-इन्स्पेक्टरने डहाणू गावी दोघा वारल्यांवर चोरीचा आळ टाकून त्यांना धरलं तिथल्या आदिवासींनी एकत्र येऊन त्यांची सुटका करणं सरकारला भाग पाडलं. हे खोटेनाटे आळ करणारा मालक व त्याचा भाऊ या दोघाचंही पोलीसांशी संगनमत होतंच. ते दोघेही पोलीसांबरोबरच होते. त्यांना चोरीचा आळ मागे घेण्यास लावला. त्यांच्याकडून तसा कबुली जबाब लिहून घेण्यात आला. सब-इन्स्पेक्टरवर या कागदावर सही करण्याची सक्ती करण्यात आली. पोलीसांनी ३५ वारल्यांना अटक केली.

**उग्र परिस्थिती**

या आंदोलनाचा वाढता प्रसाद व दिवसेंदिवस उग्र होत जाणारी परिस्थिती पाहून सरकारने आणीबाणीचा वटहुकुम काढला. शेकडो आदिवासींना गुन्हेगारीच्या निरनिराळ्या कलमाखाली अटक करण्यात आली. २१ नोव्हेंबर१९४६ रोजी शामराव, गोदावरीबाई व किसानसभेच्या इतर कार्यकर्त्यांना हद्दपार करण्यात आलं त्यामुळे तर आदिवासी अधिकच पेटले आणि आणीबाणीचा वटहुकूम काढल्यावर दडपेगिरीचा नवा जाळ पेटला. कम्युनिस्टांशी मजुरीच्या वाढीव दराबाबत आपली बोलणी झाली या गोष्टीसंबंधाने लाकूड व्यापाऱ्यांच्या संघटनेने साफ-साफ कानावर हात ठेवले. यानंतर अनेक वारल्यांनी पुन्हा काम टाकलं. सरकारने कित्येक जणांवर खोटे गुन्हे लादून खटले भरले. जमीनदार पोलीस यांच्या संगनमताने चाललेल्या शारीरिक छळाला ऊत आला. भूमिगत आदिवासींच्या शोधाला येणाऱ्या पोलिसांनी, लोकांना कोंबडी, चिकन मागून हैराण करायचं हा तर रोजचाच प्रघात. जेव्हा कधीही पोलीस व मालक मारहाण करायला येत तेव्हा आदिवासी जंगलात पळून जात व तिथे जाऊन लपत. काही कार्यकर्ते भूमिगत होऊन जंगलातच राहू लागले. यानंतर जसे जसे शक्य होईल

---

## सालदार

पहाटे उठून कामाला जातो
सालदार तू असा कसा
अरे राब राबूनी रक्त आटले
ढिल्या झाल्या तुझ्या नसा नसा ॥ धृ ॥
डोळे चोळत सालदार उठतो
धास्ती त्याला कामाची
शेण पुज्यांत डुबून जातो
सफाई करतो गोठ्याची ॥ १ ॥
मालदार उठतो गर्जत सुटतो
मार पाहिजे या भडव्याला
अरे अब्रू उतारून शिव्या देतो रे
उशीर का झाला भडव्याला ॥ २ ॥
बैल सोडतो औताला जोडतो
औत वळते शेताकडे
अरे बैल बनूनी औत हाकतो
किंमत नसे हो मालकाकडे ॥ ३ ॥

---

तसे तसे आदिवासी संघटित होऊन या सर्व दडपणुकीचा प्रतिकार करू लागले. स्त्रियांना हात लावणाऱ्या जमीनमालकांना चोप देण्यात आला. मग आदिवासींनी हत्यारं जमवली. शस्त्रधारी वारल्यांचे गट बांधले गेले. ते गनिमीकाव्याने पोलिसांशी झुंज देऊ लागले. जमीनमालक, जंगल कंत्राटदार व पोलिसांना हे लढे परतवून लावणं महामुश्कील झालं. हा सगळा प्रदेश म्हणजे एक रणक्षेत्रच होऊन बसलं. स्वातंत्र्यानंतरही हे लढे चालूच राहिले. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर कम्युनिस्ट पक्षाने कामगार व शेतकरीवर्गाचा उठाव घडवून आणण्याचे धोरण आखले. तेलंगणाच्या संग्रामात हे चित्र अधिकच स्पष्ट दिसून आले. या धोरणाचा पाठिंबा मिळाल्याने आदिवासींचा प्रतिकार अधिकच तीव्र झाला. याच दरम्यान कॉ. शामरावांना मृत्यू आला. गोदावरीबाईंनी न डगमगता भूमिगत चळवळ चालूच ठेवली.

## राजकीय धोरणाचा चळवळीवर परिणाम

याच दरम्यान, स्वातंत्र्यानंतर देशात जातीय दंगलीचा डोंब उसळला. महात्मा गांधींची हत्या झाली. अशा सर्व वातावरणात चळवळ बरीच माघारली. अशा तऱ्हेने चळवळीचा पहिला टप्पा ठप्प झाला नाही तरी त्याला बरीच ओहोटी लागली. चळवळीच्या पहिल्या टप्प्यात भाडेपट्टी, जमीनपट्टी, वेठबिगार, मजुरी आणि कामाच्या जागची अमानूष परिस्थिती या सर्व प्रश्नांची नोंद झाली. ते धसाला लावण्याची निकड लोकांना वाटू लागली आणि या दिशेने संघटित प्रयत्न पहिल्यांदाच झाले. १९५१ पासून सीपीआयच्या धोरणातही थोडा बदल झाला. किसानसभा व पक्षातल्या इतर गटांची व्यूहरचना आता निवडणुका लढविण्याच्या इराद्याने झाली. १९५३ पासून सुरू झालेल्या संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत इतर पक्षाबरोबरच कम्युनिस्ट पक्षाने हिरीरीने भाग घेतला व शेतकऱ्यांचा लढा काहीसा सुस्त होण्यात याची परिणती झाली.

१९५३ सालच्या मे महिन्यात डहाणूला अखिल भारतीय किसानसभेची १३ वी परिषद भरविण्यात आली. डहाणू सीपीआयचा बालेकिल्ला झाला होता. यानंतर किसानसभा एक आदिवासी चळवळ म्हणून संपुष्टात आली. पक्षाच्या निशाणाखाली किसानसभेचे काही संप वगैरे आयोजित होत तेवढेच आदिवासी लढ्याचे पक्षकार्यात रूपांतर झाले. एवढे खरे की या चळवळीमुळे वारली लोकांत मोठ्या प्रमाणावर जागृती झाली व मजुरीचे दर ठरविण्यासाठी त्यांची पत वाढली. पक्षाने अभ्यासवर्ग सुरू केले. हे वर्ग आणि प्रत्यक्ष अनुभव यातून कार्यकर्त्यांची एक फळी तयार झाली. किसानसभेच्या कार्यकर्त्यांनी नुसतेच आर्थिक आणि मानसिक बदल घडवून आणले नाहीत. वेठबिगारीविरूद्ध आवाज उठवल्यामुळे सरंजामी सामाजिक संबंधांना एक तडा गेला. कार्यकर्त्यांनी केशरचना, दागदागिने, नेसूच्या पद्धती या सर्वात काही बदल घडवून आणले. पुरुषांनी केसांची मोठी शेंडी ठेवायला सुरुवात केली. अनेक बायांनी हातापायात जडजड कडी घालणं सोडलं. लग्नसमारंभातला खर्च कमी करण्यासाठी प्रयत्न केले गेले. वारली पुरुषांनी लंगोटी लावणं बंद करून अर्ध्या पायाची चड्डी व शर्ट घालायला सुरुवात केली. चळवळीमुळे भाग पडलं म्हणून आणि दुसरं म्हणजे वारल्यांना कम्युनिस्टांच्या प्रभावावाचून वेगळे काढायला म्हणून सरकारने या भागात अनेक योजना सुरू केल्यात.

या अगोदरच्या इतर चळवळींपेक्षा या चळवळीचे स्वरूप व ध्येयधोरणे निश्चितच वेगळ्या स्वरूपाची होती. ही चळवळ आदिवासी चळवळ म्हणून संबोधण्यात आली आहे. चळवळीचे दोन्ही नेते शामराव व गोदावरीबाई बिगर आदिवासी होते.

ठाणे जिल्ह्यातील विधानसभेने उभारलेली वारली लोकांची चळवळ ही पहिली आदिवासी चळवळ की, जिच्यामागे कसलेही धार्मिक टेकू नाहीत. या चळवळीचा गाभा म्हणजे आर्थिक स्वरूपाच्या मागण्या. सरकारने कौशल्याने कम्युनिस्टांची चळवळ असा शिक्का मारून ती दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र चळवळीमुळे कम्युनिस्ट पक्षाला बरेच कार्यकर्ते मिळाले. यातून पुढे येणारा एक प्रश्न असा केवळ आदिवासींचा जास्त सहभाग आहे म्हणून एखाद्या चळवळीला आदिवासी चळवळ हे संबोधन देणे योग्य आहे का? चळवळीत सहभागी झालेल्या आदिवासींना तिचे वर्गीय स्वरूप कशा तऱ्हेने प्रणित झाले ?

# कष्टकरी संघटना : सतत संघर्षाची भूमिका

'कष्टकरी संघटना' फारच थोड्याशा कालावधीत गरीबांना दडपशाही व शोषणाविरुद्ध जागृत करणारी लढाऊ संघटना म्हणून उभी राहिली व ह्या अल्प काळातच प्रसिद्धीच्या झोतातही आली. दुर्दैवाने संघटना ज्या डहाणू–तलासरी भागात काम करीत होती तेथे पूर्वी गोदाताईंच्या नेतृत्वाखालील लोकांच्या चळवळीतून उभ्या राहिलेल्या किसानसभेशी त्यांचा संघर्ष होऊ लागला आणि संघटनेच्या कामावर त्याचा परिणाम झाला.

### संघटनेची सुरुवात

सन १९६० च्या अखेरीस डहाणू–तलासरी भागात पाद्री म्हणून पीटर डिमेलो (ह्याने नंतर आपले नाव प्रदीप प्रभू ठेवले) काम करीत असे. त्याच सुमारास दापचरी दूध प्रकल्पाकरिता शासन त्या भागातील आदिवासींच्या जमिनी संपादित करीत होते. त्यामुळे अनेक आदिवासींना आपल्या उत्पन्नाच्या साधनाला मुकावे लागणार होते. तेव्हा ह्याविरुद्ध आदिवासींना संघटित करण्याचा त्यानी प्रयत्न केला. मात्र चर्चमधील उच्चाधिकाऱ्यांना हे पसंत पडले नाही व त्यांनी डिमेलोची दुसऱ्या ठिकाणी बदली केली. सन १९६५ च्या सुमारास डहाणूजवळील आशागढ येथे आदिवासी मुलांकरिता चालविल्या जाणाऱ्या आश्रमशाळेमध्ये त्याची नेमणूक केली. प्रदीपला श्रीमंत जमिनदार, व्यापारी, सावकार इ. कडून आदिवासींच्या होणाऱ्या शोषणाची जाणीव होती. त्याला पॉलो फ्रेअरेची शिक्षणविषयकपद्धती परिचित होती ह्याच धर्तीवर त्यांनी तरुणांची शिबिरे घेऊन त्यांना दडपशाही व शोषणाविरुद्ध लढे देण्यासाठी जागृत करण्याचे प्रयत्न सुरू केले.

पूर्वी ह्या भागात तो राहिला असल्याने त्याचा स्थानिक आदिवासी तरुणांशी संबंध होता. हे तरुण त्याला येऊन मिळाले. नंतर तलासरी येथील मिशन शाळेत मुख्याध्यापक म्हणून काम करणारा निकी कार्डोझ व वसई (मुंबई) येथे राहणारी सुशिला डिसोझा त्यांच्या कामात सहभागी झाली. ह्याच सुमारास पीटरला आपल्या कुटुंबाचे धर्मांतर होण्यापूर्वीचे प्रभू नाव असल्याचे लक्षात आले आणि त्यानी आपले नाव प्रदीप प्रभू असे बदलले. मात्र लोकांमध्ये राहण्यासाठी असं नाव बदलणं निकीला अनावश्यक वाटलं म्हणून त्यांनी आपलं जुनंच नाव कायम ठेवलं.

ह्या गटाने सुरू केलेल्या ह्या कामामुळे त्यांचा चर्चशी संघर्ष झाला. मात्र बरोबर काम करणाऱ्या काही आदिवासी कार्यकर्त्यांनी त्यांना जागा देवू केली व नंतर ते तलासरी जवळील शिसने येथे राहू लागले. तेथूनच त्यांनी जानेवारी १९७९ मध्ये कष्टकरी संघटना म्हणून कामास सुरुवात केली.

### संघटनेने घेतलेले कार्यक्रम

**मोर्चे :** एकदा एक वृद्ध स्त्री अंबोली गावच्या वाण्याने भात विकत घेतल्यानंतर आपला हिशोब पूर्ण केला नसल्याची तक्रार घेऊन आली. संघटनेने जानेवारी १९७९ मध्ये दुकानावर मोर्चा नेला. दुकानदार ह्या मोर्चामुळे आश्चर्यचकित झाला. त्याला मोर्चाला सामोरे जाण्याची भिती वाटली. त्याने लागलीच तिचा हिशोब पूर्ण करून दिला. संघटनेकडे अशा हिशोब पूर्ण न केल्याच्या अनेक तक्रारी आल्या. त्यानंतर दुसरा मोर्चा काढल्यानंतर व्यापाऱ्यांनी हिशोब पूर्ण करण्याचे मान्य केले. ह्यापैकी बऱ्याचशा तक्रारी एका सत्ताधारी पक्षातील बडे राजकीय प्रस्थ असलेल्या व्यापाऱ्यांविरुद्ध होत्या. गांगनगाव येथील त्याचे दुकानावर जेव्हा मार्च



१९७९ मध्ये एक मोर्चा गेला तेव्हा व्यापाऱ्यांनी केलेल्या काठ्या-शिगाच्या मारझोडीला लोकांनी धैर्याने तोंड दिले. तेथेच थोडीशी शाब्दिक चकमक व हाणा-मारीही झाली. व्यापाऱ्यांनी लागलीच पोलीस तक्रार नोंदविली. प्रदीप व इतर दोन अदिवासी कार्यकर्त्यांना पोलिसांनी त्वरित अटक केली. निकी व सुशिला त्यावेळी मुंबईत असल्याने त्यांना अटक झाली नाही.

२) **जंगल जमिनीवरील अतिक्रमणे** : संघटनेने नंतर आदिवासींच्या जंगल जमिनीवरील व सरकारी पडिक जमिनीवरील अतिक्रमणांचा प्रश्न हाती घेतला. शासनाने २८ डिसेंबर १९७८ च्या आपल्या ठरावा-नुसार काही अटींवर अशी अतिक्रमणे कायम करण्याचे मान्य केले होते. संघटनेने अशा प्रकरणांची माहिती गोळा करून अतिक्रमणे नियमित करावी म्हणून एक अर्ज दाखल केला. शासनाचा हा आदेश सदोष होता. ह्यातील त्रुटी कमी कराव्या म्हणून महाराष्ट्रात काम करणाऱ्या अनेक संघटनांनी 'जबरन जोत आंदोलन कृती समिती' ह्या नावाखाली एकत्र येऊन लढण्याचे ठरविले. कष्टकरी संघटना लवकरच ह्या समितीची प्रमुख घटक बनली. शासनाने ह्या आदेशात १२ सप्टेंबर १९७९ रोजी बदल केला तरीही हा आदेश कधीही नीट अंमलात आणला गेला नाही. अंमलबजावणी नीट न करण्याच्या ह्या महाराष्ट्र सरकारच्या विरुद्ध संघटनेने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालय ह्या बाबतीत चौकशी करीत असून तोपर्यंत सदर जमिनीवरील उभी पिके नष्ट करू नयेत म्हणून न्यायालयाने शासनाला मनाई हुकूम दिला आहे.

३) **आदिवासींच्या हक्कांसाठी झगडणे** : शासकीय योजना-कार्यक्रमांतर्गत आदिवासींना मिळणाऱ्या सोयी-सवलतींचा फायदा घेण्यासंबंधीच्या हक्काची जाणीव करून देण्याचे काम संघटनेने केले. प्राथमिक आरोग्य केंद्राकडून नियमित प्रतिबंधक लस टोचणी, आदिवासी विकास महामंडळाकडून वेळेवर कर्ज मिळविणे, जंगल तसेच महसूल अधिकारी व पोलिसांना लाच देण्यास विरोध करणे, जमीनदारांकडून आदिवासींना होणारी मारहाण व पोलिसांचे त्याकडे असणारे दुर्लक्ष इ. बाबतीत लोकांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. ह्या सर्व कृती म्हणजे सरकारी माणसांची लोकविरोधी कृती असल्याने संघटनेने हा पवित्रा घेतला. संघटनेने ह्याविरोधी लढ्याचे मार्गही आखले. पोलीस चौकशी, जंगल तसेच महसूल अधिकाऱ्यांकडे जाताना लोकांनी एकत्रित जायचे, सरकारी व्यक्तीला लाच, दारू, कोंबडी द्यायची नाही असे ठरविण्यात आले. संघटनेची ही कृती व काही अतिउत्साही कार्यकर्त्यांनी पोलीसांची थट्टा करणारं रचलेलं गाणं ह्यामुळे पोलीस व संघटनेत तणाव निर्माण झाला. नंतर हे गाणं बंद करण्यात आलं. मात्र ह्याच सुमारास संघटना फक्त पोलीस विरोधी नाही तर प्रशासनविरोधी असल्याची भावना संबंधितात पसरली. काही अधिकारी संघटनेचा नक्षलवाद्यांशी संबंध असल्याचे सांगून संघटनेवर आरोप केला. मात्र नोकरशाहीच्या मनात काय डाळ शिजत होती त्याचा संघटनेला थांगपत्ता लागला नाही. संघटनेच्या कार्यकर्त्यां-वर (गांगनगाव मोर्चा – मार्च १९७९ व डहाणू मोर्चा एप्रिल १९८०) च्या किमान दोन प्रसंगी दरोडेखोरीच्या केसेस दाखल करण्यात आल्या. आदिवासींच्या तक्रारी नोंदविण्यास नकार देणे, तक्रार नोंदवून न घेणे हे प्रकार सर्रास होऊ लागले. पोलिसांचे हितसंबंध येथे गुंतलेले असल्याने आदिवासींवरील अन्यायाकडे ते डोळझाक करीत असल्याचाही संघटनेने आरोप केला. अखेरीस वरच्या पातळीवर प्रशासकीय पोलिस अधिकाऱ्यांशी संवाद करण्याचा प्रयत्न करण्यांत आला.

१९७९ व ८० च्या मान्सूनमध्ये संघटनेच्या आदेशा-नुसार आदिवासींनी भात लावणीवेळी संप केला. हा असहकार जमीनदारांनी बेकायदेशीररित्या आदिवासींच्या जमिनी बळकाविलेल्या होत्या त्याविरूद्ध होता. जमीनदारांनी आदिवासींना मारहाण करून दुसऱ्या गावातून मजूर आणून आदिवासींना संपापासून परावृत करण्यासाठी भाडोत्री गुंडाचा वापर इ. प्रयत्न केले. मात्र मूळ आदिवासी जमीनमालकाला जमीन परत मिळवून देण्यात संघटनेला अपयश आले. एक तर जमीनदारांना धक्का पोचवू शकतील इतका काळ कामापासून वंचित राहण्याची आदिवासींची शक्ती नव्हती. दुसरे म्हणजे संघटनेने त्या बेकायदेशीर हस्तांतराविरूद्ध प्रशासकीय यंत्रणेला कायदेशीर कृती करण्याइतपत जागं केलं नाही.

## संघटनेचे रोहयोसंबंधी काम :

५० लोकांनी विशिष्ट विभागात कामाची मागणी केल्यानंतर तेथे रोहयोप्रमाणे काम सुरू करण्याची शासनाची जबाबदारी आहे. शासनाच्या रोहयो कायदा (१९७८) ने प्रत्येक प्रौढ व्यक्तीला अकुशल काम देण्याचा हक्क मान्य केला आहे. ग्रामीण भागात गरिबांमध्ये काम करणाऱ्या संघटनांना ह्याखाली काम मागण्याकरिता लोकांना संघटित करण्याची चांगली संधी मिळाली आहे. १९८० च्या उन्हाळयात ठाणे जिल्ह्यात दुष्काळ सदृष स्थिती असताना संघटनेने जाहीर सभा, मोर्चे, निवेदने इ. द्वारे रोहयो कामे सुरू करावी म्हणून लोकांना संघटित करण्याचे प्रयत्न केले. डहाणू व जव्हार तालुक्यातील १३ ठिकाणी त्यावेळी कामे सुरू होऊन सुमारे ६००० लोकांना काम मिळाले. कामे चालू असताना तेथे होणाऱ्या भ्रष्टाचाराविरुद्धही संघटनेने आवाज उठविला.

ह्या कामातील वर्षाच्या अनुभवानंतर संघटनेने आपला एक अहवाल संबंधिताकडे दिला. रोहयोखाली कोणत्या प्रकारची कामे काढली जातात ह्याकडे संघटनेने ह्यामध्ये लक्ष वेधले असून सध्याची शोषणाधिष्ठित व्यवस्थाच कायम ठेवण्याचे किंबहुना ती मजबूत करण्याचे काम चालू असल्याचे त्यानी ह्यात म्हटले आहे. उदाहरण म्हणून रस्त्याच्या कामाबद्दल सांगताना त्यांनी म्हटले आहे की रस्त्यांमुळे गवत व्यापारी तसेच लाकूड व्यापाऱ्यांचाच दळणवळणांच्या दृष्टीने फायदा होणार आहे. मात्र त्याऐवजी सामाजिक वनीकरण, जमीन सुधार, लघु पाटबंधारे इ. सारखी लोकोपयोगी उत्पादक कामे सुरू करावी शिवाय त्यांनी फक्त उन्हाळयातच कामे न काढता पावसाळयात लावणीनंतर व कापणीपूर्वीही कामे काढावी असे सुचविले आहे. कारण ह्याचकाळात लोकांकडे खायला काही नसते व ते व्यापारी व सावकाराचे भक्ष्य बनत असतात.

## चेतना जागर शिबिरे

संघटनेने मिळविलेल्या यशात त्यांनी युवकांसाठी घेतलेल्या चेतना जागर शिबिरांचा मोठा वाटा आहे. संघटनेने आदिवासी तरुण–तरुणींची अशी सात दिवसांची शिबिरे घेऊन भूमिका वठविणे व खेळ इ. माध्यमाचा वापर करून आदिवासी प्रश्नावर सहभागी चर्चा घडवून आणल्या. ह्या शिबिरातून संघटनेला संभाव्य नेतृत्व हुडकून काढणे शक्य झालं. नंतर त्यांनाच पुढे अधिक प्रशिक्षण देऊन संघटना बांधणीच्या कामात त्यांचा उपयोग करता आला. संघटनेने एक "युवक महोत्सवासाठी पुस्तिका" तयार केली असून ह्या पुस्तिकेतील काही भागाचा देशभरच्या संघटनांना उपयोग होतो.

## कष्टकरी संघटना – मार्क्सवाद्यांतील वैर

गोदाताई परुळेकरांच्या नेतृत्वाखालील वारल्यांचा लढा झाल्यानंतर काही वर्षांनी 'किसानसभेचे कार्यकर्ते ग्रामपंचायत, पं. समितीवर निवडून गेले. उजव्या व डाव्या कम्युनिस्टांमध्ये फूट पडल्यानंतर किसानसभेने

---

### जंगलचे झाड

केला पलाट सोडायचा नाय
जंगलचे झाड आम्ही तोडायचे नाय
केला पलाट आम्ही सोडायचा नाय
जंगलचे राजे आम्ही आदिवासी
रहायचं कुठवर असं उपवासी
पोटाची कळ आता काढायची नाय... ॥ १ ॥
जमीन धंदा आम्हा उदीम नाही
जंगलात जाण्यात असे मनाई
सावकारी पाशात पडायचं नाय... ॥ २ ॥
कष्टावर आमच्या जगतात चोर
ते खाती दूध आम्ही राखतो गुरं
जोखड गुलामीची ओढायची नाय... ॥ ३ ॥
जंगलची जमीन जंगलची माती
जंगलाशी आमची जुळलीया नाती
खोटया बाता आम्ही ऐकायच्या नाय... ॥ ४ ॥
आहो तिथं राहू आम्ही भाऊ भाऊ
जमीन मोकळी खुशाल लाऊ
कोणाच्या पुढे हात जोडायचे नाय... ॥ ५ ॥
केला पलाट आम्ही सोडायचा नाय

---

मार्क्सवाद्यामध्ये सामील होण्याचे ठरविले. मार्क्सवादी पक्षाचा आमदारही ह्या भागातून निवडून जाऊ लागला. साहजिकच मार्क्सवादी निवडणुकीच्या राजकारणात पडले व काहींनी तर भ्रष्ट मार्गाचा अवलंब सुरू केला. एका पुढाऱ्याने किसानसभेच्या निधीचा गैरवापर केला व पक्ष सोडला. संघटनेने कामास सुरुवात केली तेव्हा मार्क्सवादी संघटनेला शत्रू मानू लागले. दुखावलेले व्यापारीही संरक्षणाकरिता त्यांचेकडे गेले. मार्क्सवाद्यांनी हा भाग म्हणजे आपले राखीव कुरणच मानले होते. ह्या भागातील गरीब संघटनेकडे आकृष्ट होऊ लागले. संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मार्क्सवादी कार्यकर्त्यांवर उघड टीकेस सुरुवात केली. संघटनेने एका दुकानावर मोर्चा काढल्या नंतर त्याला कॉ. दामोदर माळीनी प्रतिमोर्चा काढला तेव्हा संघर्षाची ठिणगी पडली. आपल्या कार्यकर्त्यांकडून संघटनेच्या कार्यकर्त्यांना माळींनी मारझोड करविली. योगायोगाने नंतर भ्रष्टाचार व गैरवर्तणुकीबद्दल माळीना पक्षातून काढून टाकण्यात आले.

१९८० च्या विधानसभा निवडणुकीत मार्क्सवादी उमेदवार कॉ. लहानू कोमला संघटनेने पाठिंबा दिला त्याकाळात हे संघर्ष थांबले. मात्र पुन्हा निवडणुकीनंतर उघड संघर्ष सुरू झाले.

## गोदाताई परुळेकरांचा संघटनेवर हल्ला

महाराष्ट्रात नागालंड निर्माण करीत असल्याचा आरोप ४ ऑक्टोबर १९८० रोजी गोदाताईंनी आपल्या मुलाखतीतून केला. कार्यकर्ते ख्रिश्चन असल्याचा, मिशनरी असल्याचा त्यांचा आरोप होता. तसेच चर्चच्या पैशाचा संघटना वापर करीत असल्याचा आरोप करून त्यांनी सरकारकडून ह्या देणग्यांची चौकशी करावी अशी मागणी केली. त्यांनी म्हटले, 'मी अंतुलेंना विनंती करते की, त्यांनी राष्ट्रविरोधी व राष्ट्रविघातक शक्तीपासून सावध रहावे !' गरीबांच्या शोषणाचा मुद्दा त्यांनी उधळून लावला. ग्रामीण, श्रीमंत व स्थानिक प्रशासनातील साखळी त्यांनी नाकारली. खरं तर पोलीस व स्थानिक प्रशासन अधिकारी पैशाबद्दल फार जबाबदारीने वागतात असं त्या म्हणाल्या. त्यांनी म्हटले की एका ज्येष्ठ प्रशासकांनी कष्टकरी राष्ट्रविरोधी कारवायात सामील असल्याचे सांगितले आहे. त्यांनी असाही दावा केला की संघटनेची एका ग्रामसेवकाविरुद्ध 'बलात्काराचा प्रयत्न' केल्याची तक्रार, स्थानिक सरकारी अधिकाऱ्याविरुद्ध लोकांना भडकविण्याचा प्रयत्न आहे. (नंतर मृणाल गोरेंनी ह्याप्रसंगी स्वतंत्र चौकशी केली व EPW च्या प्रतिनिधीला बलात्काराच्या प्रयत्नाची घटना सत्य असल्याचे सांगितले.)

गोदाताईंना दिलेल्या उत्तरात संघटनेने आपण चर्चशी संबंध सोडल्याचे सांगून चर्च व परदेशी पैशाचा वापर करीत असल्याचा इन्कार केला व संघटना ह्या संबंधी सरकार किंवा लोकनियुक्त मंडळाकडून चौकशीस तयार असल्याचेही म्हटले आहे.

गोदाताईंनी 'दिनांक' साप्ताहिकात दिलेल्या सुशीला डिसोझा हिच्या चारित्र्यहनासंबंधीच्या मुलाखती संदर्भातही संघटनेने पत्र लिहून आक्षेप घेतला व त्यांनी प्रश्न केला की महाराष्ट्रातील श्रमिक संघटना, भूमिसेना, कष्टकरी संघटना इ. सारख्या लोकशाहीवादी संघटना १९६० ते १९७८ दरम्यानची जंगल जमिनींवरील अतिक्रमणे रीतसर करा म्हणून आंदोलन करीत असताना मार्क्सवादी १९७२ ते १९७८ ह्या काळातील अतिक्रमणेच नियमित करावी ह्यावर तयार का झाले ? खरंतर ह्यामुळे अनेकांच्या जगण्याचे साधनच नष्ट होणार होते.

१८ ऑक्टोबर १९८० रोजी मार्क्सवाद्यांनी संघटनेचे बालेकिल्ले असलेल्या शिसने व गांगणगाव ह्या दोन गावांवर हल्ला करून ६० कुटुंबांची स्वयंपाकाची भांडी फोडली, शेतीची अवजारे लुटली व लोकांना मारहाण केली. मात्र पोलीसांनी काहीही कारवाई केली नाही. १७ नोव्हेंबर १९८० रोजी 'महाराष्ट्र टाईम्स' मध्ये श्री. दिनू रणदिवे व ज्येष्ठ जनता नेते श्री. एस. एम. जोशी यांनी दि. २० डिसेंबर १९८० च्या 'साधना' मध्ये लिहून ही घटना घडल्याचे मान्य केले आहे.

कष्टकरी संघटनेची कामाची चुकीची पद्धत व मार्क्सवादी नेतृत्वाकडून त्याला मिळालेले चुकीचे प्रत्युत्तर या दोन्हीं घटना मार्क्सवादी व कष्टकऱ्यांच्या वैराला कारण असल्याचे पूर्वी भूमिसेनेचे परंतु आता मार्क्सवादी पक्षाचे कार्यकर्ते असलेले श्री. एडवर्ड वरठा

यांनी 'तात्पर्य' च्या जानेवारी. १९८१ च्या अंकात म्हटले आहे. दोन डाव्या संघटनामधील झगडयासंबंधी फार संतुलित असं मत त्यांनी व्यक्त केले असून त्यांनी संघटनेने भ्रष्ट राजकारणी, जुलमी जमिनदार, भ्रष्ट शासकीय अधिकारी इ. शत्रू एकाचवेळी उभे केल्याबद्दल संघटनेला दोष दिला असून मार्क्सवाद्यांतील शिथिल-तेलाही दोष दिला आहे.

उच्च प्रशासकीय अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या मध्यस्थीने १३ जून व ४ जुलै १९८१ रोजी दोन्ही संघट-नांच्या बैठका घेऊन समेट घडविण्याचा प्रयत्न केला. दुसऱ्या बैठकीस मार्क्सवादी अनुपस्थित राहिले व समेटाचा प्रयत्न फसला व पुढे १९८१ मध्ये संघटनेच्या कार्यकर्त्यांना मारहाण करणे इ. प्रकार सुरूच राहिले. संघटनेच्या अहिंसावादी धोरणामुळे गावकरी प्रतिकार करू शकले नाही. साहजिकच संघटनेच्या कार्यकर्त्यांना नेहमी गटाने फिरावे लागले. किंबहुना आठवडयाच्या बाजारालासुद्धा ते गटाने येऊ लागले.

ह्या वादावरच संघटनेची शक्ती खर्च होऊ लागल्याने साहजिकच संघटनेच्या कामावर परिणाम झाला. शोषण, दडपशाहीविरुद्ध जागृती करणे तसेच इतर अनेक प्रश्नांचा पाठपुरावा व त्याकामी हवे असलेले सातत्य टिकू शकले नाही व संघटनेला इतर समविचारी राजकीय पक्षांशी गठबंधन करणे आवश्यक वाटले.

### लाल निशाण गटाशी सहकार्याची भूमिका

मार्क्सवाद्यांकडून होणारा छळ व एकाकीपणाची भावना निर्माण झाल्याने संघटनेने लाल निशाण गटाशी हातमिळवणी करण्याचा निर्णय घेतला. हा गट प्रामुख्याने ग्रामीण गरीबांत काम करणारा असून त्यांनी ऊसमळयातील शेतमजूरांच्या संघटना बांधल्या आहेत. त्यांच्या कापड गिरणी कामगारांच्या तसेच इंजिनिअरिंग उद्योगातसुद्धा संघटना आहेत. हा पुरोगामी मार्क्सवादी गट असून उजव्या व डाव्या कम्युनिस्टांनी निवडणुकांचे व तडजोडवादी राजकारण चालवले असल्याने दोन्हीही पक्ष वर्ग संघर्षाच्या मार्गापासून दूर ढळले असल्याचे ह्या गटाचं मत आहे. हा गट महाराष्ट्रभर बळ असलेला राजकीय पक्ष नाही. किंबहुना राज्यातील काही भागातच गटाचे काम सीमित आहे. कष्टकरी संघटनेने पुरोगामी भूमिका स्वीकारली व हा गट त्यांना विचाराने अधिक जवळचा वाटला. ह्या गटाशी सह-कार्याची भूमिका घेतल्यानंतर कष्टकरीने डहाणू परिसरातील ट्रक कामगार, मिठागर कामगार व बागांमध्ये काम करणाऱ्या मजूरांच्या संघटना बांधण्यास सुरुवात केली. संघटनेने आता काही गावांमध्ये आपले पाय रोवल्याचे दिसत आहे. शेतमजूर व इतर मजुरांची ट्रेड युनियन धर्तीवर त्यांनी संघटना केली आहे.

संघटनेने आता वेगळया दिशेनेही काम करण्याचे प्रयत्न केल्याचे दिसून येते. दारूबंदी चळवळ, पारंपारिक औषधांच्या वापरासंबंधी माहिती जमविणे इत्यादी कामे त्यांनी केली.

---

## संघटना आमची शक्ती

हा तात्या भडवा मेला, माझं नावच नाही
लिहलं गं ।

तात्या बसतो घरी आणि मजूर सडकेवरी
हा रावसाहेब इथ आला, माझा दिवसाचा खाडा
झाला गं ।

तात्या दुसऱ्या दिवसी येतो आणि समज करून
जातो
तुला दुसऱ्या मस्टरमध्ये तुझा दिवस भरून देतो ।
पोलिस भडवा आला
मला धमकी देऊन गेला
तू वेडचा नको बोलू, तुझ्या हाताला बसतील
बेडचा गं ।

मजूर विचार करतो
गरीबाला न्यायच नाही
सारी लुबाडणूक चालली त्याला एकीची शक्ती
पाहिजे गं ।

संघटना आमची झाली
आता एकीनं काम करू
आता अन्यायाच्या घरी मोर्चावर मोर्चा काढू गं ।
न्याय मिळाल्या शिवाय
आम्ही घरात बसणार नाय
पैसे खाणाऱ्याची सारी धींडच हाकलून काढू गं ।

---

### दारूबंदी चळवळ

ह्या भागातील आदिवासी काळ्या गुळापासून बनलेली दारू पितात. ह्या भागातील घाऊक व किरकोळ व्यापाऱ्यांकडून गुरांचे खाद्य म्हणून विकल्या जाणाऱ्या मात्र दारूकरिता म्हणून वापरले जात असल्याचे उघड सत्य असलेल्या या गुळाची मोठ्या प्रमाणावर विक्री होते. ह्या विक्रीविरुद्ध संघटनेने लोकांना जागृत करण्याचा प्रयत्न केला. मात्र बऱ्याच आदिवासींना दारूची सवय जडलेली असल्याने व काहींना दारू विकून पैसे मिळत असल्याने हा कार्यक्रम यशस्वी झाला नाही.

### परंपरागत औषधांचा वापर

स्थानिक भगतांकडून वापरल्या जाणाऱ्या वनौषधी-संबंधी माहिती गोळा करण्याचा तसेच भगतांना प्रशिक्षण देण्याचा महत्त्वाचा कार्यक्रम संघटनेने हाती घेतला आहे. वारलीमधील अंधश्रद्धा घालविण्याच्या दृष्टीने कार्यक्रम घेण्याचाही त्यांचा विचार आहे. एखाद्या स्त्रीला संशयित म्हणून भुताटकीण समजून छळ करण्याचा घृणास्पद प्रकार ह्या भागात आहे. अज्ञानामुळे तसेच परंपरागत भगतांच्या प्रभावामुळे ही प्रथा रूढ झाली असावी. ह्याविरुद्धही संघटना जागृतीचे प्रयत्न करणार आहे.

आदिवासींना जागृत करणे व त्यांची स्थानिक पातळीवर भक्कम संघटना उभी करण्यात कष्टकरी संघटनेला आलेले यश आश्चर्यजनक आहे. किसानसभेशी त्यांचा जर संघर्ष आला नसता तर डहाणू व तलासरी तालुक्यातील अनेक गावांमध्ये त्यांचे काम सहज पसरले असते. त्यांनी आपल्या सुरुवातीच्या काळातच सावकार, व्यापारी, मोठे जमीनदार, भ्रष्ट सरकारी अधिकारी व राजकीय कार्यकर्त्यांविरुद्ध संघर्षाची भूमिका घेतल्याने एकाचवेळी अनेक शत्रू निर्माण झाले व त्या सर्वांना तोंड देणं संघटनेला अशक्य झालं. संघटनेचे बहुसंख्य कार्यकर्ते ख्रिश्चन. त्यामुळे त्यांच्या चारित्र्याबद्दल गैरसमज पसरविणे सहज शक्य झालं. संघटनेचे दोन्ही सुरुवातीचे प्रमुख कार्यकर्ते पूर्वी पाद्रीच होते, त्यामुळे ह्या प्रचाराला अधिकच धार आली. मार्क्सवाद्यांनीसुद्धा ही मिशनऱ्यांची संघटना असून राष्ट्रविरोधी असल्याचा आरोप केला. एका बाजूला संघटनेला धार्मिक बिरूद चिकटवलं गेलं तर दुसऱ्या बाजूला चर्चवाल्यांनी संघटना ख्रिश्चनांविरूद्ध असल्याचा बोभाटा सुरू केला. मार्क्सच्या शिकवणुकीचा प्रसार करतो म्हणून प्रदीप प्रभूला मठातून काढून टाकण्यात आलं.

अगदी अल्पावधीतच बाहेरून आलेल्या तीन बिगर आदिवासींनी आपली कुशलता व त्यागाच्या बळावर मजबूत लोकसंघटन उभं केलं, मात्र ह्या कार्यकर्त्यांमधील एकी फार काळ टिकली नाही. १९८१ च्या अखेरीस सुशीला डिसोझा व निकी कार्डोझाने काही कारणास्तव संघटना सोडली. ह्याच भागात दुसरी संघटना सुरू करण्याचा प्रयत्न त्यांनी न केल्याने व दोघेही काम सोडून ह्या भागातून निघून गेल्याने संघटनेच्या कामावर त्याचा फारसा विपरीत परिणाम झाला नाही. आता संघटनेने आदिवासींमध्ये काम करणाऱ्या वेगवेगळ्या संघटनाबरोबर सक्रिय सहभाग चालूच ठेवला आहे. संघटनेच्या कार्यकर्त्यांची भक्कम फळी निर्माण झाली असून ती एक प्रभावी जनसंघटना बनली आहे.


## हाकारा

(फॉर्म ४ नियम ८ नुसार निवेदन)

१. प्रकाशन स्थळ : मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे.

२. प्रकाशन अवधी : त्रैमासिक

३. मुद्रक व प्रकाशक व संपादक : रामचंद्र केशव मुटाटकर

४. राष्ट्रीयत्व : भारतीय

५. पत्ता : मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७.

६. स्वामीत्व : महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, मानवशास्त्र विभाग, पुणे विद्यापीठ, पुणे ७.

मी, रामचंद्र केशव मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहिती-नुसार व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी १९८५ — प्रकाशक

# जागृत आदिवासी संघटना

□ डॉ. सतीश गोगुलवार

जागृत आदिवासी संघटना ही चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यात मुख्यतः आदिवासींच्या प्रश्नासाठी झटणारी संघटना आहे. या संघटनेचा व्याप व काम मोठ्या प्रमाणात गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा तालुक्यात आहे.

मागच्या वर्षी (१९८४ मध्ये) चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन चंद्रपूर व गडचिरोली हे दोन जिल्हे उदयाला आले. विभाजनामुळे बहुसंख्य आदिवासी जमात गडचिरोली या नवीन जिल्ह्यात राहिली. गडचिरोली जिल्ह्यातील कुरखेडा, धानोरा, मेटापल्ली, सिरोंचा व आलापल्ली हे तालुके बहुसंख्य आदिवासी लोकसंख्या असलेले आहेत.

हा जिल्हा दक्षिण-उत्तर असा लंबाकृती पसरलेला आहे. जिल्ह्याच्या पूर्वेला मध्यप्रदेश व दक्षिणेला आंध्र प्रदेश आहे. कुरखेडा व धानोरा या भागात १९५२ ते १९७२ पर्यंत समाजवादी नेते. स्व. नारायणसिंह उईके यांचा दबदबा राहिला आहे. ते विरोधी आमदार म्हणून बरेच वर्षे कार्यरत राहिले. त्यांचे कार्य लोकजागृती व लोकआंदोलनाचे होते. 'जबरन जोत' आंदोलनाचे पहिले प्रवर्तक म्हणून त्यांचे नाव घेतले जाते. जंगलाच्या सान्निध्यात राहिलेल्या आदिवासींनी २५–३० वर्षांपासून शेती करूनही त्या जमिनी त्यांचे नावावर नव्हत्या त्यामुळे त्यांना सरकारी योजनांचा लाभ मिळत नव्हता. त्यासाठी 'जबरन जोत' आंदोलन संघटित झाले व त्याचा परिणाम म्हणजे हजारो आदिवासींना स्वतःच्या मालकीच्या जमिनी मिळाल्या. नारायणसिहजी उईके ह्यांचे निधनानंतर त्यांचे शिष्य श्री. सुखदेवबाबू उईके ह्यांनी ह्या भागातील विरोधी पक्षाची व लोकजागृतीच्या कामांची धुरा सांभाळली. बऱ्याच वर्षाच्या अनुभवानंतर त्यांना आदिवासींच्या जागृतीसाठी व त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पक्षनिरपेक्ष आदिवासी संघटनेची अत्यंत गरज भासू लागली १९८० मध्ये त्यांनी जनता पक्षाचा राजीनामा दिला. त्यानंतर १९८० मध्ये चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी कार्यकर्त्यांचे संमेलन चंद्रपूर मुक्कामी बोलविण्यात आले. त्या संमेलनात सर्वांच्या मतानुसार जागृत आदिवासी संघटनेची स्थापना झाली.

### संघटनेची उद्दिष्टे

१) आदिवासी जमातीत स्वहक्काची व कर्तव्याची जाणिव निर्माण करणे.

२) भ्रष्ट नोकरशाही, भांडवलदार व स्वार्थी पुढाऱ्यांकडून होणारे शोषण थांबविणे.

३) शासकीय योजनांचा लाभ पदरात पाडून घेण्यासाठी आदिवासी जमातीला प्रोत्साहित करणे.

४) आदिवासींचे हितविरोधी धोरणाविरुद्ध संघटित आवाज उठविणे.

५) आदिवासींसाठी असलेले कायदे, नियम व शासकीय योजनांची आदिवासींना माहिती देणे.

६) सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकासासाठी संघटितपणे प्रयत्न करणे.

७) समाजविघातक रूढी, अंधश्रद्धा यांचे उच्चाटन करणे.

८) समाजहितकारी जुन्या परंपरा व संस्कृतीचे जतन व संवर्धन करणे.



९) सुशिक्षित बेकार युवकांनी राखीव जागांवर नेमणूक होण्यासाठी रोस्टरप्रमाणे नोकरीत बढती मिळण्यासाठी व बॅकलॉग भरला जाण्यासाठी प्रयत्न करणे.

१०) आदिवासींचे सर्वांगीण प्रगतिसाठी संघटित प्रयत्न करून मानवी विकास प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेणे.

## उद्दिष्टपूर्तीसाठी मार्ग व दिशा

संघटनेची गृहित उद्दिष्टे गाठण्यासाठी सामूहिक-रित्या खालील मार्गांचा अवलंब केला जातो.

१) मेळावे भरविणे. २) शिबीरे व चर्चासत्रांचे आयोजन करणे. ३) सभा संम्मेलनांचे आयोजन. ४) जाहीरसभाद्वारे उद्‌बोधन व जागृती. ५) शांततामय मार्गाने मोर्चे, निदर्शने, उपोषण, सत्याग्रह व जनआंदोलन करणे.

## संघटनेचे धोरण

१) संघटना गृहित ध्येयासाठी पक्षनिरपेक्ष व स्वतंत्र विचाराने पूर्णतः सामाजिक संघटन म्हणून कार्यरत राहील. संघटना कोणत्याही राजकीय पक्षाची बांधिलकी स्वीकारणार नाही.

२) आदिवासींचे प्रगतीसाठी झटणाऱ्या, तळमळीने त्यांच्यासाठी कष्ट करणाऱ्या कार्यकर्त्याला संघटना साथ देईल व वेळप्रसंगी त्याची मदत घेईल.

३) संघटना निवडणुकी लढविणार नाही किंवा राजकीय पक्ष म्हणूनही कार्य करणार नाही.

४) निवडणूक काळात संघटना कोणत्याही राजकीय पक्षाचे उमेदवाराला त्याने आदिवासींसाठी केलेल्या व्यक्तिगत कार्याचे निकषावर मदत करील. यात सत्ता-धारी किंवा विरोधी पक्ष असा भेदभाव पाळला जाणार नाही.

मागील तीन-चार वर्षांपासून संघटनेने आपल्या ध्येयधोरणानुसार खालील कार्य केले आहे.

जबरन जोतचा प्रश्न ह्या भागात मोठ्या प्रमाणात होता. कायदा होऊनही प्रत्यक्ष अंमलबजावणीची टाळाटाळ सुरू होती. ह्यासाठी जागृत आदिवासी संघटनेतर्फे जबरन जोतवाल्यांचे मेळावे, मोर्चे घेऊन अंमलबजावणीसाठी आग्रह धरण्यात आला. त्यामुळे शेकडो लोकांना जबरन जोतचे पट्टे मिळाले. आजही ह्या प्रश्न घेऊन काम सुरू आहे.

आदिवासी स्त्री-पुरुषांवरील अत्याचाराच्या विरोधात संघटना वेळोवेळी उभी ठाकली आहे. रायगड, ता. कुरखेडा येथील आश्रमशाळेतील १० व्या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थिनीवर तेथील मुख्याध्यापकानेच बलात्कार केला. त्यावेळी संघटनेच्या वतीने ह्या प्रश्नावर आंदोलन उभे केले त्यामुळे त्या मुख्याध्यापकास निलंबित करून त्याचेवर केस करण्यात आली.

मागच्यावर्षी शेतकऱ्यांना घरगुती उपयोगासाठी जळाऊ लाकडाचे पास देणे बंद केले होते. त्यासाठी संघटनेतर्फे प्रचंड मोर्चा कुरखेडा तालुका कार्यालयावर नेण्यात आला. त्याचा परिणाम म्हणजे पुन्हा पास सुरू करण्यात आले.

आदिवासी सहकारी सोसायटीतर्फे होणाऱ्या भ्रष्टाचारावर व विविध योजनेचा लाभ आदिवासी शेतकऱ्यांना मिळवून देण्यासाठी संघटना नेहमीच कार्यरत असते.

ह्या भागातील विविध नद्या व उपनद्यांवर बारा धरणे होणार आहेत. त्यामुळे संपूर्ण आदिवासी जमात बाहेर घालविली जाणार आहे. तसेच ह्या भागातील प्रसिद्ध जंगल नष्ट होणार आहे. त्यासाठी संघटनेने इतर लोकांच्या व संघटनांच्या साह्याने जंगल बचाव, मानव बचाव कृती समिती तयार करून एक प्रचंड मोर्चा गडचिरोली येथे काढला होता.

ह्यावर्षी चंद्रपूर जिल्ह्यातील देवाडा येथील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना गावातील पाटलाने शाळेच्या मुख्याध्यापकाच्या संगनमताने मारहाण केली. ह्या प्रश्नाला घेवून संघटनेच्या गडचांदूर शाखेने गडचांदूर येथे मोर्चा व सभा घेतली. त्याचा परिणाम म्हणून पोलीसपाटलाला अटक करण्यात आली. दिवाळीच्या सुट्टीत देवाडा येथील विद्यार्थ्यांचे एक शिबीर गडचांदूर येथें घेण्यात आले.

महिलांचा सहभाग संघटनेच्या कामात फार मोठ्या प्रमाणावर आहे. घेलगाव व आंधळी, ता. कुरखेडा ह्या गावांतील महिलामंडळे सक्रिय आहेत.

मागच्यावर्षी सप्टेंबर महिन्यात युवकांचे तीन दिवसांचे शिबीर संघटनेतर्फे पुराडा मुक्कामी घेण्यात आले. त्या शिबिरातच जागृत आदिवासी युवक संघटनेची स्थापना करण्यात आली.

सप्टेंबर १९८४ मध्येच ४० महिलांचे दोन दिवसांचे शिबीर आंधळी येथे घेण्यात आले. ह्या शिबिरात रोजगार हमी योजना, स्त्री व बालकांचे आरोग्य व स्त्रियांचे प्रश्न ह्या विषयावर चर्चा झाली.

१९८४ वर्षात पिके बरोबर आली नाहीत, दुष्काळी परिस्थिती आहे, त्यामुळे रोजगार हमी कामे लोकांसाठी सुरू करण्यासाठी मोर्चा व सभा घेण्यात आली. तसेच रोजगार हमी योजनेबाबत शिक्षण संघटनेतर्फे सुरू आहे.

संघटनेच्या मदतीने ह्या भागातील वैदुंना संघटित करून त्यांची जागृत वैदू संघटना तयार करण्यात आली. बऱ्याच वर्षापासून गावात प्रतिष्ठित असलेली ही विद्या टिकवून ठेवणे व त्याचे संगोपन करणे व वाढविणे ही उद्दिष्टे आहेत.

संघटनेचे काम करीत असताना मुख्य अडचण राजकीय पक्षाची जाणवते. आज गावा-गावात राजकीय मतभेद विकोपाला गेले आहेत. लहान-सहान कारणासाठी लोक कोर्टाकडे व पोलीसांकडे धाव घेतात. कार्यकर्त्यावर खोट्या केसेस लावून त्रास देण्याचा प्रयत्न करतात. संघटनेचे काही कार्यकर्ते जुन्या जनतापार्टीचे असल्यामुळे लोक अजूनही जागृत आदिवासी संघटनेचे काम म्हणजे पार्टीचे काम समजतात, ही भावना नष्ट होण्यासाठी आणखी काही दिवस लागतील.

संघटनेने सुरुवातीला ठरविलेल्या उद्दिष्टांच्या दिशेनेच संघटनेचे काम सुरू आहे व अशा विचारांची माणसेही हळूहळू जोडली जात आहेत.

**संघटनेचे पुढील कार्यक्रम**

१) युवकांना मोठ्या प्रमाणात संघटनेच्या कामात जोडणे.

२) रोजगार हमी कामाबाबत रीतसर मागणी व योजनेचे सविस्तर शिक्षण देणे.

३) महिलांचा सहभाग आणखी वाढविण्यासाठी विविध कार्यक्रम.

४) आरोग्य शिक्षण मुख्यतः स्त्री व लहानमुलांच्या आरोग्याबाबत.

५) आदिवासी संस्कृतीचे रक्षण करण्यासाठी विविध कार्यक्रम.

६) सामूहिक लग्नासाठी प्रयत्न.

ooo

**डॉ. सतीश गोगुलवार**
कुपरवेडा, जि. गडचिरोली ४४१२०९

# आदिवासी कार्यासाठी आवाहन

कर्जत भागातील आदिवासी समाजाच्या पाणीप्रश्नासंबंधी अभ्यास करू इच्छिणारा व ह्या भागात किमान ३ वर्षे राहू इच्छिणारा सिव्हिल इंजिनिअर पाहिजे.

त्याला छोटी धरणे, लघुपाटबंधारे व पाणी उपलब्ध करण्याच्यादृष्टीने असलेल्या इतर योजनांमध्ये आवड असावी तसेच त्या भागातील तरुणांना पाण्याचे प्रश्न स्वतंत्रपणे हाताळू शकतील असे प्रशिक्षण द्यावे लागेल.

तसेच नवीन प्रकारच्या शाळेसाठी कर्जत तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी भागात किमान ३ वर्षे राहण्याची तयारी असलेले शिक्षक किंवा शिक्षिका पाहिजेत.

१) वनस्पतीशास्त्राची पदवी किंवा पदव्युत्तर B Sc. किंवा M. Sc. (वनस्पतीशास्त्रात विशेष आवड आवश्यक.)

२) गणित, पदार्थ विज्ञान, रसायनशास्त्र ह्या विषयातील B. Sc. किंवा M. Sc. (ह्या विषयात संशोधन करण्याची आवड असावी.)

३) ड्रॉईंग : ड्रॉईंगमधला डिप्लोमा/डिग्री.

४) क्राफ्ट : क्राफ्टमधला डिप्लोमा/डिग्री.

ह्याशिवाय निसर्गप्रेमी, कला, क्रीडा, संगीत, वाद्ये, लिखाण, नाट्य अभिनय इ. छंद असणाऱ्यांना प्राधान्य.

संपर्क : ॲकेडेमी ऑफ डेव्हलपमेंट सायन्स
मु. पो. कशेळे, ता. कर्जत,
जि. रायगड–४१० २०१.

# जागृत भाऊबंदी संघटना : संस्थेकडून संघटनेकडे

☐ प्रदीप गायकवाड

जागृत भाऊबंदी संघटना गेल्या ७ वर्षांपासून रायगड जिल्हा व कर्जत तालुक्यातील आदिवासी विभागातील काही भागात कार्य करीत आहे. सध्या संघटना ११ गावे व ३३ वाड्यात सामाजिक प्रश्नावर कार्य करीत आहे. प्रामुख्याने लोकांना संघटित करणे, महिलांना संघटित करणे, घरगुती दवा आणि आयुर्वेदिक औषधाविषयी जाणीव, जंगलाविषयी शिक्षण, बालशिक्षण कार्यक्रम, बँकलोन कार्यक्रम, पारंपारिक लोककलास प्रोत्साहन, कमी खर्चात लग्न मोहीम, स्थानिक पातळीवर लाचलुचपतीवर कार्यक्रम, पिण्याच्या पाण्यावर कृती, जमिनीच्या प्रश्नाचा पाठपुरावा, गावकी फंडाना प्रोत्साहन इत्यादी कार्यक्रम संघटनेने आतापर्यंत हाती घेतले आहेत.

जागृत भाऊबंदी संघटनेची सुरुवात कामाच्या माध्यमाने होत गेली. त्याच असं झालं...कर्मा नावाची एक सामाजिक संस्था सन १९७६ पासून कर्जत जवळील परिसरात कार्य करीत आहे. श्री. एस. एस. राव (पेस्ट कंट्रोल प्रा. लिमिटेडचे मालक) यांनी ही संस्था सुरू केली. दि. २३ जानेवारी १९७८ रोजी मी या संस्थेत कार्यकर्ता म्हणून प्रवेश केला. त्यावेळी संस्थेचे कार्य खूप जोरात होते. १०–१५ कार्यकर्ते कामाला होते. पगारही चांगला होता. आम्हाला पगार पेस्ट कंट्रोल ऑफ इंडिया ही कंपनी द्यावयाची म्हणजे आम्ही कंपनीचे नोकर होतो, कंपनीने आम्हाला कर्मा संस्थेत कामाला पाठविले होते. पण कामाचा एरिया थोडा होता. मी कर्जतपासून ३० कि. मी. अंतरावरील आदिवासी भागात राहून काम करायचा विचार मांडला. संस्थेनी मला प्रोत्साहन दिले. झाले, मी मार्गाचीवाडी, या छोटयाशा ठाकुरवाडीत माझे ठाण मांडले आणि कामाला सुरुवात केली. सप्टेंबर १९७९ च्या दरम्यान संस्थेनी या भागात काही उद्योग सुरू करावा म्हणून मॅच फॅक्टरी सुरू करायची कल्पना हाती घेतली. त्या कामासाठी वेगळी संस्था रजिस्टर्ड करावी व तिच्या मार्फत हा उद्योग चालू करावा हा निर्णय झाला. घटना तयार करणे, कमिटी बनविणे, संघटनेचे नाव ठेवणे या सर्व कामात लोकांचा सहभाग वाढला. लोकांना एक नवीन उत्साह आला. आम्ही आमच्यासाठी काही नवीन करीत आहोत ही भावना निर्माण झाली. २ नोव्हेंबर १९७९ रोजी संघटना रजिस्टर्ड झाली आणि त्यानंतर एक वेगळचा संघटित कार्याला सुरुवात झाली.

ह्या सर्व कामात नॅन्सी गायकवाड हिचापण मोठा सहभाग होता. नॅन्सी ज्यावेळी एम. एस. डब्ल्यू. करीत होती. तेव्हापासून ती फील्ड वर्कसाठी माझ्या सोबत होती. त्यानंतर दिनांक १ ऑगस्ट १९७९ पासून ती पण कर्मा संस्थेमध्ये कार्यकर्ती म्हणून कामाला लागली.

आम्ही दोघे आणि इतर कार्यकर्ते आता संघटनेचे काम वाढविण्याच्या दृष्टीने कामाला लागलो. त्यासाठी फंडाची व्यवस्था केली. आता जागृत भाऊबंदी संघटनेच्या बॅनरखाली संघटनेचे काम व्हायला लागले. नॅन्सी आणि मी, आम्ही दोघेही कर्माचे कार्यकर्ते होतो. जागृत भाऊबंदी संघटनेसाठी काम करीत होतो. तसे कर्मा संस्थेने पूर्ण स्वातंत्र्यपण दिले होते, पण १४ महिन्यानंतर हे वातावरण बदलले. काही प्रश्न आमच्यात व कर्मात निर्माण झाले. कर्मा, जे. बी. एस. व आम्ही यांचा संबंध काय व कसा रहावा, यावर योग्य मार्ग मिळाला नाही. छोटया छोटया प्रश्नावरून गुंता वाढत गेला. १ वर्ष अशा तणाव परिस्थितीतच कार्य चालू होते. शेवटी २३ फेब्रुवारी १९८२ ला आम्ही दोघांनीही कर्माचा राजीनामा दिला (द्यावा लागला) आणि हा एकदाचा गुंता संपला.

जागृत भाऊबंदी संघटनेने आता स्वतंत्रपणे कामाला सुरुवात केली. ३–४ वर्षांच्या कामाच्या अनुभवाची शिदोरी सोबत होती. जागृत भाऊबंदी संघटनेची कमिटी ही, मला सोडले तर बाकी सर्व स्थानिक लोकांची होती आणि त्यात बहुतेक सर्वच आंगठाबहाद्दर. अशी एक टीका आमच्यावर व्हावयाची की, सर्व आंगठेवाले, प्रदीप त्यांना फसवणार! त्यात कमिटीवरील लोकांच्या मनात अस्थिरता आली. त्यांना असेही वाटे मॅच फॅक्टरीसाठी जे कर्ज घेतले आहे.

ते आम्हाला फेडावे लागेल की काय ? आम्हाला असे वाटले की पूर्णपणे स्थानिक कमिटी किंवा पूर्णपणे बाहेरील कमिटीपेक्षा मिश्र कमिटी योग्य राहील आणि तशी योजना केली. काही स्थानिक आणि काही बाहेरील माणसे घेऊन. जागृत भाऊबंदी संघटना मग नव्याने सजली. कार्यकर्त्यांसंबंधी काही धोरणे अंमलात आली, फक्त स्थानिक कार्यकर्त्यालाच समावेश आणि सामूहिक नेतृत्वाला प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे परिणाम बरा दिसून आला.

## सामाजिक काम म्हणजे नेमके काय ?

अशा कामात जेव्हा आपण शिरतो तेव्हा आपण निश्चित मित्र आणि शत्रू निर्माण करीत असतो. कारण आपल्या कृतीमुळे कुणाचे हित होते, कुणाचे अहित होत असते. आपण कितीही प्रयत्न केला तरी ही स्थिती आल्याखेरीज राहात नाही. जेव्हा आपण शासनाकडे जोरदार मागणी करतो तेव्हा आपणावर शासकीय वर्ग नाराज होतो. जेव्हा आपण स्थानिक अन्यायाविरुद्ध उभा रहातो तेव्हा आपले मायबाप बडे लोक आपणाला पाण्यात पाहतात. असं का होतं ? आपण सामाजिक काम करतो म्हणजे नेमकं काय करतो ? आपण एक वेगळा सामूहिक गट निर्माण करीत असतो. एक वेगळीच शक्ती निर्माण होत असते. आपण कुठल्याही भागात जा, त्या भागात पूर्वीपासून काही गट वावरत असतात ते धार्मिक, जातीय किंवा राजकीय असतात. त्याचं नेतृत्व करणारेही कोणी असते. अशा परिस्थितीत आपण जेव्हा संघटना बांधू पाहतो तेव्हा नेमकं आपण ही चाललेली घडी मोडीत असतो. पूर्वीच्या कुठल्या ना कुठल्या गटाचे लोक आपल्याकडे येत असतात आणि एक नवीन गट निर्माण होत असतो आणि इथेच बारीक विरोधाला सुरुवात होत असते.

अगदी सुरुवातीला आमच्याविषयी प्रचार केला गेला की, हे लोक ख्रिश्चन धर्माचा प्रसार करतात आणि हे आदिवासींना ख्रिश्चन करायला आले आहेत. त्यानंतर पोलिस चौकशी वगैरे. हा प्रचार करावयाला नॅन्सी ख्रिश्चन आहे हा धागा त्यांना पुरेसा होता. संघटनेनी जेव्हा स्थानिक तलाठ्याविरुद्ध पैसे खाल्याच्या आरोपाखाली आवाज उठविला. तेव्हा काही गटांनी आम्हाला विरोध केला.जेव्हा संघटनेनी पिण्याच्या पाण्यासाठी मोर्चा काढला तेव्हा काही लोकांनी मोर्चावाल्यांना मारहाण केली. अशावेळी संघटनेनी स्वतःची ताकद अजमावून व एखाद्या गटाला विश्वासात घेऊन कृती केल्यास त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता निश्चित कमी होऊ शकते.

सुरुवातीच्या काळात संघटनेची निश्चित वाटचाल नव्हती. कार्यक्रम होते पण त्याचा उद्देश स्पष्ट नव्हता. गेल्या काही वर्षांत संघटनेनी काही कार्यक्रम राबविले त्यापैकी बँक लोन हा कार्यक्रम बऱ्यापैकी अजूनही चालू आहे. संघटनेनी मॅच फॅक्टरी, खडू काम, बांबू काम, हाती घेण्याचे ठरविले पण त्यापैकी कुठलाही उद्योग संघटनेला सुरू करता आला नाही. संघटनेनी रेशन दुकान व सामूहिक दुकान २–४ वर्षे चालविले. सामूहिक दुकानात २ वर्षांनी लोकांचा सहभाग कमी झाला म्हणून सोडून दिले. बालवाडीचा कार्यक्रम चालू आहे. संघटनेनी प्रौढ शिक्षण, लिडरशिप ट्रेनिंग प्रोग्रॅम हाती घेण्याचे ठरविले होते पण ते सर्व चालविण्याची कुवत नाही हे नंतर कळले म्हणून हेही प्रोग्रॅम अर्धवट राहिले.

आता संघटनेची कार्यपद्धती स्पष्ट दिसते. संघटनेने रचनात्मक आणि संघर्षक कार्यपद्धतीचा अवलंब केला आहे. काही नियमित कार्यक्रम विकासाच्या दृष्टीने चालवायचे व वर्षाला एका प्रश्नावर लोकांना संघटित करायचे.

गावकी फंड चालविणे, बालविकास केंद्र, आरोग्याविषयी, कमी खर्चात लग्न इत्यादी कार्यक्रम नियमित स्वरुपात चालवित आहोत. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, जमिनीचा प्रश्न आणि जंगलाचा प्रश्न यावर लोकांना संघटित करणे आणि लोक जागृती निर्माण करणे, हा असा येत्या वर्षातला संघटनेच्या कार्यक्रम आहे.

**जागृत भाऊबंदी संघटना**
मार्गाचीवाडी, पो. पाथरज,
ता. कर्जत, जि. रायगड



# श्रमिक क्रांती संघटना

मुंबईत झालेल्या एका राष्ट्रसेवा दलाच्या शिबिरात तारा प्रकल्पाचे बीज रूजले. या शिबिराला डॉ. जी. जी. पारिख हे प्रसिद्ध विचारवंत आले होते. डॉ. पारिख युसूफ मेहेरअली या ट्रस्टच्या कार्यकारिणीचे एक विश्वस्त व पदाधिकारी होते. स्वातंत्र्याच्या चळवळीत तरुण पुढाऱ्यामधील युसूफ मेहेरअली हे एक प्रभावी व्यक्तीमत्व. त्यांच्या स्मरणार्थ युसूफ मेहरअली ट्रस्ट उभारला गेला होता. डॉ. पारिखांनी आपल्या भाषणात शिबिरार्थींना म्हटलं– 'आम्हाला पनवेल जवळच्या तारा खेड्यातील आदिवासींमध्ये काम करायचंय. या कामात सहभागी व्हायला तुम्हाला आवडेल का?' युसूफ मेहेरअली सेंटरकडून सर्व प्रकारची मदत देण्याचं त्यांनी कबूल केलं. राजीव पाटील, सुरेखा दळवी आणि इतर काही तरुणांनी हा विडा उचलला.

अठ्ठ्याहत्तर सालच्या जून महिन्यात काम सुरू झालं. सुरवातीस हादंबा, बानुबाईचीवाडी आणि खैरात हे तीनच पाडे कामासाठी निवडले. या पाड्यात जास्त करून कातकरी व ठाकरांची वस्ती आहे.

पहिल्या वर्षी कार्यकर्त्यांनी लोकशिक्षण व आरोग्य-रक्षण या दोन गोष्टींवरच जास्त भर दिला. या कार्य-क्रमातून त्यांना लोकांचा विश्वास कमावता आला. कामाचा श्रीगणेशा लहान मुलांच्या वर्गापासून झाला. कार्यकर्ते आठ महिने सातत्याने झटले. त्यांनी आदि-वासींची मनं जिंकून घेतली. हळूहळू आदिवासी आपल्या प्रश्नांबाबत बोलते होऊ लागले. अनेक अडचणीतून मार्ग काढत कार्यकर्त्यांनी प्रौढ साक्षरता वर्ग काढले, यासाठी स्थानिक कार्यकर्ते उभे झाले.

सरकारी शालेय अभ्यासक्रमाचा आणि आदिवासींच्या रोज खऱ्या जीवनाचा काहीच मेळजोळ बसत नाही. हा अभ्यासक्रम जास्त करून शहरी जीवनावर आधार-लेला. मग आदिवासींना तो परका वाटतो यात काय नवल? शहरी जीवनात व इथल्या पाड्यात जमीन अस्मानाचं अंतर. आदिवासी आईबाप कामाला गेले की रांगत्या मुलांना सांभाळायची जबाबदारी मोठ्या भावंडावर येऊन पडते. घरात गाईगुरं असली तर त्यांना चरायला न्यायचं काम मुलंच परंपरागत करत आली आहेत. आपली शाळेची वेळ, अभ्यासक्रम हा सारा शहरी चित्रावर आधारलेला, त्याचा या वातावरणाशी संबंध तुटलेला. साहजिकच पोरांबिरांच्या मागचा शाळेत जाण्यासाठी आईबापाचा ससेमिरा चुकलेला. परिणामतः समाज शिक्षणापासून वंचित राहणारा.

**पाड्यातच शाळा**

ही सर्व परिस्थिती लक्षात घेऊन कार्यकर्त्यांनी पाड्यातच एक शाळा काढायचं ठरवलं. शाळेच्या वेळा मुलांची सोय पाहून आखल्या. आदिवासी जीवनाचा पोषक असा अभ्यासक्रमही हळूहळू कार्य-कर्त्यांनी तयार केला. पहिली दोन वर्षे शाळा

---

## छळाचा बदला

मूळ रहिवासी आदिवासी येथला
इथल्या सावकारानं आदिवासी लुटला ।।
आदिवासी शिक्षण नाही शिकला
म्हणून सावकारी जाळ्यात फसला
त्याच्या जमिनीचा कब्जा त्यानं घेतला
आदिवासी बिचारा भोळा
कुणी आल्यावर पाटील तुम्हीच बोला
मामलेदाराच्या कागदावर
मामलेदाराच्या कागदावर आंगठा घेतला ।।
सावकार समजू नका तुम्ही भोळा
आपल्या जमिनीवर पहिला त्याचा डोळा
आपल्या जमिनीचा
आपल्या जमिनीचा कस त्यानं खाल्ला ।।
आदिवासीनं एकी केली
सावकारावर पाळी आणली
आमच्या छळाचा
आमच्या छळाचा बदला आम्ही घेतला

---

झाडाखालीच भरे. मग हादंबा पाडयावरच्या लोकांनी नियमित शाळेची मागणी केली. नुसती मागणी करूनच ते थांबले नाहीत तर त्यांनी शाळेसाठी एक खोपी पण बांधून दिली. या कामात मुंबईच्या एका कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या पथकानं मदत केली. युसूफ मेहेरअली सेंटर पण मदतीला पुढे सरसावलं १९७९ च्या जुलै महिन्यात तारा प्रकल्पाचे हितचिंतक आणि मित्र-मैत्रिणी आले. त्यांच्या हजेरीत शाळेचं उद्घाटन झालं. तिन्ही पाडयावरची मुलं नियमित शाळेला येऊ लागली. कार्यकर्त्यांना इतर पाडयांमध्ये अजून शाळा सुरू करायच्या आहेत.

कुठलंही आजारपण आलं की, लोकांची भगताकडं फेरी ठरलेलीच. भगत झाडपाल्याची औषध करतो अन् जादूटोणाही करतो. मग कसला का रोग असेना? लोकांना फसविण्यात तो फार वाकबगार आहे हे कार्यकर्त्यांना उमजलं. त्यांनी हा प्रश्न हाती घ्यायचं ठरविलं. सुरवात झाली खरूज निर्मूलनाच्या कार्यक्रमापासून. लोकांना पटवून दिलं की योग्य ते औषधपाणी केलं की अनेक रोग बरे होतात. आजारपणं नाहिशी होतात. लोकांचा प्रतिसाद वाढायला लागल्यावर युसूफ मेहेरअली सेंटरने एक दवाखाना सुरू केला. भगताकडे जाणारे लोक दवाखान्याकडे जाऊ लागले.

बहुसंख्य आदिवासी भूमिहीन आहेत. फारच कमी जणांपाशी थोडीफार जमीन आहे. तेही नेहमी कर्जात बुडलेलेच! अर्ध्यापेक्षा जास्त उत्पन्न कर्जफेडीतच जातं. तारा प्रकल्पाचे कार्यकर्ते अशा लोकांना कर्जाऊ बी-बियाणं देतात. त्यांनी आपल्या पायावर हळूहळू उभं रहावं असा त्यांचा उद्देश. बरेच भूमिहीन आदिवासी परसात टेकडीच्या उतारावर भाजीपाला लावतात. ही भाजी फक्त पावसाळयातच होते. या भाजीपासूनही त्यांना फायदा होत नाही. कारण अगोदरच दलालाकडून घेतलेले कर्ज आणि हेच दलाल आदिवासींकडून अगदी कमी पैशात भाजी विकत घेतात. आदिवासींच्या कष्टाकडे पाहिलं तर लक्षात येतं की या किंमतीचा आणि त्यांच्या मोलमजुरीचा काहीं ताळमेळच नाही. कार्यकर्ते आता कातकऱ्यांना सरळ बाजारातच जाऊन भाजी विकायला प्रवृत्त करत आहेत. त्यांनी सुचवलेला दुसरा मार्ग आहे. एकमेकांच्या आधाराने सहकारी तत्त्वावर भाजीविक्रीची सोय करावी.

आता कार्यकर्ते हळूहळू लोकांना संघटित करायच्या प्रयत्नात दिसून येतात. ते वेळोवेळी शिबिरं घेतात, प्रौढ शिक्षणवर्ग चालवतात. स्थानिक कार्यकर्त्यांच्या आठवडयात व पंधरवडयात बैठका घेतात. त्यांना उमजून चुकले आहे की, जिथली शोषणव्यवस्था जबरदस्त असते तिला तोंड द्यायला संघटनाशिवाय पर्याय उरत नाही. केवळ विधायक काम करू म्हटले तर सर्व प्रश्न तडीला नेता येत नाहीत. संघर्षाची आवश्यकता त्यांना पटलेली आहे.

### गुन्हेगारीचा शिक्का

ब्रिटिशांच्या काळात कातकऱ्यांवर गुन्हेगार जमातीचा शिक्का बसला. स्वातंत्र्यानंतर कागदोपत्री हे शिक्के खोडण्यात आले पण अजून परिस्थिती जैसेथेच आहे. अजून तिकडच्या भागात आजूबाजूला कुठं चोरीचपाटी झाली की, "पकडा कातकऱ्यांची मुंडी" असाच प्रकार घडतो. जमीनमालक आणि सावकार हे

---

## आता मागे हटणे नाही

उठाव आवाज एकीचा
दुफळी आता फोडण्याचा
आदिवासी स्वातंत्र्याचा
कातकरी स्वातंत्र्याचा उठाव आवाज ॥ धृ ॥
भिऊ भिऊनी गप्प राहिलो
फार माजली मालकशाही
नाट कराया तिचा एकदम
सुरू करा मोहीम आपुली ॥ १ ॥
उपाशी राहून ठार झालो
विश्वास ठेऊन खलास झालो
नाट कराया भिती एकदम
लढू आता खांदा मिळवून ॥ २ ॥
संघटना आता आपली बांधूनी
घेऊ आपले हक्क जिंकूनी
पक्की बांधण्या तिचा एकदम
गुंफू आपले एकीत जीवन ॥ ३ ॥
आता मागे हटणे नाही
तहनाम्याच्या बाता नाही
पुढेच घुसणे ठरली नीती
आपुची एकी अंतीम शक्ती ॥ ४ ॥

तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेले. या परंपरागत चालत आलेल्या अन्याय आणि शोषणाविरुद्ध आदिवासीना संघटित करण्याच्या निर्णयावर शिक्कामोर्तब झाले. १९८३ साली महाराष्ट्रातल्या बहुतांश सामाजिक संघटनांचा उद्देश लोकशाहीवादी चळवळ बांधण्याचा आहे. या संदर्भात भूमिसेना, श्रमिक संघटना, कष्टकरी संघटना ही काही चटकन डोळ्यासमोर येणारी नावे. याच उद्दिष्टासाठी तारा प्रकल्पाचे कार्यकर्ते, स्थानिक आदिवासी आणि बिगर आदिवासी नेतृत्व एकत्र येऊन श्रमिक क्रांती संघटनेची स्थापना केली.

संघटनेची आता मुख्य कामे म्हणजे नवे कार्यकत तयार करण्यासाठी शिबिरे घेणे, भाजीपाला विक्रीसाठी सहाय्य करणे. कार्यकर्ते काळसूत्री बाहुल्यांच्या खेळात दारू पिण्याचे वाईट परिणाम, अंधश्रद्धेपासून सुटका अशा प्रकारचे विषय हाताळतात. सामुदायिक लग्नाचा कार्यक्रम घडवून आणण्यासाठी ते लोकांना तयार करीत आहेत. अशी काही लग्ने झालेली आहेत. यातून कर्ज-मुक्ती होते लग्नगडयाची प्रथाही मोडते. बाहेरून येऊन या भागात सातत्याने काम करणारी एकमेव कार्यकर्ती म्हणजे सुरेखा दळवी. ती कायदेविषयक बाबींमध्ये मन घालते.

पोलीस व जमीनदार संगनमताने व इतर हित-संबंधीयांमुळे कातकऱ्यांवर खोटे-नाटे खटले भरतात. लोकांच्या छळवणकीचा हा एक अतिशय सभ्य मार्ग. तेव्हा अशा प्रसंगी कायदेविषयक सल्ला अतिशय मोलाचा ठरतो. अनेकदा मुस्लिम स्त्रीयांना पोटगीच्या कायद्याची माहिती नसते. त्यादेखील हळूहळू कायदे-विषयक शिबिराला येताना दिसू लागले आहे.

संघटना आता युसूफ मेहेरअली केंद्रापासून अलग झाली आहे. तरी केंद्राच्या सहकार्याने आरोग्य निवारण व काही आर्थिक योजना घेतल्या जातात. कुष्ठरोगाचे निदान हा आरोग्य प्रकल्पातला असाच एक कार्यक्रम. भूहिन आदिवासीना घरे बांधण्यासाठी सबसिडीच्या ज्या योजना आहेत त्या योग्य रितीने अंमलात आणल्या जाव्यात यासाठी संघटना जागरूक आहे. संघटनेने काही चुनाभट्टीत, विटांच्या भट्टीत वेठबिगार करणाऱ्या काही मजुरांचा प्रश्न धसाला लावलेला आहे. यापैकी काही जण वेठबिगारीतून सुटलेही आहेत. वीटभट्टीतल्या मजुरांना व शेतमजुरांना वाढीव दर मिळावेत यासाठी संघटना प्रयत्नशील आहे.

रायगड तालुक्यातील कर्मा प्रकल्पाप्रमाणे तारा प्रकल्प ग्रामीण गरीबांना काही आवश्यक सेवा पोचवाव्यात या हेतूने सुरू झाला; पण यातूनच एक लढाऊ व मूलभूत मानवी हक्कांसाठी झगडणारी संघटना बांधली गेली. महाराष्ट्रात लोकशाही मार्गाने काम करणाऱ्या इतर अनेक संघटनाप्रमाणे श्रमिक क्रांती संघटनेचे ध्येय आहे. ग्रामीण गरीबांना व मजुरांना वर्गीय पायावर संघटित करण्याचे. याबाबतीत संघटनेचे यशापयश जोखायला अजून काही वर्षे जावी लागतील. हे नक्कीच.

स्थानिक पातळीवर कार्यकर्त्यांची किती मजबूत फळी बांधली जाते यावरच संघटनेचे बळ अवलंबून राहील.

## निरगुडे आश्रमशाळेचा रौप्यमहोत्सव

ग्रामविकास मंडळ, (निरगुडे, ता. पेठ) संचालित नेहरू आश्रमशाळेला दि. १४ नोव्हेंबर १९८४ रोजी पंचवीस वर्षे पूर्ण झाली.

संस्थेचे व शाळेचे आधारस्तंभ आ. रा. खंबाईत यांचाही नोव्हेंबर ८४ मध्ये ६१ व्या वर्षात पदार्पण निमित्ताने सत्कार करण्यात आला.

या निमित्ताने विज्ञान प्रदर्शन, हस्तकला, चित्रकला रांगोळी अशी मुलांना आनंद देणारी प्रदर्शने व स्पर्धा तर झाल्याच, पण याशिवाय 'शेती, सहकार व धान्य खरेदी विक्री आणि आजच्या शिक्षणाचा आदि-वासींच्या आर्थिक विकासात कितपत फायदा' या विषयांवर मौलिक चर्चा झाली.

आदिवासी क्षेत्रात रौप्यमहोत्सव करणाऱ्या या शाळेला हाकाराच्या शुभेच्छा व श्री. आ. रा. खंबाईत यांचे दीर्घायू-चिंतन.

# इंदरवेलीचे जागृत आदिवासी

□ डॉ. सौ. शैलजा देवगांवकर

आंध्रप्रदेशच्या आदिलाबाद जिल्ह्यातील उटनूर या भागात गोंड, परधान; थोटी, आंध, नाईकपोड आणि कोलाम ह्या लोकांची बरीच वस्ती आहे. उटनूर-जवळील हा पट्टा 'इंदरवेली' या नावाने ओळखला जातो. लोक अत्यंत मागासलेले आणि निरक्षर असल्यामुळे इतर आदिवासींप्रमाणे त्यांचे फार शोषण होतच असते. धार्मिकता आणि परंपराप्रियता ही वैशिष्टये त्यांच्यातही आढळतात.

उत्सवप्रियता हे सर्वच आदिवासी जमातींचे वैशिष्टय त्यांच्यात नसले तरच नवल. दसरा, दिवाळी, संक्रांत, आखाडी आणि पोळा तसेच 'उगादी' इ. सण दरवर्षी मोठ्या धूमधडाक्याने साजरे करतात. त्यावेळी नृत्य व संगीत ह्यांची लयलूट असते. 'दंडारी नृत्य' हा प्रकार तर दसऱ्यापासून दिवाळीपर्यंत चालतो. सागवानाला पालवी फुटली म्हणजे त्यांचा 'आखाडी' सण येतो. जूनमध्ये शेतात नवीन अंकूर फुटू लागले की हे लोक बीज देवाची पूजा करतात. ह्या सणाला पुरुष नृत्य करतात आणि 'ढेमसे' ची गाणी गातात.

हे श्रद्धाळू आणि उत्सवप्रिय आदिवासी शांतताप्रिय आणि सहनशील आहेत. परंतु प्रसंग आलाच तर धैर्याने आणि शौर्याने वाघाशी झुंज देणारे त्यांचे रक्त उसळते व क्रांती करायलासुद्धा ते पुढे सरसावतात. हे त्यांच्या इतिहासातील जुन्या आणि नजिकच्या काळातील प्रसंगावरून दिसून येते. निझामशाहीच्या काळात निझामाने आदिवासींना जाचक असे कायदे केले. आदिलाबाद भागातील आदिवासी लोकांनी थोडीशी नाराजी व्यक्त करताच निझामाने त्यांच्यावर जबरदस्त कर बसविले. या करांच्या विरुद्ध आदीवासींनी आंदोलन सुरू केले. निझामाने ते मोडून काढण्याचा चंग बांधला आणि फार मोठ्या प्रमाणावर अन्याय व कुठे कुठे गोळीबारही केला तेव्हा मात्र आदिवासींचे पित्त खवळले आणि आदिलाबाद सभोवतालच्या प्रदेशातील सर्व आदिवासी प्रतिकारार्थ दंड थोपटून उभे राहिले. तेव्हा मात्र निझामाचे अवसान गळाले. त्याचा एक सल्लागार युरोपीयन होता. त्याने इंग्लंडमधील एका तरुण मानववंश शास्त्रज्ञाचे नाव सुचविले. निझामाने त्याला बोलावून घेतले. या शास्त्रज्ञाने निझामाची विनंती स्वीकारली पण ती अशा अटीवर की त्याच्या कारभारात निझामाने ढवळाढवळ करू नये आणि त्याच्या सांगण्याप्रमाणे विकास कार्यक्रम चालू द्यावा. तेव्हापासून हा तरुण शास्त्रज्ञ म्हणजे प्रो. सी. व्हॉन-फ्युरर-हायमेन्डॉर्फ हे आदिलाबाद भागातील आदिवासींशी इतके घनिष्ट संबंधीत झाले की, आजही त्या भागातील लोक त्यांना ओळखतात आणि मानतात. कोणी त्यांचा उल्लेख 'हमिंदराव' किंवा 'हनमंतराव' असाही करतात. या जागृत आदिवासींना विकासाप्रत नेण्यासाठी प्रयत्न तर झालेच पण त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांच्या धार्मिक समारंभाचाही फ्युरर हायमेन्डॉर्फ ह्यांनी कसा उपयोग केला त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे 'केसलापूर' येथील नागोबाच्या यात्रेत भरविण्यात येणारा आदिवासी दरबार होय.

## आदिवासी दरबार

उटनूर पंचायत समिती विभागातील मुटनूर या गावाजवळ केसलापूर हे खेडे असून त्याला लागून एका टेकडीजवळ नागोबाचे जुने मंदिर आहे. दरवर्षी पौष महिन्यात अमावास्येला येथील आदिवासींची यात्रा भरते. ह्या यात्रेच्यानिमित्ताने दूरदूरच्या भागातील गोंड येथे येतात त्याचा फायदा घेऊन प्रो. हायमेन्डॉर्फ ह्यांनी आदिवासी दरबारची पद्धती सुरू केली. आता तर तेथे एका मोठ्या ओटयावर एक खुला दरबार हॉल बांधलेला असून त्याला 'हायमेन्डॉर्फ हॉल' असे नावही दिलेले आहे. दरबाराच्या दिवशी जिल्हाधिकारी, जिल्ह्यातील व जिल्हा परिषदेमधील इतर महत्त्वाचे अधिकारी या दरबारात येतात आणि आदिवासीही आपल्या दप्तर दिरंगाईमुळे पडून राहिलेल्या तक्रारी आणि अर्जांसह तिथे येतात. त्यांच्या तक्रारीची दखल घेण्यात येते आणि अधिकारी मंडळी तिथल्या तिथे निर्णय देतात. अत्यंत आदर्श पद्धतीने हा दरबार चालविण्यात येतो. १९७९ साली या दरबाराला भेट दिली असता, त्या दरबाराचे स्वरूप आणि आदिवासींचा उत्साह बघून अत्यंत समाधान वाटले. मंत्र्यांची उपस्थिती आणि त्यांच्या मागे लागून

त्यांच्या भाषणबाजीत जाणारा कामाचा वेळ या गोष्टी मात्र खटकल्या.

अधिकारी मंडळींनी कल्पकता न वापरता आणि आडमुठेपणाचे धोरण वापरून आदिवासींच्या प्रश्नाला हात घातला तर या भागातील आदिवासी क्रांतीसाठी पुन्हा सज्ज होऊ शकतात हे मात्र १९८१ साली दृष्टोत्पत्तीस आले. भूमातेला खरोखरच आई मानणारे हे आदिवासी अनेक वर्षेपर्यंत नांगराचा उपयोग करीत नसत. आणि त्याचे परंपरागत कारण असे की, जिला आई मानले तिच्या छातीवरून नांगराचे फाळ फिरवून चर पाडणे हे कृतघ्नतेचे व क्रूरपणाचे कर्म असे ते समजत. विकास प्रक्रियेमुळे आता जरी ते नांगर चालवीत असले तरी त्यांची भूमातेवरील श्रद्धा कणभरही कमी झालेली नाही. भूमी आणि भूमीचे कसणे हा केवळ उपजिवीकेसाठी केलेला एक यांत्रिक आर्थिक व्यवहार असे न मानता आपल्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातील एक पूजनीय घटक म्हणून ते जमिनीकडे आणि शेती करण्याकडे पाहतात. त्यामुळे जमिनीबाबत झालेल्या अन्यायामुळे चिडून गेलेले आदिवासी किती उग्र स्वरूप धारण करू शकतात ह्याचे प्रत्यक्ष उदाहरण म्हणजे 'इंदरवेलीची क्रान्ती'!

## जीना है तो मरना सिखो

मुटनूर पंचायत समिती अंतर्गत गीन्तेरा गावात तोया गुडा, मरका गुडा, तुम्बा गुडा असे विविध गुडे असून त्यात मुख्यत्वेकरून गोंड आदिवासींचीच वस्ती आहे. गावातील बिगर आदिवासींनी आणि जंगल खात्यातील लोकांनी ह्या आदिवासींची जमीन बळकावून तेथे स्वतःच शेती करणे चालू कले तेव्हा आदिवासीं भूमिहीन झाले व मुटनूर येथे येऊन शेती करू लागलेत. तिथे त्यांनी काही शहाण्या माणसाचा सल्ला घेऊन बिगर आदिवासी लोकांवर दावा लावला व केस जिंकली. मात्र त्या लोकांनी हायकोर्टात अपील लावून पुन्हा जमिनीचा ताबा मिळविला. जी जमीन त्यापूर्वी कधीच त्यांची नव्हती ती त्यांची कोर्टाच्या निर्णयामुळे झाली. तेव्हा सात्विक संतापाने आदिवासींनी चिडून जाऊन जन-जागरणाची मोहिम उघडली आणि एकत्र येऊन असे ठरविले की, शेतात पिके उभी आहेत, ती आपण तोडायची कारण त्याच्यावर आपला हक्क आहे. तोया गुडाच्या मागच्या बाजूला श्री हनुमानाचे एक मंदिर आहे. त्याच्यामागे एक टेकडी आहे. त्या टेकडीवर नगारा वाजू लागला की गोंड लोक एकत्र होत आणि त्यांच्या सभा होत. सभेचे सर्व कामकाज गोंडी भाषेत चालत असे आणि निर्णय होत असत.

दिनांक २० एप्रिल १९८१ हा क्रांतीकारक दिवस उजाडला. ह्याच दिवशी इंदरवेलीचा बाजारही होता. 'जीना है तो मरना सिखो' अशा निर्धाराने आदिवासींची सभा बोलाविण्यात आलेली होती. पोलीसांना आदिवासींच्या सभेची कुणकुण होतीच. ती सभा होऊ न देण्याचा त्यांचाही इरादा होता. ज्या ज्या रस्त्याने आदिवासी लोक येण्याची शक्यता होती त्या त्या रस्त्यावर सशस्त्र पोलीस रस्ता अडवून उभे होतेच. पोलीसांनी अडवणूक करताच गोळीचे प्रत्युत्तर दगड आणि बाणानेच पोलिसांना मिळाले. पोलीसांनी अंदाधुंद गोळीबार केला. खूप लोक जखमी झाले तर काहींनीं प्राणार्पण केले. पीट्टा भोंगरम या गावचे रामा मडावी, जंगू मडावी व घाघुरू कोटनाक ह्यांनी घटनास्थळीच मृत्यूला कवटाळले. ह्याच गावच्या वेटो इसरूबाईने पीक कापण्याच्या विळ्यानेच पोलीसावर वार केले आणि ती पण जखमी झाली. भीमराव सिडाम, मडकूबाई कोनाका, इमरू वेट्टी, देवराव जुगनाक, जलपती पेट्टी व मानको मेश्राम हे देखील गंभीररित्या घायाळ झाले. उटनूर तहसिलीतील शम्भू मडावी, जंगूबाई मडावी, गोविंद मानकू पेंदूर हे देखील अत्यवस्थ म्हणून दवाखान्यात दाखल करण्यात आले. गौरापूरचे इरका मारू, हेर कुमरा जग्गू, बोरुजग्रामचे आणि सालेगुडाची गंधारीबाई आत्राम जखमी झाले. ह्या लढ्याची माहिती समजताच आंध्रप्रदेशचे त्यावेळचे मुख्यमंत्री टी. अंजय्या ह्यांनी घटनास्थळाला भेट देऊन शांतता प्रस्थापित केली आणि मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीच्या नातेवाईकाला रु. १०,०००/- आणि जखमी व्यक्तीला रु. ५,०००/- तात्काळ दिले. अन्यायाच्याविरुद्ध लढून गोंड आदिवासींनी न्याय प्राप्त करून घेतला. आज त्या त्या आदिवासींना त्यांच्या त्यांच्या जमिनी परत मिळाल्या आहेत.

इंदरवेलीच्या उदाहरणावरून आदिवासी जागृत झाले तर ते आपल्या न्याय्य हक्कांसाठी झगडू शकतात हे स्पष्ट दिसते. जागृत आदिवासी आर्थिक शोषण चालवून घेणार नाहीत, बिगारी मरणार नाहीत आणि संघटितपणे लढा देतील.

OOO

# आदिवासी संघटना : चर्चासत्र

□ रमाकांत पाटील

महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील दलित–आदिवासी भूमिहीन, शेतमजूर व कष्टकऱ्यांमध्ये काम करणाऱ्या संघटनांच्या कार्यकर्त्यांचे ३ दिवसांचे शिबीर आदिवासी जाणीव जागृती केंद्र व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. १५ ते १७ मार्च रोजी पुणे विद्यापिठात आयोजित करण्यात आले होते.

शिबिराच्या सुरुवातीला आदिवासी जाणीव जागृती केंद्राचे संचालक श्री. शरद कुलकर्णी यांनी शिबिरामागची कल्पना स्पष्ट केली. ग्रामीण भागात वेगवेगळ्या संघटना काम करताहेत. त्या संघटना कशा उभ्या राहिल्या, त्या उभ्या करत असताना त्यांना कोणत्या अडचणी आल्या, त्या अडचणींना संघटना कशा सामोऱ्या गेल्या हे समजून घेण्याचा प्रयत्न करावा. म्हणून हे शिबीर असल्याचे नमूद केले व वेगवेगळ्या संघटनांनी या बाबतीत आपले अनुभव येथे सांगावे असे सुचविले. संस्था व संघटनांची कामे वेगवेगळ्या स्वरूपाची असून प्रत्येक स्वरूपाच्या कामाच्या काही मर्यादाही आहेत. या बाबतीत त्यांनी राजस्थानमधील एका संस्थेच्या कामाची मर्यादा, अनुभव म्हणून कार्यकर्त्यांसमोर मांडली. येथील संस्था आर्थिक विकासाचे काम चांगल्या प्रकारे करीत आहे. परंतु या भागात अल्पवयातच होणाऱ्या मुलींच्या लग्नाबाबत काही प्रयत्न होत नाहीत. अशावेळी आपण यशापयशाचे काय निकष लावायचे हाही प्रश्न उभा राहतो. मात्र आज महाराष्ट्रात व बाहेरही अनेक संघटना खऱ्या अर्थाने तळागाळातील लोकांचे प्रश्न घेऊन उभ्या राहत आहेत. त्या अनुषंगाने येथे चर्चा व्हावी अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या चर्चा सत्रात जागृत आदिवासी संघटना, श्रमजिवी संघटना, भूमिसेना, श्रमिकक्रांती संघटना, श्रमिक संघटना, रचनात्मक संघर्ष समिती इत्यादी संघटना सहभागी झाल्या होत्या.

जागृत आदिवासी संघटनेचे श्री. सतीश गोगुलवार म्हणाले, आमच्याकडे कार्यकर्त्यांची कमतरता नाही. संथ परंतु सातत्याने काम चालू आहे. आता महिलांचा सहभाग कामात असला तरी महिलांच्या नेतृत्वाची उणीव भासते. रो.ह.यो. कामात संघटनेला मोठे यश मिळाल्याने ह्या योजनेची अंमलबजावणी नीट व्हावी म्हणून कार्यकर्त्यांचे सातत्याने प्रशिक्षण चालू आहे. लोक त्यादृष्टीने संघटित होतात. त्यामुळे आता ६–७ महिने सातत्याने काम मिळत असून त्याचा परिणाम तेथील आर्थिक सामाजिक परिस्थितीवर झाल्याचे दिसून येत आहे. एकतर त्यांचा रोजगार वाढला. साहजिकच हातात पैसा आला व त्याचे कर्ज घेणे बंद झाले. हा एक मुख्य फरक संघटना इतरही अनेक स्थानिक प्रश्न घेऊन काम करीत आहे.

## संघटनेचा विजय

भूमिसेनेचे श्री. रामभाऊ कडू यांनी संघटनेने जमीन हस्तांतराविरुद्धच्या लढ्यात कशी झुंज दिली त्याची माहिती दिली. जमीन हस्तांतराच्या केसेसचे निकाल एकाच दिवशी प्रत्यक्ष मनोरला येवून दिले गेले. त्यामागे संघटित शक्तीचा विजय होता असे सांगून त्यांनी पुढे आणीबाणीच्या काळात कर्जमुक्ती, वेठबिगारी, जमीन हस्तांतराची प्रकरणे, जमीन वाटप ह्यासारख्या अनेक प्रश्नांत होणाऱ्या अन्यायाविरुद्ध उठविलेल्या आवाजाची माहिती दिली. अनेक ठिकाणी बांधील गड्यांना मुक्त केले. किमान वेतनाच्या प्रश्नासाठी लढा दिला. काही ठिकाणी त्याकरिता संप केले गेले. संघटित प्रतिकार केला. फॉरेस्ट प्लॉट, रो.ह.यो.ची अंमलबजावणी इ. कामातही जाणीवपूर्वक सातत्याने लक्ष दिले. बोईसर भागात रेती मजुरांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध संघटना उभी राहिली. ह्या सर्वांचा परिणाम म्हणून विरोधी शक्तीही सक्रिय संघटित होऊ लागल्या. अलीकडेच सफाळे भागात श्री. काळूराम धोदडे व इतरांवर हल्ला झाला. निहे भागात त्यांनाही मारण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. अशा संघर्षात्मक परिस्थितीतच तरुण मंडळाची स्थापना, कमी खर्चात सामूहिक लग्ने, सहकारी पद्धतीवर रेती व्यवसाय संघटित करण्याचा प्रयत्न इ. प्रयोगाचीही त्यांनी माहिती दिली.

श्री. विवेक पंडित यांनी श्रमजिवी संघटनेच्या कामाची सुरुवात मुळात चॅरिटेबल ट्रस्टमधून झाल्याचे सांगितले. तरुण मंडळ, खेळ, व्यायाम इ. कार्यक्रमाने ट्रस्टने काम सुरू केले. मात्र युवकांचा सहभाग मिळत नव्हता तेव्हा त्यामागची कारणे शोधताना ही मुले मजुरीवर जातात, दिवसभर काम–रात्री घरी, त्यामुळे आम्ही सुरू केलेल्या कामात ते सहभागी होणे अशक्य आहे असं कळून चुकलं. पुढं त्या कामाचं स्वरुप, त्यांना मिळणारी मजुरी इ. माहिती घेतली, तेव्हा अल्पशा मजुरीवर, पगारावर ते राबत असल्याचे दिसून आले. त्यातून घरगडी, लग्नगडी स्वरूप उघड झाले. तेव्हा ह्या वेठबिगारांना मुक्त करण्याचे काम करण्याचं ठरवलं. किमान वेतनाशी निगडीत असलेल्या ह्या प्रश्नाचा पाठपुरावा केला. सावकारांचा प्रचंड विरोध ह्यावेळी झाला. सरकारी अधिकारी, पोलीस, राजकीय पक्षाचे पुढारी, ज्यामध्ये पुरोगामी म्हणवणाऱ्यांचा समावेश होता, सर्वच विरोधी उभे राहिले. मात्र कायद्याच्या आधारे संघटित प्रयत्नाने १९८ वेठबिगारांना ३ दिवसात मुक्त केलं. खर तर हा दखलपात्र गुन्हा आहे. परंतु बराच काळ संबंधितांनी त्याची दखल घेतलीच नाही. पुढे मालकांना अटक झाली. मात्र ह्याचा परिणाम मजुरांना कोठेही काम मिळू शकले नाही. १॥ महिने कुणीही काम दिलं नाही. लोक मात्र पूर्वापार उपासमार सहन करतच होते त्यात फार मोठा फरक त्यांना जाणवला नाही. साहजिकच मालकांच्या ह्या असहकारामुळे संघटनेत फूट पाडण्याचा, वेठबिगारांना नमविण्याचा प्रयत्न अयशस्वी ठरला. सुप्रीम कोर्टापर्यंत प्रकरणे गेली. न्याय मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे. वेठबिगारांच्या पुनर्वसनाची तरतूद कायद्यात आहे पण प्रत्यक्षात त्याचा अंमल नाही. त्या दृष्टीनेही प्रयत्न चालू असल्याचे सांगून श्री. पंडित यांनी १५ ऑगस्ट रोजी झेंडावंदन करू इच्छिणाऱ्या आदिवासी बांधवांना अटक करून त्यांना कसा त्रास देण्यात आला ह्याचाही अनुभव सांगितला. ह्या भागात अनेक भूमिहीन मजुरांना प्लॉट वाटप झालेले असले तरी त्यांना अजूनही प्रत्यक्षात प्लॉटचा ताबा मिळालेला नसलेली अनेक प्रकरणे तसेच जमीन हस्तांतर इ. अनेक प्रश्न संघटना हाती घेत असून ते सोडविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे त्यांनी सांगितले. श्री. सुभाष निंबाळकर यांनी रचनात्मक संघर्ष समितीच्या कामाची माहिती दिली. छात्र युवा संघर्ष वाहिनीमार्फत कामाची सुरुवात झाली आहे. गावरान–पडिक जमिनीवरील अतिक्रमणाविरुद्ध संघटना लढत असली तरी ज्यांचेवर अन्याय होत आहे त्या दलितांचा अजूनही अपेक्षित सहभाग मिळत नसल्याचे त्यांनी नमूद केले. त्या अनुषंगाने काम कसे उभे करता येईल ह्यासंबंधी चर्चा झाली. इंदवी तुळपुळे हिने सुटे-सुटे प्रश्न घेऊन सुरुवातीला काम करावे लागेल व त्यादृष्टीने गायरान प्रश्नाचा पाठपुरावा व त्या माध्यमातूनच सहभाग वाढविण्याचा प्रयत्न करावा लागेल असे सुचविले.

## जनसंघटना व स्त्रियांचा सहभाग

शरद कुलकर्णी प्रास्ताविकांत म्हणाले, सर्वप्रथम आपण स्त्रियांचा सहभाग म्हणजे नेमके काय हे स्पष्ट केले पाहिजे. अनेक संघटनामध्ये स्त्रिया मोर्चावर मोठ्या प्रमाणात येत असतात. याला आपण खऱ्या अर्थाने सहभाग म्हणू शकतो का हा प्रश्न उभा करून ते म्हणाले, "जोपर्यंत निर्णयप्रक्रियेत स्त्रिया सहभागी होत नाहीत तोवर आपण संघटनात स्त्रिया सहभागी आहेत असे म्हणू शकणार नाही."

स्त्रियांना संघटनेत सामील करून घेताना बऱ्याच ठिकाणी एक भीती व्यक्त झालेली आहे, ती म्हणजे संघटनेत स्त्रियांमुळे अथवा त्यांचे वेगळे प्रश्न हाताळल्यामुळे फूट पडेल. म्हणजे प्रत्यक्ष संघटनेतही आणि नंतर संघटनेने कुठले प्रश्न हाताळावे, ध्येयधोरणे काय असावी, या दोन्ही बाबतीतली परिस्थिती पाहिली तर स्त्रियांवर अन्यायच होतो आहे हे दिसते.

अशी परिस्थिती आहे म्हणून आपण निकडीने हा प्रश्न हाती घेतला पाहिजे. संघटनेत इतर प्रश्न घेतले जात असतील तरी काही कार्यकर्त्यांनी स्त्रियांचे प्रश्न घेतले पाहिजेत. जनसंघटनात स्त्रियांचा कसा सहभाग आहे याकडे डोळे उघडून बघता यावे व ही परिस्थिती बदलण्यासाठी जे प्रयोग सुरू आहेत त्यांची नोंद घेता यावी म्हणून हा विषय मांडला आहे हे त्यांनी नमूद केले. या संदर्भात स्त्रियांची संघटनेच्या परिघातच काय परिस्थिती आहे हे विवेक पंडित यांनी नजरेपुढे आणले. एक कार्यकर्ता जर दारू पिऊन बाईला मारत असेल तर त्याच्या बाबतीत काय भूमिका घेण्यात यावी

हा प्रश्न त्यांनी उभा केला. याबाबत काही जणांनी दारू पिऊन संघटनेत यायचं नाही हा नियम केला आहे तर इतर संघटनांनी अशा कार्यकर्त्यांना काढून टाकण्याची तुरळक उदाहरणे आहेत. शोभा मुळे यांनी समाज-परिवर्तनासाठीच बांधिलकी मानणारे कार्यकर्ते आपल्या पत्नीशी वागताना कसे वागतात त्यातला विरोधाभास दाखवून दिला. त्यांनी दिलेले उदाहरण पुरेसे बोलके आहे. नवरा कामानिमित्त शिबिराला जात असला अन् त्याला बाईने विचारले, 'कुठं जातोस' तर तो म्हणणार 'तुला काय समजतंय त्यातलं? तुला काय करायच?' म्हणजे बायांना अक्कलच नाही. त्यांची बुद्धीमत्ताच जणू दुय्यम आहे हा संकेत पाळण्याचं काम तो कार्यकर्ता इमानेइतबारे करताना दिसतो. यावर वाहरू सोनवणे यांनी एक महत्त्वाचा मुद्दा मांडला. ते म्हणाले, "अपण केवळ संघटनेच्या संदर्भात स्त्रियांचा विचार करून चालणार नाही. आपल्या संपूर्ण संस्कृतीतच आणि म्हणूनच रोजच्या खऱ्या आयुष्यात कुठकुठली मूल्ये आहेत, ज्या स्त्रियांना दुय्यम लेखतात, त्यांचा वेगवेगळ्या अंगाने कानोसा घेतला पाहिजे अन्यथा विशिष्ट संदर्भात जे स्त्रियांचे प्रश्न पुढे येताहेत तेच प्रश्न म्हणजे स्त्रीमुक्तीचा आवाका अशी स्वतःची सोयीस्कर समजूत घालून घेतली तर स्त्रीमुक्तीबाबत आपली भूमिका कायदा एकांगी होईल. उदाहरणार्थ समान वेतन, समान नागरी यासाठी झगडणाऱ्या संघटना, कार्यकर्ते असतील. मात्र आपल्या रोजच्या बोलीभाषेतच पारंपारिक दृष्टिकोनातून पोसलेले स्त्रीविषयक शब्द भांडार आहे आणि आपण रोज ही भाषा वापरताना अगदी सहजासहजी स्त्रियांची पायमल्ली करत असतो ही त्यांना जाणीव नसेलही. ही सर्वांगीण जाणीव असली पाहिजे.

> स्त्री मुक्तीसाठी घरापासूनच प्रत्येकाने सुरवात केली पाहिजे. स्त्रीमुक्तीचे मोठमोठे प्रश्न आहेत, चर्चा होत रहाते, पण स्वतःच्या घरात काय घडते आहे याचा विचार केला तर काय दिसते? मी एकेदिवशी घरात बायकोचा परकर अन् साडी धुवत बसलो होतो, मस्त मजेत होतो. मनात स्त्रीमुक्तीचे विचारही होते. एकटाच होतो. कामात दंग होतो. एवढ्यात बाहेरून कुणाची तरी हाक आली. एकदम धसका बसला. हा माणूस आत आला तर? पाहिलं तर त्याला काय वाटेल हा प्रश्न. एवढी शरम!
>
> (श्री. वाहरू सोनवणे यांच्या भाषणातून)

वाहरू सोनवणे यांनी, स्त्रीला माणूस म्हणून दबवणाऱ्या मूल्य संदर्भात आपण स्पष्ट भूमिका घेतली पाहिजे; तिला निर्णय प्रक्रियेत स्थान मिळावं, तसंच तिला समानता मिळावी अशी भूमिका घेण्यापेक्षा, तिला विशेष संधी देण्याची आवश्यकता आपण मान्य केली पाहिजे व प्रत्यक्ष कृतीत आपण ही वागणूक ठेवली पाहिजे हे मुद्दे मांडले. शोभा मुळे यांनी मुली जेव्हा काम करतात तेव्हा त्याचं समाजात फार हसं होतं व त्यांच्यावर फार मोठं दडपण येतं हे नमूद केलं; याबाबत जागरूक होऊन वेगवेगळ्या संघटनांनी आपल्यापासून सुरवात केली पाहिजे असे त्यांनी सुचविले. विवेक पंडित यांनी म्हटलं की, स्त्री-मुक्तीचे विचार आपण आणावयाचे ठरवले तरी, पुरुषी संस्कृतीचा पगडा जायला वेळ लागतो त्यामुळे, वाहरूची जी परिस्थिती झाली तशी परिस्थिती होते. म्हणून आपण आपल्यावरील पुरुषी संस्कृतीचा पगडा जाणीवपूर्वक घालविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपल्या बायकोने आपली चूक नजरेसमोर आणून दिली तर ती निमूटपणे मान्य करायची तयारी पाहिजे.

या संदर्भात समान कामाची व कामाची वाटणी कशी असावी यावर साधकबाधक चर्चा झाली; तिला वेगळे वळण देण्यासाठी श्री. अशोक सासवडकर म्हणाले, बाईने अथवा पुरुषाने, कुणीही एकमेकांसाठी काही करणे वा न करणे शुल्लक आहे, महत्त्वाचा प्रश्न आहे निर्णय प्रक्रियेत स्त्रियांचा सहभाग आणावा की नाही. यावर बऱ्याच प्रतिक्रिया व्यक्त झाल्या.

श्री. सासवडकर यांचा मुद्दा सैद्धांतिक पातळीवर ठीक आहे. मात्र रोज नैमत्तिक वातावरणात जेव्हा स्त्री तिच्या रामरगड्यातून मोकळी होईल तेव्हाच कुठे तिला निर्णय प्रक्रियेत सहभागी व्हायला जराशी उसंत मिळते, हे सत्य इंदवी तुळपुळे यांनी समोर आणले.

श्री. सतिश गोगुलवार म्हणाले, जोवर स्त्रियांवर स्त्रीच्या गुलामी मानसिकतेचा व पुरुषांवर पुरुषी मानसिकतेचा प्रभाव आहे तोवर हे गाडं इंदवी सांगतेय ह्या रोजरगाड्यातच अडकून पडणार.

इंदवी तुळपुळे हा मुद्दा स्पष्ट करायला उदाहरण देऊन म्हणाल्या, पुरुषांना भारी काम जमतं व स्त्रियांना

नाही, अशा विचारसरणीचे स्त्री व पुरुष दोन्ही सारखेच बळी ठरतात. वाहरू सोनवणेनी नेमका खडा टाकला. ते म्हणाले, जे मुल्य आपण विचारात स्वीकारतो ते जापल्यात खोलवर रूजायला हवं आहे याची खबरदारी घ्यायला हवी.

## राजकीय पक्ष व लोकसंघटना

शिबिराच्या दुसऱ्या सत्रात राजकीय पक्ष व लोकसंघटना यात कोणत्या प्रकारचे संबंध असावे ह्या विषयांवर चर्चा झाली.

श्री. ठाकूर यांनी राजकीय पक्षांना संघटनेच्या कार्यकर्त्यांना प्रतिनिधित्व देण्यास सांगितले पाहिजे असे सुचवून सत्तेवर आपली माणसे गेली तर कामाला बळकटी येऊ शकेल अशी अपेक्षा व्यक्त केली.

श्री. रजनीकांत यांनी म्हटले, लोकशाही मानणाऱ्यांनी मतपरिवर्तन व त्यायोगे व्यवस्था बदल ही स्थिती स्वीकारली पाहिजे. आज जरी सर्व संघटनानी एकत्र येऊन काही भूमिका घ्यायचे ठरवले तरी प्रभाव पाडू शकेल इतकी ताकद नसल्याचे सांगून त्यांना राजकीय पक्षाबाबत दुरावा धरून चालणार नसल्याचे सुचविले. मात्र हे करताना राजकीय पक्षाबाबत आपली भूमिका स्पष्ट असायला हवी. आपल्याला कोणती पर्यायी व्यवस्था हवी ह्याचाही विचार होणे आवश्यक असून उतावीळपणे राजकीय पक्षामध्ये सामील होणे चूक ठरेल असेही त्यांनी सांगितले.

श्री. विवेक पंडित यांनी ह्या संदर्भात कोणती भूमिका घ्यावी हे स्पष्ट होत नसल्याचे सांगून राजकीय पक्षांकडून संघटनांचा वापर केला जातो व सध्याचे खासदार, आमदार व्यवस्था परिवर्तनामध्ये काहीही करू शकत नाहीत असे नमूद केले.

श्री. सुभाष निंबाळकर यांनी म्हटले की, आजच्या राजकीय पक्षांकडून अपेक्षित बदल अशक्य असला तरी काही किमान मदत ज्यामध्ये परिवर्तनाला आवश्यक, योग्य कायदे करणे इ. बाबतीत त्यांचा उपयोग होऊ शकतो आणि संघटनेने आपला वापर करू देताना त्यांचा आपल्याला जास्तीत जास्त कसा उपयोग करून घेता येईल हे पाहिले पाहिजे असे सुचविले.

शेतकरी संघटना आणि लोकसंघटना या सत्रात शेतकरी संघटनेविषयी थोडक्यात चर्चा झाली. शेतकरी संघटनेचे आंदोलन सध्या प्रकाशात आलेले आहे. त्याकडे राजकारणी वा बिनराजकारणी, अभ्यासक, या सर्वांचेच डोळे लागून राहिलेले आहेत. तळागाळात काम करणाऱ्या संघटना शेतकरी संघटनेच्या बाबतीत सजग झालेल्या आहेत. त्यांच्याही दृष्टीने शेतकरी संघटना ह्या फार कमी वेळात मोठ्या प्रमाणावर यश मिळवून गेलेल्या आंदोलनाची पाहणी करणे जरूरीचे ठरते.

या संदर्भात प्रामुख्याने रचनात्मक संघर्ष समितीचे सुभाष निंबाळकर बोलले. त्यांनी आज त्यांना दिसणारे शेतकरी आंदोलनाचे स्वरूप उभे केलं आणि त्यातल्या त्यांना गहर्च वाटणाऱ्या मुद्यांवर बोट ठेवले. याचा अगदी थोडक्यात गोषवारा घ्यायचा तर असे की श्री. शरद जोशी मांडतात ती मुक्त बाजाराची कल्पना फसवी आहे. त्यांनी एकाधिकार योजना व सहकार क्षेत्रावर केलेली सर्वच टीका साधार नाही.

शेतीमालाला वाढीव भाव मिळवावा ही त्यांची मागणी केवळ बड्या शेतकऱ्यांनाच उपयोगी पडणारी आहे. कारण प्रत्येक गावात ६०% जमीन एका माणसाच्या हाती व उरलेली ४०% इतरात विभागल्या जाते असे चित्र दिसून येते. मोठे शेतकरीच छोट्या शेतकऱ्यांचे विविध प्रकारांनी शोषण करतात. श्री. वसंत नाचणे म्हणाले की, श्री. शरद जोशींनी शेतमजूरींचे त्रैराशिक मांडलेले नाही. तेव्हा हा प्रश्न शेतमजूर संघटनांनी तातडीने लावून धरला पाहिजे.

श्री. विवेक पंडित यांनी याबाबत प्रश्न मांडला की, शेतमालाला वाढीव भाव मिळाला तरच मजुराला वाढीव दर मिळतील असे बंधन का आहे, याचा तपास केला पाहिजे. श्री. शरद कुलकर्णी म्हणाले की किमान वेतन मागतानाच किमान भाव, असं या आंदोलनाचं स्वरूप असायला हवं. श्री. सतिश गोगुलवार यांनी इथे मांडलेला महत्त्वाचा मुद्दा असा की, उत्पादन तत्त्वावर कुणाला संघटित केलं जातं यावर शेतमालाच्या भावाचं अर्थकारण अवलंबून राहील.

## आदिवासी संस्कृती

शेवटच्या दिवशीच्या सत्रात आदिवासी संस्कृतीची आपली जाण कोणत्या प्रकारची आहे व या अनुषंगाने

विविध संघटनांच्या भूमिका काय आहेत ह्या विषयांवर चर्चा झाली. प्रारंभी श्री. शरद कुलकर्णी यांनी संघटना म्हणून आदिवासीमध्ये काम करताना आपण ह्या प्रश्नावर काय विचार करतो ते स्पष्ट व्हावे म्हणून हा विषय चर्चेस ठेवल्याचे नमूद केले. ख्रिश्चन मिशनरी, हिंदू मिशनरी इ. काही थोडे गट सोडले तर धर्मावर आधारित काम करणारे गट कमी असल्याचे सांगितले. मात्र विश्व हिंदू परिषदेमार्फत हिंदू मिशनरींचे अनेक कार्यकर्ते काम करीत असून एक प्रकारे त्यांना आदिवासींचं हिंदूकरण (खऱ्या अर्थाने ब्राह्मणीकरण) अभिप्रेत असावे असे काम ते करताहेत. तर ख्रिस्ती गट आदिवासी समाज हिंदूपासून अलग असल्याची भूमिका घेऊन काम करीत असल्याचे सांगितले. अशावेळी आपली भूमिका कोणती असणार याचा नीट विचार होण्याची आवश्यकता त्यांनी प्रतिपादन केली. प्रा. मुटाटकर यांनी म्हटले की आदिवासी संस्कृतीचा विचार करताना आपण पाश्चात्य विचारसरणीतून त्याकडे पहायचा प्रयत्न करीत असतो. आपण विकास करायचा म्हणतो तेव्हा आपली मत त्यांच्यावर लादण्याचा प्रयत्न करीत असतो. अशा वेळा आदिवासी कोण? आदिवासी विकास म्हणजे काय? ह्याचा नीट विचार व्हायला हवा. आज आपण आश्रमशाळा, सरकारी नोकऱ्यांमध्ये आदिवासी असल्याचे पाहतो पण त्यातही विशेषत्वानं महादेव कोळीच आढळतात. माडिया–कातकरी इ. जमातींना येथे काय स्थान आहे? आज आरक्षणाचा मोठा प्रश्न आहे. अनेक बिगर आदिवासी आज आदिवासी होत आहेत. ह्या पार्श्वभूमीवर काही काळानंतर आमदार, खासदार, मंत्रीपदाच्या जागाही ते पटकावतील व आदिवासींच्या नावाने प्रतिनिधीत्व करतील ही शक्यता नाकारता येणार नाही असे सांगून त्यांनी आदिवासी संस्कृती म्हणजे काय? तीत परिवर्तन घडवून आणणे म्हणजे काय? त्याबाबत ह्या क्षेत्रात काम करणाऱ्यांची भूमिका स्पष्ट असणे आवश्यक आहे असे सुचविले.

ह्या चर्चेत भाग घेताना श्री. वाहरू सोनवणे यांनी जन्मविधी-लग्न-मृत्यू यांत असणारी परंपरागत वागणूक व आताची वागणूक ह्याचा या संदर्भात विचार व्हावा असे सुचवून विकास म्हणजे शहरी संस्कृती लादणे ही प्रवृत्ती टाळली पाहिजे असे सांगितले. उपकाराच्या भावनेतून विकास करण्याची कल्पना टाकून दिली पाहिजे. भगत–तांत्रिक–मांत्रिकाकडे आदिवासी गेला तर त्याला आपण शिव्या देतो. पण आपण सुशिक्षित–डॉक्टर–इंजिनिअर हे भगवान मला बरं कर म्हणतो– सत्यनारायणाची पूजा करतो. तेव्हा त्यात काय असतं? आपण हे वर्तुळ नीट समजून घेतलं पाहिजे. आम्ही खूप शहाणे ही भूमिका आपण सोडून द्यायला हवी व आवश्यक, योग्य परंपरांचे जतन कसं होऊ शकेल तसेच ह्या बदलत्या परिस्थितीत व्यापारीकरणात त्या नष्ट होणार नाहीत अशी काळजी घ्यायला हवी असेही त्यांनी सुचविले.

इंदवी तुळपुळे हिने समता–सहकार–संघटन–समान न्याय अशी विकासाची कल्पना स्वीकारून आदिवासी–संस्कृती रक्षणाचा विचार करताना या मुल्यांचा विचार आवश्यक असल्याचे सांगून, सामूहिक जीवनाचं रक्षण–मात्र अंधश्रद्धांवरील सामूहिकपणाला विरोध तसेच पूर्वी स्त्रीला आदिवासी समाजात जे बरोबरीच (हिंदू समाजात नसलेलं) असं वेगळं स्थान होत जे बदलताना दिसत आहे ते टाळायला हवे असे सुचवून ह्या दृष्टीकोनातून या प्रश्नाकडे पहावं असं मत मांडलं. श्री. पंडित यांनी आदिवासी संस्कृतीचा विचार करताना समतेच्या मूल्याला मारक कोणतं व पोषक कोणतं ते ठरवून पोषक असलेल्याचा विकास करणं, ते वाढविणं अशी भूमिका घ्यायला हवी असे सांगितले. जया हिने आदिवासी संस्कृतीच एक वेगळेपण होतं. त्यात आता सत्यनारायण वगैरे घुसू लागले आहेत. ह्या पार्श्वभूमीवर तिचं जतन कसं करता येईल त्याचा विचार आवश्यक असल्याचं सांगितलं.

चर्चासत्राचा समारोप करताना श्री. गं. बा. सरदार यांनी आदिवासी संस्कृतीच्या संदर्भात विचार करताना चांगलं असलेलं प्रत्येक घटकाकडून घ्याव लागेल असं सुचवलं. कार्यकर्त्यांनी काम करताना शोषणमुक्त समाजाची भूमिका घेऊन काम केलं पाहिजे. आज प्रत्येक जात बंदिस्त आहे, प्रत्येकाच्या वेगळ्या चालीरिती आहेत. हा बंदिस्तपणा, अलगपणा टाळून राष्ट्राचा विचार व्हायला हवा. सर्व घटकांना न्याय असेल, आदिवासी, भटके, दलित सर्वांची अशी भारतीय

संस्कृती दृढ व्हायला हवी असे सुचवून त्यांनी आज प्रत्येक थरातून तयार होत असलेल्या मध्यम वर्गाची व त्याच्या प्रस्थापित होण्याची प्रक्रिया जोरात चालू असून त्याविरुद्ध एकत्र काम करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले.

आज सर्व पक्ष, संघटनांमध्ये फूटी पडताहेत. मात्र संसदबाह्य संघटनांतही होत असलेल्या फुटी अयोग्य असल्याचे नमूद करून आज परिवर्तनवादी शंभर-दोनशे लोकही एकत्र येऊ शकत नाही हा मोठा पेच असल्याची खंत व्यक्त केली. समाजात बदल करायचा तो त्याच्या कलानेच घ्यावा लागेल हे लक्षात ठेवून कुचकामी शिक्षण कशाला देता अशी भूमिका घेणं चूक आहे असे सुचवून ह्या भांडवलशाही शिक्षणपद्धतीतही शिक्षण घेऊन विद्रोही बंडखोर तयार करावे. शंभरांत चार बंडखोर निघाले तरी यश मिळालं असं मानून किंबहुना विद्रोही जगात थोडेच असतात हे आपण लक्षात घेतलं पाहिजे. असे सांगून त्यांनी कार्यकर्ते करीत असलेलं काम मूलभूत आहे, वास्तवाला भिडणारं असं आहे. त्याबद्दल आदर व्यक्त करून हे काम करताना विवेकाचं भान ठेवावं असं सुचवलं. बुद्धीच्या बळाला संघटित बळाची साथ हवी. प्रत्येक संस्थेनं एक खांबी तंबू बनून राहणं सोडलं पाहिजे. सार्वजनिक जीवनात काम करताना ध्येयवाद व संघटनेला जास्त महत्त्व असणं आवश्यक असून संघर्षाचं काम नवनिर्मितीचं काम आहे.

ooo

**रमाकांत पाटील**
आदिवासी जाणीव जागृती केंद्र
कोथरूड, पुणे २९

# सातव्या पंचवार्षिक योजनेत स्वयंसेवी संस्थांना महत्त्वाचे स्थान

सातव्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत स्वयंसेवी संस्थांना मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घेण्याचे केन्द्रिय नियोजन मंडळाने ठरविले आहे. स्वयंसेवी संस्था म्हणून मान्यता मिळविण्यासाठी पुढील पाच निकष ठरविण्यात आले आहेत.

१) ही संस्था २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी कटिबद्ध असली पाहिजे.

२) ही संस्था अराजकीय असली पाहिजे.

३) ही संस्था ग्रामीण भागात असली पाहिजे.

४) या संस्थेकडे व्यवस्थापकीय तज्ज्ञता असली पाहिजे.

५) या संस्थेची धर्मादाय संस्था म्हणून नोंदणी झालेली असली पाहिजे.

या निकषांच्या आधारे राज्य सरकारांनी 'स्वयंसेवी संस्था' म्हणून मान्यता द्यावयाची आहे.

२० कलमी कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्यामागचा हेतू हा की त्यांनी शासन यंत्रणेस सहाय्यभूत व्हावे, दारिद्र्य निर्मूलन योजनांचे काम सुरळीत व्हावे.

केंद्रिय नियोजन मंडळाचे सदस्य डॉ. सी. हनुमंतराव यांनी सांगितले की १९८३ मध्ये मुख्यमंत्र्याच्या परिषदेमध्ये २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. २० कलमी कार्यक्रम, IRDP सारखे अन्य दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम व किमान गरजा कार्यक्रम या तीन क्षेत्रात स्वयंसेवी संस्थांना सहभागी करून घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. या कार्यक्रमांचा लाभ मिळणारे व स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्याखेरीज या कार्यक्रमांची गुणवत्ता राखणे कठीण होईल असे मत डॉ. राव यांनी व्यक्त केले.

एका बैठकीत स्वयंसेवी संस्थांनी रोजगार कार्यक्रम व एकात्मिक ग्रामीण विकास योजना यासारखे कार्यक्रम हाती घेण्याची तयारी दर्शविली. सातव्या योजनेत दारिद्र्य निर्मूलन कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर असतील अशी अपेक्षा आहे. यादृष्टीने या कार्यक्रमांच्या अंमलबजावणीमध्ये शासन यंत्रणेस स्वयंसेवी संस्थांची जोड देण्याची आवश्यकता भासली आहे.

(Financial Express २० मे १९८४ आधारे)

ooo

# आदिवासी संघटना—चर्चासत्रातले सहभागी

| सहभागी | संघटना / पत्ता |
| --- | --- |
| १) कमळाकर रामा तुंबडा<br>२) केशव वालमा नामवार<br>३) बंडू काथोर गीधळा<br>४) विवेक पंडित<br>५) विष्णू किरकिरा | श्रमजिवी संघटना<br>मु. पो. दहिसर, ता. वसई, जि. ठाण ४०१ ३०३ |
| ६) इंदवी तुळपुळे<br>७) वामन महाचू कवटे<br>८) मोहन राठोड<br>९) विजय साठे | श्रमिक मुक्ती संघटना<br>ताड आळी, मु. पो. मुरबाड, जि. ठाणे ४२१ ४४१ |
| १०) कांताबेन भोम<br>११) सोनलबेन पवार<br>१२) तानुभाई भोये<br>१३) सोनलबेन भोये | ग्रामविकास मंडळ ट्रस्ट<br>नडखादी, मु. पो. नडगखाम, गुजरात. |
| १४) देवराम जानू दरवडा | आदिवासी जाणीव जागृती केंद्र<br>मु. वाकल, वाडी खुटल, पो. मोरोशी, ता. मुरबाड, जि. ठाणे. |
| १५) कमळाकर माणिक हिलम<br>१६) शांताराम आंब्रे | मु. पो. मोठे वेणगाव, ता. कर्जत, जि. रायगड. |
| १७) जया मॅथ्यू | महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ<br>मु. पो. महाजे, ता. दिंडोरी, जि. नासिक. |
| १८) वसंत नाचणे | रिझर्व्ह बँक कॉलनी नं. २, गावंड पथ, नौपाडा ठाणे. |
| १९) सुभाष निंबाळकर<br>२०) किसन पुरभाजी कांबळे<br>२१) मच्छिंद्र गोजमे, लातूर<br>२२) मंगला कुलकर्णी | रचनात्मक संघर्ष समिती.<br>गंगाखेड, जिल्हा परभणी. |
| २३) रामभाऊ वाडू | भूमिसेना<br>मनोर, ता. पालघर, जि. ठाणे. |
| २४) राजेंद्रसिह ठाकर<br>२५) डॉ. सतिश गोगुलवार<br>२६) जोगा मडावी | जागृत आदिवासी संघटना.<br>मु. पो. पुराडी, ता. कुरखेडा जि. गडचिरोली. ४४१ २०९.<br>ता. अहेरी, जि. गडचिरोली. |
| २७) भाई रजनीकांत | बांधकाम व लाकूड कामगार संघटना<br>ओक मार्ग, जठार पेठ, अकोला ४४४ ००५. |
| २८) वसंत पाटील | २६, लक्ष्मीनारायण बाग, बाल गोविंददास रोड, माहिम, मुंबई ४०० ०१६. |
| २९) अशोक सासवडकर | ' निर्मिती ' पो. सुधागड, ता. पेण, जि. रायगड |
| ३०) पांचाळ दत्ता लक्ष्मणराव | पुरोगामी मित्र मंडळ<br>मु. पो. मुखेड, ता. नांदेड. |
| ३१) कानू दामा पारधी | जागृत भाऊबंदी संघटना<br>मार्गाची वाडी, पो. पाथरज, ता. कर्जत, जि. रायगड. |

| | |
|---|---|
| ३२) वाहरू सोनवणे<br>३३) गुलाब नाईक | श्रमिक संघटना,<br>शहादा, जि. धुळे. |
| ३४) छाया अंबरसिंग सुरतवंती | टेकभिलाटी, शहादा, जि. धुळे. |
| ३५) शोभा मुळे, ग्रामस्वराज्य समिती | मु. पो. विक्रमगड, ता. जव्हार, जिल्हा ठाणे. |
| ३६) सिस्टर दीपा | महाराष्ट्र प्रबोधन सेवा मंडळ,<br>मु. पो. महाजे, ता. दिंडोरी, जिल्हा नासिक. |
| ३७) श्री. शरद कुलकर्णी<br>३८) अजय कुलकर्णी<br>३९) रमाकांत पाटील | आदिवासी जाणीव जागृती केंद्र, पुणे. |
| ४०) सुधा कोठारी | उच्च शिक्षण आणि युवक सेवा प्रबोधिनी,<br>९१७/२५ गणेशवाडी, सर्व्हंट ऑफ इंडिया सोसायटी रस्ता, पुणे ४११ ००४. |
| ४१) रा. के. मुटाटकर<br>४२) डॉ. विजय भानू<br>४३) एस. एन. कुलकर्णी<br>४४) सुषमा सोनक<br>४५) सुनीता बांदेवार | मानवशास्त्र विभाग, पुणे<br>विद्यापीठ पुणे |

०००

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे कार्य

१) महाराष्ट्रातील आदिवासींचे सामाजिक प्रश्न व त्यांचे साहित्यातील प्रतिबिंब या विषयावरील चर्चासत्र १९८३ मध्ये घेण्यात आले. चर्चासत्रास आदिवासी साहित्यिक व कार्यकर्ते मिळून ६८ लोक उपस्थित होते.

२) २ ऑक्टोबर १९८३ रोजी परिषदेचे तेव्हाचे अध्यक्ष व नामवंत विचारवंत प्रा. गं. बा. सरदार यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त एका स्नेहपूर्ण समारंभात अभिष्टचिंतन.

३) जानेवारी १९८३ मध्ये मुंबई येथे 'आदिवासी विकासाच्या दिशा महाराष्ट्र' हे चर्चासत्र आयोजित करण्यात आले. या चर्चासत्राला ३५ कार्यकर्ते, सरकारी अधिकारी व अभ्यासक यांचा समावेश होता.

४) पुणे विद्यापीठात 'आदिवासींच्या शैक्षणिक व आरोग्यविषयक समस्या' बाबत स्कूल फॉर रूरल डेव्हलपमेंटच्या सहकार्याने चर्चासत्र आयोजित करण्यात आले. याला २५ हून अधिक कार्यकर्ते व अभ्यासक यांची उपस्थिती होती.

५) रायसिंगपूर, अक्कलकुवा, धुळे येथे आदिवासी सातपुडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या सहकार्याने बालक-पालक मेळावा आयोजित.

६) धुळे जिल्ह्यातील रामपूरगावचा दुग्ध प्रकल्प कार्यान्वित. या ठिकाणी लिफ्ट इरिगेशन करीता मदत.

७) 'प्रेरणा चिपकोची व भटकंती गढवालची' या परिषदेचे सहसचिव जगदीश गोडबोले यांच्या पुस्तकाचे जानेवारी १९८४ रोजी प्रकाशन. प्रथम लेखमालेच्या रूपाने माणूसमध्ये प्रसिद्ध झालेल्या या लिखाणाला रा. न. सबनीस वाङ्मय पारितोषिक देऊन गौरव करण्यात आला.

८) १९८४ त भोपाळ दुर्घटनेनंतर टिळक स्मारक मंदिर पुणे येथे परिसर, वर्ल्ड वाइल्ड लाइफ फंड इ. संस्थाच्या सहकार्याने जाहीर सभेचे आयोजन.

९) परिषदेचे उपाध्यक्ष शरद कुलकर्णी व सचिव रा. के. मुटाटकर यांची हळबा कमिटीवर नेमणूक.

१०) मार्च १९८५ त महिला कार्यकर्त्यांचे चर्चासत्र घेतले. ३० कार्यकर्त्या सहभागी.

०००

# आदिवासी परंपरा जपाव्या

□ गीता साने

ग्रामीण जीवनातील अनेक अनिष्ट परंपरांकडे ग्रामीण कार्यकर्त्यांचे लक्ष गेल्या २०-२५ वर्षांत अधिकाधिक वेधले जात आहे व त्या अनिष्ट परंपरा, रीतीरिवाजांचे निराकरण करण्याचा प्रयत्नही कार्यकर्ते करीत आहेत.

समाजामधल्या काही इष्ट व जीवनोपयोगी परंपरांचे उच्चाटन, नागरी संस्कृतीच्या संसर्गाने होत असल्याची जाणीव मात्र अजून पुरेशी तीव्र नाही. ह्यापैकी दोन परंपरांची उदाहरणे येथे देत आहे.

नागरी संस्कृतीने निषिद्ध मानलेल्या अनेक वस्तूंचा समावेश मागास समाज आपल्या अन्नात करीत आले आहेत. ह्या समाजांना दूध व दुधाचे पदार्थ सहसा मिळत नाहीत. त्यांच्या मुलांना वाढीला आवश्यक असणारे प्रोटीन विविध तऱ्हेच्या मांसातून मिळत असते. उदा. बिहारच्या सिंगभूम जिल्ह्याच्या चाईबासा ह्या जिल्ह्याच्या ठिकाणी, एक तऱ्हेच्या लाल रंगाच्या मुंग्यांनी भरलेले द्रोण बाजारात विकत मिळतात. ह्या मुंग्या ते लोक आवडीने खातात आणि त्यांना शरीराला आवश्यक ते प्रोटीन त्यातून मिळते. उंदीर, साप, बेडूक, कीटक ह्यावर गुजराण करणारे समाज आहेत. बिहारचे मुसाहर ( पुया – उंदीर ) उंदरावर उपजीविका करतात.

हे विविध तऱ्हेचे मांस खाणारे, केवळ भारतीय समाजच आहेत, असेही नाही. आग्नेय आशिया, चीन, जपान या राष्ट्रांमधील लोक विविध प्रकारचे मांस आवडीने खातात. सुसंस्कृत समाजातही त्यांचा वापर नित्य होतो. आपण तेथे पाहुणे गेलो, तर पाहुणचार म्हणून ह्यापैकी काही पदार्थ आपल्या पानातही वाढले जातात.

नागर संस्कृतीच्या संस्कारामुळे आपल्याला या गोष्टी निषिद्ध, किळसवाण्या वाटतात.

ग्रामीण व मागास समाजांना नागरी संस्कृतीबद्दल एक मोहिनी आहे आणि ही नागरी संस्कृती अनुकरण्याचा मोह आहे त्यामुळे आपल्याला निषिद्ध किंवा किळसवाण्या वाटणाऱ्या वस्तू 'सोडण्या'कडे त्यांचा कल असतो. 'मद्य–मांस' सोडलेली माणसे त्या समाजात सापडतात. एवढेच नव्हे तर 'कांदा–लसूण देखील खात नाही' असे अभिमानाने केव्हातरी सांगण्यात येते.

अन्नामध्ये हितकारक घटक असे मागे पडू लागलेले दिसतात. स्त्री-पुरुषांच्या सरमिसळ मिसळण्याबद्दलही हीच अवस्था केव्हातरी प्रत्ययाला येते. 'घोटुल' ही, मुलामुलींना एकत्र मिसळण्याची संधी देणारी आदिवासी संस्था. हिची माहिती प्रथम डॉ. वेरिवर एल्विन ह्यांनी कित्येक वर्षांपूर्वी दिली. त्या माहितीप्रमाणे खडचामधील सर्व वयाचे अविवाहीत मुलगे व मुली रात्री एकत्र येतात, खेळतात, नाचतात व रात्री एकत्र झोपतातही. येथे वडिलधाऱ्यांना प्रवेश नसतो. मुले मनमोकळेपणी वागतात. ह्या समाजात त्यामुळे पुढेही स्त्री-पुरुष परस्परांशी माणूस म्हणून अकृत्रिम वागू शकतात.

नागरी संस्कृतीमधल्या स्त्रिया आता गरजेपायी घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडलेल्या आहेत. त्यांना पुरुषांच्या जगात अकृत्रिमपणे वागता येत नाही. कारण स्त्री-पुरुष दोघांनाही परस्परांशी सहजतेने कसे वागावे हे समजत नाही. त्यामुळे घोटुलाचे काम कसे चालते हे पहावे, अशी मला फार इच्छा होती. गेल्या ऑक्टोबर महिन्यात माडिया गोंड वस्त्यांमध्ये जाण्याचा मला योग आला. वेळ संध्याकाळची. त्यामुळे मी घोटुलांबद्दल माहिती विचारण्यास सुरुवात केली. पहिल्या दोन-तीन खेड्यात, 'आता घोटुले उरलेली नाहीत' असे उत्तर मला मिळाले. उत्तर देणाऱ्यास माझ्या हेतूबद्दल काही शंका असावी असे मला वाटले. खरे म्हणजे माझ्या बरोबर असलेल्या वसुधाने (डॉ. वसुधा धगमवार) हे माझ्या नजरेला आणले. त्यानंतर भेटलेल्या एका जाणत्याला माझ्या प्रश्नाचा उद्देश मी सांगितला. ते म्हणाले, 'घोटुलाचा प्रघात शहरांजवळ असणाऱ्या खेड्यातून नष्ट झालेला आहे. अजूनही खेड्यामधील मुले व मुली रात्री एकत्र येतात. गाणी म्हणतात, नाचतात आणि मध्यरात्री घरी निजावयास जातात. घोटुले अजूनही उरली आहेत; पण ती घनदाट जंगलात शोधावी लागतील.'

नागर समाजामधले मद्य-मांसावरचे निर्बंध आपल्या समाजात गोंधळ माजवण्याइतके तुटले आहेत आणि स्त्री-पुरुषांना एकत्र सहजपणे मिसळता यावे म्हणून तरुणांचे क्लब स्थापण्याची गरज आपल्याला जाणवू लागलेली आहे. यावेळी वरील परंपरांचा नाश ग्रामीण समाजात झाल्यास, ग्रामीण समाजाचे पाऊल पुढे पडेल का मागे ?

इतरही हितकारक व उपयोगी परंपरा, या समाजातून आज नष्ट होऊ लागलेल्या असतील. त्या सर्व परंपरा जपण्याबाबत विचार व्हायला हवा.

— गीता साने
संदोष, हिरापूर
धनबाद (मध्यप्रदेश)

०००

## किमान वेतन गीत

कष्ट करणारा, नेहमी मरणारा, समाज एकत्र आला
या हो जंगलातला, जंगलातला आदिवासी जागा झाला ।। धृ ।।

पुरे नसे हो पोटी आम्हाला
त्याची खंत नसे सावकाराला
रुपये दीड मिळतात दिवसाला
दिवसभर हो पिळले कामाला
दाम देऊन, दम देऊन
पावले आम्हा घराला ।। १ ।।

विचार कळविला आम्ही गावाला
गाव धावून मिटिंग आला
बायका पुरुष सांगे ज्याला त्याला
कोणी जाऊ नका आवणीला
हा मान्सून, हा सिझन
आला नी तसाच गेला ।। २ ।।

आमचा विचार कळला सावकाराला
त्याचा चेहरा गोरामोरा झाला
पगार पुरेपूर मिळाला आम्हाला
आता जोमाने लागले कामाला
या नादाने नव्या मताने
समजू लागलो मनाला ।। ३ ।।

# भेटलेल्या कविता

– भुजंग मेश्राम

## ॥ एक ॥

श्रमशाळेत
त्यादिवशी एक माणूस भेटला,
मी नेहमीगत त्याच्याजवळ
टाकलं आपलं कोडं
‘ कहू तो मां मर जाय
ना कहू तो बाप कुत्ता खा जाय ’
तो स्थिर होता,
माझी बधीरली संवेदना,
थरारली श्रद्धा,
हादरली वेठाळ वेदना
हे अभंग भेग
ते बेरंग भोग
काय म्हणतील लोक ?
तो म्हणाला, म्हणोत
लोक जगतात की लोकसाहित्य रे ?
अन् माझ्या अंगावर फुटलेले कोड
अचानक नाहीसे झाले !

## ॥ दोन ॥

गुर्जींनी विच्यारलं,
‘ कोणत्याही तीन आदिवासी गावांची नावं सांग’
म्हणून सांगलं,
चुकलं आसल तर तोंडात मार
औतानासिवा खुलते का कवाड ?
मी फक्त सांगलं,



‘ शेलटी, वरुड, कोडपाखिडी ’
गुर्जींनी विच्यारलं,
‘ कशासाठी प्रसिद्ध आहेत ही गावं ?’
मी फक्त सांगलं,
शेलटीची होळी
वरुडची गोवारीन बाई
कोडपाखिडीच्या कापसाची चोरी ’
गुर्जी गरजले, हात परजले
दोन चार मेंदीचे फोक मोडले
‘ कोणत्याही तीन माणसांची ओळख
आणल्याशिवाय तुला शाळेत प्रवेश नाही ’
तवा मी बिर्सा काका, तंट्या नाना,
आन् अंबरसिंग म्हाराजाची वळख काढली !

## ।। तीन ।।

हरेक मजुरनीच्या ओटीतला विळा पाहून
वाहरू मोहरतो तसा
हरेक खोपटीतला विडीगत धूर बघून
तो मित्र निर्धास्त झाला होता
शास्त्रशुद्ध उठावाचे प्रमेय दुरुस्त करत
रानात जाणाऱ्या वाटा मोजत होता...
तिकडे इंदरवल्लीच्या
बाजारातून निघाला धूर
इकडे गडचिरोलीच्या
रानातून वणवा आला भूरभूर
हरेक आईच्या डोक्यावरची मोळी बघून
चौकातला महात्म्याचा पुतळा स्तब्ध होतो तसा
तो नुसता अस्वस्थ झाला होता

## ।। चार ।।

ताबा पाह्यजे का ?
जरूर बाबा जरूर
मातर आदी तुझ्यावर
तुझ्या ओठा-पोटावर
हक्क येऊ दे की लेका तुझा !
(आठवत आसलं तर आठव
विंग्रजानी उगीच दिला ताबा
अडीचशे वर्सानंतर ? )
आरं, हा कुळकायदा
कागदावरचा वायदा
कागद फाटला की हिसाब फिटला
मी ही बाटलो, तू ही बाटला
मंग पाह्यजे का ताबा ?

## ।। पाच ।।

ओळखलं का मला ?
तहसीलच्या पायऱ्यांवर
आपली झाली होती भेट
तेव्हा मी होतो झेडपीचा मेंबर
(आता फुलटायमर)
काय म्हणता, बलात्कार झाला ?
मला माफ करा,
सातबाऱ्यासाठी मी सात फेऱ्या मारीन
फेरफारसाठी आरपार होईन
पण हे पटणार नाही मला
(म्हणजे, असे प्रश्न कधी सुटतात का ? )
ही तर रोजचीच गोष्ट आहे
रोजच्या मयतीसाठी मी कसा येणार ?
(कारण, मीं आहे फुलटायमर)

## ।। सहा ।।

बे एक बे
बे दोनी रे
बे त्रिक घे
बे चोक दे
गुरजी पाठांतर म्हणतात.
बाप म्हणतो, हा पाढा करून ये !

# भूमिसेना चळवळीचे अभ्यासपूर्ण विवेचन

महाराष्ट्रातील समाजकार्यकर्ते व ग्रामीण विकासाचे अभ्यासक यांना डॉ. वसंत देशपांडे हे नाव अपरिचित नाही. 'स्ट्रगल ऑफ दि डिप्राईव्हड फॉर डेव्हलपमेंट' या मालिकेतील त्यांच्या 'दि म्हैसाळ अनटचेबल्स' या पहिल्या पुस्तकाप्रमाणे याच मालिकेतील 'आदिवासीज ऑफ ठाणे' (ठाण्यातील आदिवासी) हे नुकतेच प्रसिद्ध झालेले त्यांचे नवीन पुस्तक ठाणे जिल्ह्यातील भूमिसेना चळवळीचे सखोल व विवेचक मूल्यमापन करणारे आहे.

### आदिवासींना कोंडीत पकडणारा व्यूह

पुस्तकाच्या सुरुवातीला भौगोलिक परिस्थिती रितीरिवाज, परंपरा, सामाजिक/आर्थिक परिस्थितीचे' विवेचन आहे. प्रत्येक समाजशास्त्रीय पुस्तकात असावे तसे हे वर्णनात्मक लिखाण आहे. मात्र त्याचे वैशिष्टय असे की सर्व सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक परि-स्थिती व परंपरेचा संबंध आदिवासींच्या आजच्या वास्तवाशी, त्यांच्या प्रश्नांशी, त्यांच्या व्यक्तिमत्वाशी सतत जोडलेला आहे. परिवर्तनाचा ओघ समजून घेऊ पाहणारं, परिवर्तन होत नसेल तर आदिवासी समाज कुंठित का आहे याची कारणे शोधण्याचा प्रयत्न करू पाहणारं हे लिखाण आहे. आपली विकासाविषयीची संकल्पना किती एकांगी असते आणि प्रत्यक्ष वास्तव किती गुंतागुंतीचे व बहुपेडी असते याचे चित्रण यात आहे. उदा. बाहेरून होणाऱ्या शोषणास प्रतिकार करण्यास आदिवासी संघटित होतात मात्र आपल्याच समाजातील दारू व लग्नसमारंभातील अनावश्यक थाटमाट या सांस्कृतिक परंपरा शोषणास कितीही मदत करणाऱ्या असल्या तरी त्या सोडणे त्यांना किती कठीण होते व विकासाला खिळ कशी पडते याचे चित्रण आहे. दारू, लग्नातील रितीरिवाज इ. सांस्कृतिक परंपरांचा बाहेरून येणारे व्यापारी व सावकार शोषणाचे हत्यार म्हणून कसा खुबीने उपयोग करून घेतात याचे परखड विवेचन यात आढळते. आदिवासीचे शोषण कर-णाऱ्यांच्या व त्यांना कोंडीत पकडणाऱ्यांचा व्यूह कसकसा आहे व सावकार, व्यापारी, सरकारी अधिकारी यांची साखळी-व्यूह आपल्या फायद्यासाठी कसकसा वापरते याचे भेदक दर्शन घडते. त्याचबरोबर या व्यूहात सापडलेल्या आदिवासींची अगतिकता व त्यातून आलेली त्यांची गुलामी वृत्ती यांचेही दर्शन घडते. आजचा आदिवासी असा आहे याचं केवळ वर्णन करून देशपांडे थांबत नाहीत तर त्याहीपुढे जाऊन आदिवासी हा जो असा आहे तो असा का आहे? याचा शोध घेऊन संपूर्ण चित्र वाचकांसमोर उभं करतात. आदिवासींभोवतालच्या परिस्थितीचा अर्थ हळूहळू उलगडू लागतो. तो अडाणी, अक्षरशत्रू राहण्यातच इतरांचे हितसंबंध गुंतलेले आहेत हे ध्यानात येते. सिमिंग्टन या इंग्रज अधिकाऱ्याने ही सर्व परिस्थिती डोळ्याने पाहिली व एक विस्तृत अहवाल १९३९ मध्ये सरकारला सादर केला. सिमिंग्टनप्रमाणेच नारगोळकर, सावे, गोदुताई परुळेकर यांनी ठाण्यातील आदिवासीं-विषयक केलेल्या लिखाणाचा आढावा देशपांडे घेतात.

ठाण्यातील आदिवासींची परिस्थिती सुधारण्यासाठी स्वयंसेवी संस्था व सरकार यांनी केलेल्या प्रयत्नांची माहिती देऊन या प्रयत्नांचा परिणाम कितपत झाला याची चर्चा लेखकाने येथे केली आहे असे दिसून येते.

### भूमिसेना

यापैकी ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्यक्षेत्र शिक्षण व आरोग्य या क्षेत्रापलीकडे गेलेच नाही. आदिवासींच्या आर्थिक समस्यांच्या सोडवणुकीचा प्रयत्न त्यांनी बिलकुल केला नाही. आदिवासी सेवा मंडळासारख्या

पुस्तक परीक्षण

विधायक कार्य करणाऱ्या संस्थांमुळे सहकारी सोसायट्या सुरू झाल्या, कायदेविषयक मदत मिळू लागली. मात्र या संस्थांचे काही कार्यकर्तेच शोषक वर्गातील असल्यामुळे प्रस्थापितांशी संघर्ष टाळण्याच्या त्यांच्या धोरणामुळे प्रश्नांच्या गाभ्याला कधीच हात घातला गेला नाही. यादृष्टीने श्रीमती गोदुताई परुळेकरांचे ठाणे जिल्ह्यातील आदिवासींमधील कार्य उल्लेखनीय ठरले. त्यानी आदिवासींचा स्वाभिमान जागृत केला. मात्र त्यांनी सतत संघर्षाची भूमिका घेतल्यामुळे रचनात्मक कार्य काहीही झाले नाही. उलट दहशतीचे वातावरण निर्माण झाले. अर्थात आदिवासींच्या उठावामुळे त्यांच्यावरील अत्याचार, शोषणाचे प्रमाण कमी झाले, मजुरी वाढली व आदिवासी राजकीयदृष्ट्या जागृत झाला.

## नाव सोनूबाई हाती कथलाचा वाळा

आदिवासींची परिस्थिती सुधारण्यासाठी झालेल्या सरकारी प्रयत्नांचे फायदे व त्यातील उणिवा दोन्हीही लेखकाने उघडकीस आणल्या आहेत. १९३९ च्या कूळकायद्यामध्ये 'कसेल त्याची जमीन' अशी महत्त्वाची दुरुस्ती सरकारने केली यामुळे ज्या आदिवासींना जमिनीची मालकी मिळाली त्यांचा फायदा झाला. मात्र ज्यांना मालकी मिळविता आली नाही ते कूळ म्हणून असलेले कसण्याचे हक्कही गमावून बसले. यातून केवळ कायदा असून भागत नाही तर त्याची काटेकोर अंमलबजावणी महत्त्वाची आहे हे निदर्शनास येते. जमिनीचे मालकीहक्क मिळूनसुद्धा सावकारांच्या जबरदस्त पकडीमुळे आदिवासीच्या आर्थिक स्थितीत फारशी सुधारणा झाली नाही. १९४७ पासून सरकारने आदिवासींच्या जंगल सहकारी सोसायट्या स्थापन करण्यास उत्तेजन दिले त्यापैकी बऱ्याच सोसायट्या चांगल्या चालल्या आहेत. दारूबंदी कायद्याचा परिणाम काही काळ टिकला. मात्र नंतर त्या कायद्याच्या अंमलबजावणीत शिथिलता आल्याने बेकायदा दारू गाळण्याचे प्रमाण वाढू लागले. वांद्रेकर कमिटीच्या शिफारशीनुसार प्रत्येकी १००० लोकसंख्येमागे एक प्राथमिक शाळा असे सरकारी धोरण होते. मात्र आदिवासी छोट्या छोट्या पाड्यातून राहत असल्याने आदिवासी भागात प्रत्येकी ५०० लोकसंख्येमागे एक प्राथमिक शाळा देण्यात आली. त्यानंतर काही वसतिगृहे बांधण्यात आली. पुढे आश्रमशाळांची योजना पुढे आली. शैक्षणिक क्षेत्रातील सरकारचे प्रयत्न फारसे यशस्वी ठरले नाहीत. आदिवासी भागातील काही शाळांत विद्यार्थी तर काही शाळात शिक्षक गैरहजर असतात. शिक्षणपद्धती पारंपारिक व अतिऔपचारिक स्वरूपाची असल्यामुळे आदिवासी जीवन व संस्कृतीशी तिचा सांधा जुळत नाही. याप्रकारे कायदेकानू व सुधारणेचे सरकारी प्रयत्न होऊनही आदिवासींच्या स्थितीत फारशी सुधारणा झाली नाही. बरेचसे आदिवासी भूमिहीन मजूर झाले तर काही लग्नासाठी घेतलेल्या कर्जामुळे बांधील गडी झाले. बाहेरून आलेल्यानी व बड्या जमिनदारांनी आदिवासींच्या जमिनी बळकावल्या, कायदे असूनही प्रत्यक्षात अत्यंत कमी मजुरी, तर रोजगाराच्या अभावामुळे कामाच्या शोधात स्थलांतर वाढीस लागले.

कमालीचे दारिद्र्य व अनारोग्य, यातच व्यापाऱ्यांनी दारूची पकड वाढविली. यातून आदिवासींचा जीवनाकडे पाहण्याचा नकारात्मक दृष्टिकोन बनवण्यात व्यवस्थेला यश आले.

## काळूराम व भूमिसेनेचा उदय

या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीवर काळूराम दोधाडे या आदिवासी युवकाच्या नेतृत्वाची जडणघडण व त्यातून भूमिसेना चळवळीचा उदय कसा झाला याचे तपशिलवार विवेचन लेखकाने केले आहे ते मुळातूनच वाचण्यासारखे आहे. काळुरामला एकामागून एक निवडणुकांमध्ये अपयश येत गेले व ही गोष्ट भूमिसेना चळवळीला आजचे स्वरूप येण्यास कारणीभूत झाली. हा एका समाजवादी नेत्याचा अभिप्राय मार्मिक आहे. निवडणुकीतील अपयशामुळे काळुराम अंतर्मुख बनला व तळापासून आदिवासींची संघटना मजबूत कशी बनवता येईल याचा विचार तो करू लागला.

१९७० मध्ये काळुरामने पालघर तालुक्यात भूमिमुक्ती आंदोलन सुरू केले, त्यात त्याला व त्याच्या सहकाऱ्यांना अटक झाली. तुरुंगातील साहचर्यामुळे व चर्चेमुळे चळवळ पुढे नेणारा एक गट तयार झाला. त्यांनी 'जमीन बळकाव' मोहीम अधिक तीव्र करण्याचे ठरविले. काही गावातून पाहणी करून सावकारांकडून जमीन बळकावून घेण्यास लोकांना उद्युक्त केले.

उभे पीक कापण्याचे कार्यक्रम हाती घेण्याचे त्यांनी ठरविले. असा पहिला पीक कापणीचा कार्यक्रम बंधन या गावी सागाशेट यांच्या शेतावर झाला. सुमारे ६०० आदिवासी युवक कोयता घेऊन हजर होते. काळुरामने त्यांना आपल्या कामाची कल्पना दिली, संघटनेचे महत्त्व समजावून दिले. आपण करतो ते कायद्याच्या कक्षेतील आहे हे पटवून दिले आणि मग 'जय भूमिसेना' असा उत्स्फूर्तपणे नारा देऊन पीक कापणीचा कार्यक्रम पार पडला. 'भूमिसेना' अशा तऱ्हेने जन्मास आली. अनपेक्षितरित्या भूमिसेना येऊन थडकल्यामुळे प्रतिकार झाला नाही. या उपक्रमामुळे अनेक ठिकाणी उत्स्फूर्त-पणे आदिवासी शेतकऱ्यांनी आपल्या मालकीच्या पण सावकारांच्या ताब्यातील जमिनीचा अशा तऱ्हेने ताबा घेण्यास प्रारंभ केला. एकूण दहा खेड्यांतून सुमारे ८० शेतकऱ्यांच्या अशा जमिनीवर हा कार्यक्रम पार पडला. या चळवळीचा साहजिकच गाजावाजा होऊ लागला. सावकार चिंतातूर झाले. काळुरामवर सरकारी यंत्रणे-कडून दडपण येण्यास सुरुवात झाली. सब-डिव्हिजनल ऑफिसरने काळुरामला निरोप पाठविला 'तुम्ही येऊन भेटा. आपण सर्व प्रकरणांचा निकाल लावू.' गेल्या सोळा वर्षांत ज्यांनी काही केले नाही ते सरकार आता करावयास तयार झाले.' यावर काळुरामचा विश्वास बसेना. आपली मुख्य कचेरी मनोरला आणावी असे काळुरामने सुचविले. S. D. O. ने मान्य केले. केवळ तीन दिवसात S. D. O. ने सुमारे ७०० प्रकरणांचा निकाल लावला. यातील फक्त एकाच प्रकरणाचा निकाल सावकाराच्या बाजूने लागला. भूमिसेनेने हे मोठेच यश मिळवले. संघटित आदिवासींच्या या लढ्याला बाहेरील लोकांची मिळणारी मदत तेवढीच महत्त्वाची होती. समाजवादी पक्षाच्या आमदाराने भूमिसेनेचा प्रश्न विधानसभेत उपस्थित केला एवढेच नव्हे तर त्यास पाठिंबा दिला. त्यामुळेच सरकारी अधिकाऱ्यांना कृती करणे भाग पडले. यावरून स्थानिक पातळीवरील कार्याबरोबरच योग्य पातळीवरील पूरक कार्य चळ-वळीच्या यशासाठी निकडीचे ठरते हे लक्षात येईल.

## एकवट एकीचे बळ, करू हक्कासाठी चळवळ

भूमिसेनेचे कार्य पुढील आघाड्यांवर आजही चालू आहे. यापैकी प्रत्येकाचे तपशिलवार विवेचन लेखकाने केलेले आहे. कर्जबाजारी कुळांना संघटित करून त्यांना त्यांच्या जमिनी परत मिळवून देऊन सावकार व व्यापाऱ्यांच्या मगरमिठीतून त्यांची सुटका करणे, किमान वेतन कायद्याप्रमाणे किमान वेतनासाठी संपाचे आयोजन, रोजगार हमी योजनेखाली कामे सुरू करण्याबाबत सरकारी अधिकाऱ्यांवर दडपण आणणे. आणि कमी खर्चात आदिवासींच्या सामुदायिक लग्नांचे आयोजन करून लग्नाप्रित्यर्थ होणाऱ्या अनावश्यक खर्चाला आळा घालणे व याद्वारे सावकाराच्या पकडीतून आदिवासींची सुटका करणे, बांधिल मजूर सोडविणे.

भैय्याकडून आपली जमीन परत मिळविण्यासाठी बनीबाई या आदिवासी स्त्रीने भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांच्या मदतीने भैय्याशी संघर्ष केला. ठाण्यातील आदिवासींना गौरवशाली इतिहास नाही असे म्हटले आहे. बनीबाईचे उदाहरण भावी पिढ्यांना निश्चित स्फूर्ती देणारे आहे. ते इतिहासाच्या पाठ्यपुस्तकातून तेथील विद्यार्थ्यांना का शिकविले जात नाही ?

किमान वेतन कायद्याप्रमाणे किमान वेतन मिळावे यासाठी मजुरांचे संप आयोजित करून योग्य कृती करण्यासाठी संबंधित सरकारी अधिकाऱ्यांवर दडपण आणण्याचे धोरण भूमिसेनेने अवलंबिले. चहाडे गावात झालेल्या संपाचे व मोर्चाचे उदाहरण देऊन भूमिसेना चळवळीची पार्श्वभूमी व पद्धतीचे स्पष्टीकरण देशपांड्यांनी केले आहे. चहाडे येथील यशस्वी संपानंतर ही चळवळ १०० गावात पसरली. आपल्या वेतनात वाढ होऊ शकते हा आत्मविश्वास आदिवासींमध्ये नव्याने निर्माण झाला. पूर्वी वेतनात वाढ होईल हे त्यांच्या



मनातही येत नसे. किमान वेतनाच्या चळवळीमुळे आपल्या श्रमाचे महत्त्व आदिवासी मजुरांना प्रथमच कळून आले. आपण आपल्या मालकासमोर समोरासमोर बोलू शकतो हा आत्मविश्वास त्यांना मिळाला. एक मजूर, म्हणाला 'आम्ही आता अधिक शहाणे झालो आहोत. आमचा दर्जा खालचा नाही हेही आम्हाला कळले'. किमान वेतनाच्या लढ्यामध्ये स्थानिक पातळीवरील सरकारी अधिकाऱ्यांच्या सहकार्याचा आवर्जून उल्लेख लेखकाने केला आहे. संकटकाळात सरकारी अधिकारी गावागावात भेट देताहेत असे दृश्य यावेळी प्रथमच दिसले. यापूर्वी जमिनदार सावकार, व्यापारी यांचे सरकारी अधिकाऱ्यांशी संगनमत असल्याचे दिसून येत असे. हलोली गावातील संभाषणातून लेखकाने दाखवून दिले आहे की किमान वेतनाच्या लढ्यामुळे आदिवासींना आर्थिक, सामाजिक व मानसिक फायदे झाले.

खरीप हंगामानंतर आदिवासींना रोजगार मिळणे कठीण होते. यामुळे रोजगाराच्या शोधात सुमारे ४०% आदिवासी दूरच्या ठिकाणी स्थलांतर करीत. महाराष्ट्र सरकारने रोजगार हमी योजना काही वर्षांपूर्वी या भागात लागू केली. एका पाहणीत असे आढळून आले की, रोजगार हमी योजनेतील कामामुळे स्थलांतर करणाऱ्यांचे प्रमाण ४०% ने घटले. यामुळे आदिवासींना आता रोजगाराच्या हक्काची जाणीव होऊ लागली. त्यांच्या लक्षात येऊ लागले आहे की, सावकार व व्यापारी यांच्या तडाख्यातून सुटण्यासाठी रोजगार हमीची कामे हा आपली प्रतिष्ठा व स्वाभिमान कायम ठेऊन रोजगार मिळविण्याचा मार्ग आहे. लोकांनी मागणी केल्यास या योजने अंतर्गत काम पुरविणे ही सरकारची जबाबदारी आहे. मात्र सरकारी अधिकाऱ्यांची बेजबाबदार वृत्ती व सुस्तपणा यामुळे ही कामे बऱ्याचदा वेळेवर सुरू करण्यात येत नाही अगर टाळाटाळ केली जाते. एखाद्या सरकारी अधिकाऱ्याकडे जाऊन आपला हक्क म्हणून काही मागण्याएवढा आत्मविश्वास आदिवासीमध्ये अजूनही नाही कारण न्यूनगंडाने तो पछाडलेला असतो. भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आहे की, लोकांची रोजगाराची गरज लक्षात येऊनदेखील सरकारी अधिकारी आपणहून रोजगार हमीची कामे सुरू करणार नाहीत त्यामुळे कार्यकर्त्यांनी रोजगार हमीची कामे सुरू करण्यासाठी अधिकाऱ्यांवर दबाव आणण्यासाठी आदिवासींना जागृत करून संघटित करण्याचे ठरवले. आदिवासींना राजकीयदृष्टया जागृत करून त्यांचा आत्मविश्वास वाढवण्याची ही एक चांगली संधी आहे हे भूमिसेना कार्यकर्त्यांनी चाणाक्षपणे ओळखले, ही उद्दिष्टचे नजरेसमोर ठेवून तीन मोठे मोर्चे त्यांनी यशस्वीरित्या संघटित केले. या तिन्ही घटनांवरून दिसून आले की, अधिकाऱ्यांच्या गलथानपणामुळे भूमिसेनेला आदिवासींना संघटित करण्याची चांगली संधी मिळाली. मजुरांच्या संघटित सामर्थ्यामुळे अधिकाऱ्यांकडून काम करवून घेता येते हा धडा यातून मिळाला. रोजगार हमीची कामे अशी हवीत की ज्यातून स्थानिक अर्थव्यवस्था मजबूत होईल. याकरता या भागांच्या विकासाचा अभ्यासपूर्वक आराखडा तयार करण्याची आवश्यकता लेखकाने प्रतिपादन केली आहे.

लग्नासाठी सावकाराचे कर्ज व त्याची बांधिलकी यातून आदिवासींची सुटका करण्यासाठी दोन आघाड्यांवर प्रयत्न करण्याचे भूमिसेनेने ठरवले. एक तर रोजगार हमीची कामे सुरू करून स्वाभिमान व प्रतिष्ठा कायम ठेवून काम मिळविण्याचा मार्ग उपलब्ध करून देणे, दुसरा मार्ग लग्नातील अनावश्यक खर्च कमी करून हानीकारक प्रथा व परंपरा बदलण्यास आदिवासींना भाग पाडणे. हे काम मोठे कठीण होते कारण येथे भूमिसेनेला त्यांच्याच समाजातील प्रथा व परंपराविरूद्ध लढा द्यावा लागणार होता. या परंपरांचे पालन करण्याबाबत आदिवासी संवेदनाशील असतो आणि यात लुडबुड केल्यास तीव्र विरोधाला तोंड देणे भाग होते. लग्नाप्रित्यर्थ कमीत कमी खर्च रु. १०००/- शिवाय संपूर्ण गावास जेवण व दारू द्यावी लागते ती वेगळीच. हा अनावश्यक खर्च व दारू या दोन्ही विरूद्ध मोहीम उघडण्याचे भूमिसेनेने ठरवले मात्र येथे केवळ प्रचाराने काम भागणार नव्हते तर या परंपरांना फाटा देऊन काही लग्ने लावून दाखवणे भाग होते. दहा जोडपी अशा लग्नासाठी तयार झाली. दारू व गावजेवण यांना फाटा देण्यात आला आणि लग्नविधी थोडक्यात आटपला यामुळे खर्चात कपात झाली. सुरुवातीस विरोधही खूप झाला. 'याप्रकारे लग्ने

लावण्यास आपण काही भिकारी नाही ' असंही लोक म्हणू लागले. मात्र हा विरोध हळूहळू मावळला व अशी सामुदायिक लग्ने आदिवासींमध्ये लोकप्रिय होऊ लागली आहेत. अशा प्रसंगातून भूमिसेनेकडून नवीन कल्पनांचा प्रसार व शोषणाविरूद्ध प्रचार करण्यात येतो.

बांधील मजूर पद्धतीचे उच्चाटन करणारा कायदा २५ ऑक्टोबर १९७५ पासून अंमलात आला. मात्र त्याची अंमलबजावणी योग्य प्रकारे झाली नाही त्यामुळे भूमिसेनेने यात लक्ष घालण्याचे ठरवून ठाणे जिल्ह्यातील बांधील मजुरांची माहिती जमवून ती सरकारी अधिकाऱ्यांकडे दिली व बऱ्याच बांधील मजुरांची मुक्तता केली. ठाणे जिल्ह्यातील बांधील मजुरांची मुक्तता करण्याचे श्रेय निःसंशयपणे भूमिसेनेकडे जाते असे लेखकाने येथे आवर्जून नमूद केले आहे.

## भूमिपुत्र प्रतिष्ठानाशी सहकार्य

भूमिसेनेने आदिवासींना जमिनी तर परत मिळवून दिल्या परंतु एवढ्यानेच गरिबीचा प्रश्न सुटणारा नव्हता, या जमिनी पुन्हा सावकारांकडे जाणारच नाहीत अशी खात्री नव्हती. काळूरामला कळून चुकले होते की ज्या परिस्थितीत आदिवासींना सावकारांकडून कर्ज घेणे भाग पडते ती परिस्थिती बदलल्याशिवाय त्यांना भवितव्य नाही, यावर उपाय एकच होता तो म्हणजे अधिक चांगल्या प्रकारे शेतीची मशागत करून उत्पादन वाढवणे. आतापर्यंत शेतीची मशागत करण्याची पद्धती अगदीच प्राथमिक अवस्थेतील होती. या भागात शेतीचे प्रगत तंत्रज्ञान अजून पोहोचले नव्हते. पाणीपुरवठ्याच्या सोयीत वाढ करून अधिक उत्पादन मिळवणे शक्य होते. त्यामुळे आदिवासींच्या दारिद्र्य व शोषणावर उपाय सापडणे शक्य होते. मात्र यासाठी तंत्रज्ञानविषयक मार्गदर्शनाची आवश्यकता होती. ते कसे मिळवावे हा प्रश्न होता. हा प्रश्न लवकरच सुटला. आपल्या समाजवादी विचारांच्या मित्रांच्या सहाय्याने हे काम करावे असे काळुरामला वाटत होते. या कामासाठी आबा करमरकर तयार झाले. ते शेतीतज्ज्ञ होते व आपल्या व्यवसायातून निवृत्त होऊन त्यांनी कोंढाणला तळ ठोकण्याचे मान्य केले. पूर्वी ते समाजवादी पक्षाचे कार्यकर्ते होते. आबांनी विचार करून आपली योजना मांडली. आदिवासींचा झगडा दुहेरी स्वरूपाचा. एका बाजूस निसर्गाशी झगडून नैसर्गिक साधन संपत्तीचा उत्पादनवाढीसाठी वापर करणे आणि दुसऱ्या बाजूस मानवनिर्मिती सामाजिक, आर्थिक व्यवस्थेशी झगडा देऊन ती बदलण्यासाठी प्रयत्न करणे. दोन्ही झगडे सारखेच महत्त्वाचे, या झगड्यात यश मिळविण्यासाठी संघटित होणे. राष्ट्रीयकृत बँकाची मदत घेऊन, शेती उत्पादन वाढवणे, सरकारी योजना, कायदे यांच्या अंमलबजावणीसाठी दडपण आणून त्याचा फायदा पदरात पाडून घेणे आणि जुनाट, जाचक चालीरीती, अंधश्रद्धा इ. घालवण्यासाठी सामाजिक सुधारणांचा कार्यक्रम तरुण मंडळांच्यामार्फत हाती घेणे अशा अनेक प्रकारच्या आघाडींवर आपण झगडले पाहिजे हा विचार आबांनी मांडला. तो सर्वांना मान्य झाला. त्याप्रमाणे एकेका उपक्रमाची आखणी होऊन कार्यक्रम पार पाडण्यास सुरुवात झाली.

## सहकारी का अनुयायी

जास्तीत जास्त विहिरी खोदून जमिनीतील पाण्याचा जास्तीत-जास्त उपयोग करून घेण्याचे आबांनी ठरवले. विहिरीसाठी सरकार मदतही देत असे. आबांना हे दाखवून द्यायचे होते की विहिरीमुळे पाणीपुरवठ्याची चांगली सोय होईल. दामखिंड गावातील ६ शेतकरी कुटुंबांनी सुमारे २० एकर जमिनीत आबांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याचे ठरवले. या कुटुंबाचे उत्पन्न वाढले तर अधिक लोक या कार्यक्रमात सहभागी होतील असे आबांना वाटत होते. काळुराम व भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांचा पूर्ण पाठिंबा असल्यामुळे या ६ कुटुंबातील लोकांनी आबा सांगतील त्याप्रमाणे काम करण्यास मान्यता दिली. मात्र ते आबांचे या प्रयोगातील सहकारी न बनता मुके बिचारे अनुयायी बनले. मात्र आबांना आशा होती की आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा वापर करून युगायुगाचे दारिद्र्य व दुःखे यांचे निवारण करता येईल. या सर्व जमिनीला पाणीपुरवठा करण्यासाठी एक विहीर खोदण्यात आली. महाराष्ट्र बँकेने उत्पादनाच्या सर्व अवस्थांमध्ये पतपुरवठा करण्याचे मान्य केले. ६ कुटुंबांनी संपूर्ण वर्षभर रोजंदारीवर शेतावर काम करण्याचे मान्य केले. कराराप्रमाणे प्रत्येक कुटुंबाला प्रत्येक आठवड्याला ३० किलो गहू २ रु. रोख, १ वर्षासाठी कपड्यासाठी १५०–२०० रु. व

सणासाठी रु. ४० अशी मजुरी ठरली. आबांचा अंदाज होता की उत्पादन एवढे होईल की बँकेचे कर्जाचे हप्ते फेडून, मजुरी जाऊनही काही पुढील वर्षीच्या उत्पादनासाठी वापरता येईल पहिल्यावर्षी हा अंदाज खरा ठरला. पुढील वर्षी हीच पद्धत अवलंबण्यात आली. मात्र अनुकूल नैसर्गिक परिस्थिती असूनही उभ्या पिकाला कीड लागल्यामुळे उत्पादनात घट झाली. कामामध्येही ढिलाई आली. सभासद कामावर वारंवार गैरहजर राहू लागले. त्यांना बोलावणे पाठविल्यास एकतर ते दारू पिऊन तर्र झालेले अगर नुसते बसलेले आढळून येत. मजुरी मात्र त्यांना नियमितपणे मिळत होती. आबांचे मते पोटाची काळजी मिटल्यामळे काम न करण्याचा आनंद जे घेत होते. त्यांची मजुरी थांबवणे नाईलाजाने भाग पडले. ते आबांना दोष देऊ लागले. याचे परिणाम फार गंभीर झाले. उत्पादन घटले. कर्जाचे हप्ते फेडता आले नाहीत. १९७३ हे दुष्काळाचे वर्ष होते. यावर्षी उत्पादनात आणखी घट झाली. या अपयशाने न खचता आबांनी या प्रयोगाची व्याप्ती आणखी वाढविण्याचे ठरविले. शिस्तबद्ध व स्वावलंबी-रितीने काम करण्यास आदिवासी शिकतील अशी त्यांना आशा वाटत होती. यादृष्टीने भूमिसेनेचे कार्यकर्ते प्रयत्न करतील अशी त्यांची अपेक्षा होती. मात्र हळूहळू आबांच्या लक्षात आले की भूमिसेनेच्या कार्यकर्त्यांना या प्रकारच्या कामात रस नव्हता. १९७५–७६ मध्ये अशी परिस्थिती होती की हा प्रयोग निरुपयोगी वाटू लागला. सहाही सभासद आबांच्या नियंत्रणाबाहेर गेले. प्रत्येक सभासदामागे २–३ हजार रु. नुकसान झाले. पिकावरील कर्ज फेडणेसुद्धा अशक्य झाले.

## विकास कसा असतो कसा फसतो

आबा – काळूराम व भूमिपुत्र प्रतिष्ठान – भूमिसेना याच्या सहकार्यातील अपयशाची प्रमुख कारणे देशपांडे देतात ती ही की, या प्रयोगाची व्याप्ती वाढवण्याअगोदर सामुदायिक शेतीच्या प्रयोगाचे यशापयश जोखले गेले नाही. सहा सभासद कुटुंबांचा प्रतिसाद फारसा उत्साहवर्धक नव्हता. आपली सामाजिक-आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या एका प्रयोगात आपण सहभागी झालो आहोत याची जाण या सहा कुटुंबांना नव्हती. केवळ आपल्याला रोजगार मिळाला एवढेच त्यां वाटत होते. त्यांच्या दृष्टीने सावकार व आबा यात फारसा फरक नव्हता. फरक असलाच तर तो इतकाच होता की आबा उदार अंत:करणांचे सावकार होते. एक मजूर म्हणाला– ‘मला आबा व हाजीमिया यात काहीच फरक वाटला नाही.’

काळुराम व त्याच्या सहकाऱ्यांनी किमान वेतनासाठी लढा देण्यासाठी आदिवासींना संघटित केले होते. आबांच्या येण्यामुळे एक नवाच विकास कार्यक्रम आपण हातात घेतला आहे हे काळुरामच्या लक्षात आले नाही. या प्रयोगाच्या यशस्वीततेसाठी आदिवासींची सामाजिक सांस्कृतिक पार्श्वभूमी व त्यांचे भूतकाळातील अनुभव यांची खोलवर तपासणी आबा व काळुराम यांनी करणे आवश्यक होते. आदिवासींनी आपल्या दृष्टी-कोनात बदल केला पाहिजे हे कार्यकर्त्यांनी त्यांच्या मनावर ठसविले पाहिजे असे आबांनी काळुरामला सांगितले होते परंतु काळुरामला आबांचे म्हणणे एकतर समजले नाही व समजले असल्यास या कामात तो पूर्णपणे अयशस्वी झाला पण अशा कोणत्याही कार्यक्रमात आदिवासींना सहभागी करण्यापूर्वी त्यांचा दृष्टिकोन बदलणे म्हणजे काय, ते कसे करावे आणि ते योग्य आहे का? ह्या महत्त्वाच्या प्रश्नांना इथे वाचा फुटली नाही.

भूमिपुत्र प्रतिष्ठानाच्या सभासदांमध्ये आपापसात मतभेद होते व ते आदिवासींच्या व भूमिसेना कार्यकर्त्यांच्या लक्षात येण्याइतपत वाढले. प्रतिष्ठानचे कार्यकर्ते आदिवासींना ऐक्यभावना कायम ठेवून शोषणाविरुद्ध संघर्ष करण्याचे आवाहन करीत होते तर एकीकडे त्यांचे आपापसातील मतभेद आदिवासींना दिसत होते. या विकास कार्यक्रमाच्या अपयशामागे हेही एक कारण आहे.

या अपयशात संबंधित बँकेचाही वाटा होता आदिवासींना मदत करण्याचा बँकेचा निर्णय क्रांती-कारक व चाकोरीबाहेरचा असला तरी बँकेने या योजनेची काळजीपूर्वक तपासणी केली नाही. बँक अधिकाऱ्यांनी आबांच्या शब्दावर आंधळा विश्वास ठेवला. आदिवासींचा विशिष्ट सामाजिक-सांस्कृतिक संदर्भ त्यांच्या लक्षात आला नाही. कर्जदारांच्या

नावावर दिलेली कर्जे शेतकरी मंडळाने प्रत्यक्षात अधिक सभासदांमध्ये वाटली आहेत याची कल्पना असूनही बँकेने चाकोरीबद्ध कायदेशीर भाषेत मूळ कर्जदारांना नोटीसा काढल्या. आपणांस प्रत्यक्षात मिळालेल्या कर्जापेक्षा आपल्या नावापुढील कर्ज अधिक असल्याचे पाहून कर्जदार स्तंभित झाले. त्यांचा शेतकरी मंडळाच्या आर्थिक कारभारावरील विश्वास उडाला व पुढील कार्यक्रमातून त्यांनी अंग काढून घेतले.

आबांच्या भूमिसेनेकडून असलेल्या अपेक्षा अवाजवी व चुकीच्या ठरल्या. आपल्या आर्थिक कार्यक्रमाशी सुसंगत असा भूमिसेनेने आपला कार्यक्रम ठेवावा अशी आबांची अपेक्षा होती ती अवाजवी ठरली. भूमिसेनेचे नेतृत्व निर्विवादपणे काळुरामकडे होते. मात्र आबांच्या विकास कार्यक्रमामध्ये काळुरामकडे प्रत्यक्षात दुय्यम भूमिका आली. याचा प्रतिकूल परिणाम या विकास कार्यक्रमावर झाला.

सहकार्यांच्या या फसलेल्या प्रयोगामुळे भूमिसेना कार्यकर्त्यांत चर्चा सुरू झाली. आदिवासींचा विकास म्हणजे काय ? विकासाची प्रक्रिया म्हणजे काय ? आधुनिक तंत्रज्ञान व साधने यांचा विकास प्रक्रियेत स्थान काय ? बाहेरून येणारी मदत व पतपुरवठा आदिवासींनी स्वीकारावा का ? विकासाचे खरे फायदे कोणाला मिळतात ? असे अनेक प्रश्न कार्यकर्त्यांच्या मनात निर्माण झाले व त्यावर चिंतन व चर्चा झाली. हा प्रयोग पूर्णपणे फसला व त्याचे गंभीर परिणाम झाले यावर सर्व कार्यकर्त्यांचे एकमत झाले.

चर्चेनंतर निष्कर्ष असा निघाला की, बाहेरून मिळणाऱ्या मदतीवर अवलंबून असणारे विकासाचे प्रयत्न आदिवासीना अधिकच अडचणीत टाकतात, दारिद्रय व शोषणाच्या खाईत अधिकच गाडून टाकतात. आधुनिक साधने खरेदी करावी लागतात त्याचे उत्पादन संघटित उद्योगांकडून होते. जे किंमती ठरवितात. या साधनसामग्री खरेदी करण्याचा मोह आदिवासींना होतो. हंगामाच्या अखेरीस त्यांच्या लक्षात येते की अपेक्षेपेक्षा फारच कमी किंमत शेतमालास येते. उत्पादन प्रक्रियेत खर्च झालेली रक्कमही त्यातून निघत नाही. गरीब शेतकऱ्यांचे नुकसानच होते. गरीब आदिवासी मार्केट इकॉनॉमीमध्ये ओढला जातो मात्र त्यावर त्याचे नियंत्रण मुळीच नसते त्यामुळे मार्केट इकॉनॉमीचा बाहेरच्याकडून आदिवासींच्या शोषणाचे हत्यार म्हणून वापर होतो. जोवर मार्केट इकॉनॉमीवर नियंत्रण नाही तोवर आदिवासींनी त्यापासून दूर राहणेच श्रेयस्कर. परस्पर सहकार्य व स्वतः विकसित करू शकणारी साधनसामग्री या आधारेच ही पायरी गाठता येईल.

विकास प्रयत्नातून अंग काढून घेऊन संघटन व जाणीव जागृती यावर भर देण्याचे आता ठरविण्यात आले आहे. सावकार, व्यापारी यांचेकडून दारूच्या शोषणासाठी हत्यार म्हणून पद्धतशीरपणे वापर करण्यात येतो. आदिवासींच्या हातात पैसा खेळता असतो नेमकी तेव्हाच दारू उपलब्ध असते. दारुगुत्त्याचा मालक हा बहुधा कंत्राटदार, व्यापारी, सावकार यांचा बगलबच्चा असतो.

दारूप्रमाणेच लग्नसमारंभ हे सुद्धा शोषणाचे हत्यार म्हणूनच वापरण्यात येते. लग्नासाठी झालेल्या खर्चाचा बराचसा भाग सावकार, व्यापाऱ्याकडेच परत जातो. लग्नविधीसाठी लागणारे सामान तो उधार पुरवतो, चढे भाव लावतो, मालात फसवतो आणि नंतर कागदोपत्री फसवतो. अशा प्रकारे कर्ज म्हणून दिलेल्या रक्कमेपेक्षा कितीतरी अधिक रक्कम व्यापारी सावकार परत मिळवतो.

भूमिसेनेने गावोगाव तरुण मंडळे संघटित केली. मजुरांना संघटित करून किमान वेतन कायद्याच्या अंमलबजावणीसाठी त्यांना तयार केले. बेकायदेशीर सावकारी, जमीन हस्तांतर व बांधील मजूर पद्धती याविरुद्ध प्रामुख्याने आवाज उठवला. प्रस्थापितांचा अर्थातच खूप विरोध झाला. या विरोधामुळे आपल्या संघर्षाची राजकीय, सामाजिक व आर्थिक दिशा आदिवासींना समजली.

भूमिसेनेच्या मते सरकारची सध्याची धोरणे व नियोजन भांडवलशाहीच्या प्रगतीला पोषक आहे त्यामुळे अकुशल मजुरांचा वर्ग एवढेच स्थान आदिवासींना त्यात प्राप्त होईल. बरेचसे आदिवासी बेकार

राहतील. १९८० मध्ये आलेले वनविधेयक याच भांडवलशाहीधार्जिण्या धोरणाचे द्योतक होते. त्यामुळे आदिवासींना निसर्गसंपत्तीपासून वंचित करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असती. परिणामी स्वत:च्या श्रमाव्यतिरिक्त विकण्यासारखे काहीही त्यांचेकडे शिल्लक राहिले नसते. त्यांना उपयुक्त अशा साल, मोह या झाडांऐवजी निलगिरी, ल्युकेरिया यासारख्या औद्योगिक उपयोगांच्या झाडांची लागवड करण्याचा डाव होता. आदिवासींना स्वत:च्या संस्कृतीची जाण देऊनच या प्रवृत्तीचा सामना होऊ शकेल अशी भूमिसेनेची धारणा आहे. मानवी जीवनाचे आर्थिक व बिगर-आर्थिक असे कप्पे पडू शकत नाहीत. उदा. बांधील मजुरांची सोडवणूक केवळ आर्थिक फायद्यासाठी नसून त्याची मुळे समाजव्यवस्थेत आहेत. यासाठी गावोगाव तरुण मंडळे संघटित करून त्याद्वारे सामाजिक शिक्षण दिले जाते. किमान वेतनाच्या प्रश्नावर आदिवासी, बिगर आदिवासी जात, पोटजमातीची कृत्रिम कुंपणे नाहीशी होतात. स्त्री-पुरुष समानता, सहकार्याची जीवनपद्धती, घरोघर व ग्रामसंस्थांमध्ये लोकशाहीचा प्रसार इत्यादी मूल्यांची शिकवणूक देण्यात येते. भूमिसेनेमध्ये स्त्रीया मोकळेपणाने बोलतात, चर्चा करतात. पोलिस, वनरक्षक व सरकारी अधिकारी यांचा आदिवासी स्त्रियांनी यशस्वीपणे सामना केल्याची उदाहरणे आहेत. समानतेवर आधारित शोषणमुक्त समाजाची निर्मिती हे भूमिसेनेचे ईप्सित आहे.

## निष्कर्ष

या विवेचनाच्या शेवटी लेखकाने काही निष्कर्ष मांडले आहेत. आदिवासी विकासाचे ईप्सित आदिवासींना राष्ट्रीय जीवनाच्या मुख्य प्रवाहात आणणे हे आहे. समाज समानतेच्या तत्त्वावर आधारित असेल तरच हे साध्य होईल. समाजापासून आदिवासींना वेगळे ठेवण्याचे समर्थन कोणी करणार नाही मात्र समानतेवर आधारित समाजव्यवस्था दृष्टीपथात नाही किंबहुना आपण त्यापासून दूर चाललो आहोत की काय असे वाटते. ईप्सित समाजव्यवस्थेचा तपशील आताच ठरविणे शक्य नाही मात्र एवढे खात्रीने म्हणता येईल की समाजामध्ये इतरांप्रमाणेच आदिवासींनाही समान दर्जाचे म्हणून मिसळता यावे. राष्ट्रीय साधनसामग्रीचे समान फायदे आदिवासींनाही मिळावेत. सर्वसाधारण विकासाची दिशा ही असली तरी हजारो वर्षे आदिवासींचे शोषण झालेले असल्याने त्यांना विशेष मदतीची गरज आहे. केवळ यापुढे शोषण बंद करणे एवढेच पुरेसे नसून सावकार, व्यापारी व इतर बिगर आदिवासींनी लाटलेली जमीन व इतर हक्क आदिवासींना परत मिळाले पाहिजेत. जमीन हस्तांतर कायद्याची रीतसर अंमलबजावणी व्हायला हवी. केवळ जमीन मिळणे पुरेसे नाही तर जमीन सुधारणेस मदत, पाणी पुरवठ्याच्या सोयी, शेतीतंत्राचे आधुनिकीकरण, कृषि उत्पादनाची योग्य भावात खरेदी-विक्री व्यवस्था होणे आवश्यक आहे. सर्व विकास योजना व रोजगार निर्मिती योजना याचसाठी राबवल्या गेल्या पाहिजेत तरच विकास जलदगतीने होऊ शकेल.

परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये आदिवासी व गरीबांचे संघटन व सावकार, व्यापारी यांचेपासून त्यांची मुक्तता करण्यासाठी जागृती करणे आवश्यक आहे तसेच गरीबांनी आपली उपजीविकेची साधने स्वत:च निर्माण करणे जरुर आहे. ही कामे सरकारी अधिकाऱ्यांकडून होतील अशी अपेक्षा करणेच चुकीचे आहे. भूमिसेनेसारख्या ध्येयवादी संघटनेची गरज आहे ती येथेच. असे जनजागरण गट उस्फूर्तपणे पुढे येतात त्यांचे यश नेतृत्वाचे चातुर्य आणि धाडसावर अवलंबून आहे. ठाणे जिल्ह्याची ही जंगलपट्टी प्रथम किसान सभेचे व नंतर काळुरामचे नेतृत्व मिळण्यात सुदैवी ठरली. मात्र भूमिसेनेसारख्या संघटनेने आपल्या कार्याचे सतत सिंहावलोकन व मूल्यमापन करून आपल्या पद्धती व तंत्रे सुधारली पाहिजेत. भूमिसेनेच्या कार्याची दिशा बरोबर असली तरी पल्ला लांबचा आहे. बाहेरून मदत करणाऱ्यांनी जनजागरण गटांची भूमिका व कार्य लक्षात घेऊन ते अधिक प्रभावी कसे होईल यादृष्टीने योग्य प्रकारे मदत केली पाहिजे.

प्रा. देवदत्त दाभोळकरांची मननीय प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. कृतीसाठी जागृती व प्रगतीसाठी कृती या दोन प्रवाहाची सांगड घालण्याचा प्रयत्न आबा व काळुराम यांनी केला परंतु तो अयशस्वी

झाला. असे असले तरीही शेवटचा यशस्वी प्रयोग हा अगोदरच्या कित्येक अयशस्वी प्रयोगांच्या खांद्यावरच उभा असतो, हा केवळ आशावाद नाही तर कोणत्याही शास्त्रीय अन्वेषणाची ती पद्धत आहे. या दृष्टीने या प्रयोगाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. त्याच बरोबर अशा प्रयोगाचा सखोल अभ्यासही महत्त्वाचा आहे. या प्रयोगाचे महत्त्व सांगताना प्रा. दाभोळकर लिहितात "भारतात किती ठिकाणी असे आबा व काळुराम आहेत ?" त्याहीपुढे जाऊन म्हणता येईल की परिवर्तनाच्या अशा प्रयोगांचा अभ्यास, चिंतन करणारे देशपांडे-दाभोळकर कितीसे आहेत ? आबा-काळुराम आणि देशपांडे-दाभोळकर यांच्या गुणाकारातच समाज परिवर्तनाच्या चळवळीचे यश सामावलेले नाही का ?

**– सुधीर जोग**

केळकर म्युझियम शुक्रवार पेठ, पुणे

---

१. स्ट्रगल ऑफ दि डिप्राईव्हड फॉर डेव्हलपमेंट

२. आदिवासीज् ऑफ ठाणे

डॉ. वसंत देशपांडे

दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे

जानेवारी १९८५

पृष्ठे १२२ मूल्य रु. ४५

०००

# बंद दरवाजा मासिक – स्वागत !

उपरा व बंद दरवाजा ह्या लक्ष्मण मानेंच्या दोन पुस्तकांनी भटक्या विमुक्त समाजाला सर्वांपुढं आणलं. पण हे काम इथचं थांबू नये तर ह्या समाजाला भेडसावणारे निरनिराळे दैनंदिन प्रश्न, त्यांना वाचा फोडायला हवी, शासनाच्या निरनिराळ्या योजना ज्यांच्यापर्यंत कधी पोचतच नाहीत, त्यांना माहिती व्हावी म्हणून 'बंद दरवाजा' हे मासिक नव्यानेच सुरू झाले आहे. भटक्या विमुक्तांच्या चळवळीचे मुखपत्र असलेल्या ह्या मासिकाचे संपादक लक्ष्मण माने आहेत.

ह्या मासिकाचा पहिला अंक भटक्या विमुक्तांच्या अधिवेशनाच्या निमित्ताने स्मरणिका स्वरुपात प्रसिद्ध झाला. ह्या अंकात भटक्या विमुक्त विकास महामंडळासंबंधी त्यावेळी विधान परिषदेत झालेल्या चर्चेची माहिती दिली आहे.

मासिकाच्या दुसऱ्या, मार्च ८५ च्या अंकात मुखपृष्ठावर प्रा. बा. ह. कल्याणकर यांची 'यांच्या जिंदगानीचा हिसाब कुठाय' ही कविता तसेच सोलापूर अधिवेशनात झालेले ठराव, अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. शंकरराव खरात यांच्या भाषणाचा गोषवारा व बंद दरवाजा ह्या पुस्तकातच माधव कर्वे यांनी केलेले परीक्षण व एक्स गुन्हेगार जमाती ह्या श्री. मोतीराम राठोड यांच्या पुस्तकाचे श्री. म. य. दळवी, कार्यकारी संपादक, दैनिक लोकमत, औरंगाबाद यांनी केलेले परीक्षण प्रसिद्ध झालेले आहे. संपादकीयात सम्यक् परिवर्तनाची बांधिलकी मान्य करून संपादकांनी भटक्यांच्या संघटनेची आवश्यकता व्यक्त केलेली आहे व भटक्या विमुक्तांना नाकारलेले मनुष्यत्व, त्यांना पुन्हा मिळावे म्हणून 'बंद दरवाजा' आपल्या समोर येत असल्याचे म्हटले आहे.

हाकारा व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद बंद दरवाजाचे स्वागत करीत आहे. परिवर्तनाच्या ह्या लढाईत हाकारा नेहमीच सहकार्य करील अशी ग्वाही देऊन बंद दरवाजाला शुभेच्छा व्यक्त करीत आहे.

**बंद दरवाजा**

**संपादक : लक्ष्मण माने**

**४४४ मंगळवार पेठ, सातारा–४१५ ००२.**

**वार्षिक वर्गणी २५ रुपये.**

**५ वर्षाची आगाऊ वर्गणी १०० रुपये.**

०००

# भूमिसेना सामुदायिक लग्न समारंभ १९८५



आली! आली! बधवनी आली! मोऱ्हक्या वऱ्हाडी सुद्धा! साखर सोपारी! दारू ताडी! बधवनी झाली पक्की!

चला लग्नाच्या तयारीला लागा, धवलरी गवसा, सावकारहो गवसा!! वाजंत्र्याला विडा! झुंजणारा भगत गवसा, सौदा बांधा अन मुल्हारी आनाय मानस पाठवा!

फाटी आना, भात भरडा, तांदूळ सडा! आली रे आली घाणे हळदी आळी, वाजंत्री आली, गाजगोंगाट सुरू झाला बिसरे दिसा मांडव पडला, नाचणारं आलं, पिणारे हो आलं, चौथ्या दिसी बाशिंग झालं. नवरा चालला नवरी आनायं, पाचव्या दिसी आली, आता मांडव उसकाल.

हळद आपली सुकली नाही! सावकारी धमकी सुरू! लागा कामाला! लग्न केलं थाटात, तुम्ही दोघे मजेत, सारी खुशी सावकाराची आणि गुलामगिरी जन्माची, कहाणी अशी लग्नगड्याची, आदिवासीच्या जगण्याची, पणज्यानं केला, आज्यानं केला, जुना रिती-रिवाज असडून द्या! नवा विचार केला पाहिजे.

आपण सारे गरीब, सावकारी जुलमाला विटलो, परत नको लग्न घरोघरी.



**विवाहाचे ठिकाण :**

**सफाळा—मराठीशाळेचे पटांगण**

**रविवार दिनांक २४ फेब्रुवारी १९८५**

**दुपारी २ वाजता**



**भूमिसेना ऑफिस मनोर येथे नावे नोंदवा**

**नवरा नवरीचा संसार सुखाचा।**
**विजय कुणाचा? कष्टकऱ्यांचा॥**

**विशेष सूचना :**

१) नवरा नवरीने स्वतःचा पोशाख आणावा.
२) लग्नापूर्वी किंवा नंतर कोणत्याही प्रकारचा फालतू खर्च किंवा कर्जाची गुलामी करणार नाही ही शपथ घेणे.
३) प्रत्येक जोडप्याने रुपये ४०/– वर्गणी भूमिसेनेकडे जमा करावी व अर्ज भरावा.
४) लग्नात दारू पिऊन येऊ नये.
५) लग्ने भूमिसेना पद्धतीने होतील.
६) जास्त माहितीकरिता भूमिसेना कचेरीत चौकशी करावी.

**झाली एकी पक्की सामुदायिक लग्न नक्की!** **भूमिसेना झिंदाबाद!**

**(भूमिसेनेच्या सामूहिक विवाहाचे प्रचारपत्रक)**

संस्था परिचय

# लोकजागृतीसाठी जाणीव संघटना

## स्थापना

आपण समाजासाठी काही तरी केलं पाहिजे, काय करायचं; काय करता येईल, अशा विचारांनी अस्वस्थ झालेले तरुण तरुणी एकत्र आले व त्यांच्या चर्चांमधून 'जाणीव' संघटना अस्तित्वात आली. त्यामुळे 'जाणीव' च्या स्थापनेचा नेमका दिवस सांगता येत नाही. १९८१ च्या उत्तरार्धातील ही घटना. म्हणून 'जाणीव' ने आपला स्थापना दिन २६ जानेवारी १९८२ हा मानला आहे.

## ध्येयधोरणे व उद्दिष्टे :

दारिद्र्यात पिचत पडलेल्या, गतानुगतिक, कालबाह्य परंपरांमध्ये अडकलेल्या, स्थितिशील आणि अगतिक समाजामध्ये संपूर्ण परिवर्तन घडविणे हे 'जाणीव' चे अंतिम ध्येय आहे.

'जाणीव' चा कोणत्याही राजकीय पक्षाशी व निवडणुकीच्या राजकारणाशी संबंध नाही.

लोकांमध्ये जागृती निर्माण करावी. त्यांना त्यांच्या पायावर उभे करावे व त्यांच्याच साह्याने त्यांचा विकास साधावा असे 'जाणीव' ला वाटते.

'जाणीव' ला प्रस्थापित झालेली सध्याची कोणतीच विचारसरणी परिपूर्ण वाटत नाही. मार्क्सवाद व गांधीवाद या दोन स्वल्पविरामानंतर कोणता विराम सापडेल याचा शोध घेत 'जाणीव' ची वाटचाल चालू आहे.

समाजातले आर्थिक व सामाजिक दृष्टीने उपेक्षित असलेले जे घटक आहेत त्यांच्याबद्दल 'जाणीव' ला पोटतिडीक आहे. म्हणून दलित, भटके व विमुक्त आदिवासी, शहरी झोपडपट्ट्यातील लोक, सर्व स्तरातील स्त्रिया, आर्थिकदृष्ट्या मागास अशा सर्व समाजघटकांना प्राधान्य देऊन 'जाणीव' ने काम करायचे ठरवले आहे. शहरी व ग्रामीण अशा दोन्ही विभागात काम करण्याची गरज आहे. उगवत्या पिढीवर सामाजिकतेचे संस्कार झाले तर पुढील काळातील अडचणी कमी होतील म्हणून सर्व स्तरांतील मुलांमध्येदेखील काम करावे असे 'जाणीव'ला वाटते.

आर्थिक प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करणे, विकास साधणे व धीरे धीरे परिवर्तन साधणे यावर 'जाणीव'चा विश्वास आहे. आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक अशा स्वरूपाचे हे काम आहे; लोकांचे मन परिवर्तनासाठी उत्सुक बनवणे हे खरे शैक्षणिक कार्य आहे, असे 'जाणीव'ला वाटते. विधायक व रचनात्मक कामे करता करता वाटेत जे अडथळे येतील ते सर्व ताकदी-निशी पार केले पाहिजेत व तसे ते करता येतील असा 'जाणीव'ला विश्वास आहे.

आधुनिक विज्ञान व वैज्ञानिकता हा 'जाणीव' परिवर्तनाचा आधार समजते.

'जाणीव' संघटनेला सध्या जरी पुण्यातील एक छोटासा गट असे स्वरूप असले तरी काही काळात महाराष्ट्रभर व नंतर देशभर ही परिवर्तनाची चळवळ नेण्याचा 'जाणीव' प्रयत्न करणार आहे.

**कार्य :**

वरोल ध्येयधोरणे लक्षात घेऊन 'जाणीव'ने कामे हाती घेतली आहे.

**१. गोसावी वस्ती सर्वांगीण विकास प्रकल्प :**

पुणे खडकवासला रस्त्यावर नांदेड गावाजवळील 'गोसावी' या भटक्या लोकांच्या वस्तीत काम सुरू केले आहे. कर्जमुक्ती, वेठबिगार मुक्ती, व्यवसाय सुस्थिरता, बालवाडी, प्रौढशिक्षण वर्ग, तरुण मंडळ, महिला मंडळ ही सर्व कामे सुरू आहेत. लवकरच त्यांच्यासाठी सहकारी गृहबांधणी संस्था स्थापन होऊन घर, वीज, रस्ता हे प्रश्न सोडविले जातील.

**२. परित्यक्ता स्त्रियांचे आर्थिकदृष्टचा पुनर्वसन :**

शिवणे व कोरेगावभीमा ही दोन गावे निवडून तेथील परित्यक्ता स्त्रियांची माहिती गोळा करून त्यांचे आर्थिकदृष्टचा पुनर्वसन कसे करता येईल, त्याचा प्रयत्न सुरू आहे.

**३. अभिरुची वर्ग :**

आर्थिकदृष्टचा दुर्बल घटकातील मुलांचा व्यक्तिमत्व विकास साधावा म्हणून अशा वर्गातील इयत्ता ८ वी व ९ वी मधील मुलांसाठी शनिवार-रविवार अभिरुची वर्ग चालवले जातात. खेळ, गाणी, गोष्टी, प्रसंगनाटचे, चित्रकला, कवितावाचन, कथाकथन इत्यादी कार्यक्रम घेतले जातात. वर्षातून दोनदा मुलांसाठी शिबिरे घेतली जातात. दोन वर्षे महानगरपालिकेच्या शाळांसाठी हे वर्ग चालवले गेले. गेल्या वर्षीपासून पुणे विद्यार्थी गृहाच्या ज्ञानेश्वर वसतिगृहातील मुलांसाठी व दापोडीच्या विवेकानंद विद्यालयातील मुलांसाठी हे वर्ग चालवले जात आहेत.

**४. विज्ञान छंद मंडळ :**

मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा व स्वतःच्या लहान सहान कृतींचा सामाजिक संदर्भातला व्यापक अर्थ ध्यानी यावा या दृष्टिकोनातून विज्ञान छंद मंडळ गेल्या वर्षी अस्तित्वात आले. इयत्ता ८ वी मधील कनिष्ठ मध्यमवर्गातील ८ मुले सांगवी येथे नूतन शिरसाट यांच्या घरी जमतात. तिथेच प्रयोगशाळा आहे. मुले स्वतः प्रयोग करतात, शास्त्रीय खेळ खेळतात, विज्ञानाचा दैनंदिन जीवनातील उपयोग शिकतात, शास्त्रशुद्ध विचार करायला शिकतात, टाकाऊ साहित्यापासून शास्त्रीय उपकरणे तयार करतात. पुणे जिल्हा विज्ञान प्रदर्शनात या मुलांनी १४ उपकरणे मांडली होती. सध्या अंधश्रद्धा दूर करण्याच्या दृष्टीने एक वैज्ञानिक कार्यक्रम करण्याची तयारी चालू आहे.

**५. कलापथक :**

लोकांमध्ये सामाजिक समस्यांवर जागृती साधावी म्हणून 'जाणीव'च्या कलापथकाने गाणी व पथनाटच बसवली आहेत. रस्ते, निरनिराळचा वस्त्या व शिबिरे अशा ठिकाणी लोकसमूहांमध्ये कलापथकाने सुमारे शंभर कार्यक्रम सादर केले आहेत. लोकांचा या कार्यक्रमास चांगला प्रतिसाद मिळतो.



६. अभ्यासवर्ग :

गेल्या वर्षीपासून 'जाणीव' ने अभ्यासवर्ग सुरू केला आहे. विविध सामाजिक प्रश्न, सनातन समस्या व तात्कालिक प्रश्न, विविध विचारसरणी यांवर या अभ्यासवर्गात अभ्यास होतो. पुस्तिकांचे वाचन व चर्चा ह्या मार्गांनी अभ्यास केला जातो. आपण अभ्यास केलेल्या विषयांवर जाहीर सभा आयोजित करून लोकांनाही या प्रबोधनात सामील करून घ्यावे, असा 'जाणीव' चा विचार आहे. "हुंडा" या विषयावर असा जाहीर कार्यक्रम आयोजित केला होता. हळूहळू अभ्यासवर्गातून एक 'मुक्त विद्यापीठ' निर्माण व्हावे अशी इच्छा आहे.

७. जागती पहाणी :

स्त्रियांवरील व दलितांवरील अत्याचारांच्या ज्या बातम्या वृत्तपत्रात येतात. त्यांची कात्रणे गोळा करून त्यांचा खरेखोटापणा तपासून पाहणे व त्यातल्या ज्या अत्याचाराच्या निवारणासाठी काम करता येईल, तिथे काम करणे असाही एक कार्यक्रम हाती घेतला आहे.

८. फेरीवाल्यांची संघटना :

पुण्यातील फेरीवाले, हातगाडीवाले, पथारीवाले यांची संघटना बांधण्याच्या कामास नुकताच प्रारंभ केला आहे. याशिवाय –

झोपडपट्टीतील भंगार गोळा करणाऱ्यांची सहकारी सोसायटी तयार करणे, आदिवासींच्या जमिनींचे प्रश्न सोडवणे व बेरोजगारांची (शहरी व ग्रामीण आणि शिक्षित व अशिक्षित) संघटना बांधणे असे कार्यक्रम यापुढील काळात करण्यासाठी आखलेले आहेत.

## नैमित्तिक कामे :

'जाणीव' ने आत्तापर्यंत काही नैमित्तिक कामेही केलेली आहेत. किरकटवाडी येथील आगग्रस्त झोपडपट्टीवासियांना भांडी, कपडे यांची मदत, गोसावी वस्तीतील शेणखताचा प्रश्न सोडविण्यासाठी जमीनदारांविरुद्ध कायदेशीर इलाज व लोकसभा निवडणुकांच्या वेळी मतदारांच्या जागृतीसाठी 'मतदारांचा जाहीरनामा' असे काही कार्यक्रम संघटनेने पार पाडलेले आहेत.

## आर्थिक तरतूद :

संघटनेजवळ पैसा नाही. नेहमीच्या कार्यक्रमांसाठी संघटनेचे सभासद व हितचिंतक स्वेच्छेने वर्गणी देतात. विशेष कार्यक्रमांसाठी लोकांकडून देणग्या गोळा केल्या जातात. आवश्यकतेनुसार बँका व शासनाच्या विशेष सोयी यांचा लाभ घेण्याचा विचार आहे.

## सभासदत्व :

'जाणीव'चे सभासद कोणालाही होता येते. स्त्री–पुरुष, लहान–मोठे असे कोणीही सभासद होऊ शकते. परंतु जो प्रत्यक्ष काम करतो त्यालाच 'जाणीव' सभासद मानते. केवळ आर्थिक साह्य देणाऱ्यांना सहानुभूतीदार मानले जाते.

## निवडणुका :

दर दोन वर्षांनी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुका होतात. कोणीही सभासद निवडणुकीला उभा राहू शकतो. मतदानाचा अधिकार फक्त सभासदांनाच आहे.

## आवाहन :

प्रत्यक्ष काम, अर्थसाह्य, अन्य विविध वस्तूरूप साह्य ह्याप्रकारे आपण 'जाणीव'ला साह्य करू शकता.

समाजपरिवर्तनाच्या कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा आपल्याला लाभो, हीच इच्छा.

## कार्याची जबाबदारी :

अध्यक्ष – श्री. सुभाष तगारे

कार्यवाह – श्रीमती नूतन शिरसाट

खजिनदार – श्री. ज्ञानेश्वर जाधव

**संघटनेचा पत्ता**

द्वारा श्री. विलास चाफेकर
अ/१ पुणे विद्यापीठ हौसिंग सोसायटी
कर्वेनगर, पुणे ४११०२९

# भटक्या विमुक्त जाती संघटना महाराष्ट्र

## २ फेब्रुवारी ८५ रोजी सोलापूर अधिवेशनात मंजूर झालेले ठराव

**ठराव क्र. १ :**

ठराविक जमातीतील माणसे जन्मतः गुन्हेगार किंवा भिकारी असतात या समजुतीमुळे होणाऱ्या अन्याय अत्याचारापासून त्यांची सुटका होण्यासाठी त्यांच्या संरक्षणाचा स्वतंत्र कायदा करावा.

**ठराव क्र. २ :**

शासकीय दप्तरात दाखवलेली भटक्या विमुक्तांची लोकसंख्या चुकीची आहे. त्यांची खास पहाणी करून लोकसंख्या ठरवावी.

**ठराव क्र. ३ :**

आदिवासींसाठी केलेल्या उपयोजनेच्या धर्तीवर भटक्या विमुक्तांच्या सर्वांगीण विकासासाठी स्वतंत्र उपयोजना आखावी. पुरेशा "बजेटची" तरतूद व्हावी.

**ठराव क्र. ४ :**

भटक्या विमुक्त जमातीमध्ये आजपर्यंत एक टक्का लोकसुद्धा साक्षर नाहीत. त्यांचे अज्ञान, दारिद्रय, भटकी प्रवृत्ती, गुन्हेगारी वृत्ती व शिक्षणाची नावड लक्षात घेऊन त्यांच्या ५ ते १६ वर्षांच्या मुलांना उपजीविकेच्या जबाबदारीसह ताब्यात घेऊन त्यांना सक्तीचे व मोफत शिक्षण द्यावे. त्यांच्यावर चांगले संस्कार होतील, त्यांच्या शिक्षणाचा दर्जा उच्च असेल असे वातावरण असलेल्या आश्रमशाळा, निवासीशाळा शासनाने सुरू कराव्यात.

**ठराव क्र. ५ :**

विमुक्त भटक्या जमातीच्या आश्रमशाळा व पोस्ट बेसिक आश्रमशाळांना मिळणाऱ्या निरनिराळ्या बाबींवरील अनुदानात वाढ करण्यात यावी.

**ठराव क्र. ६ :**

आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १-४-१९७६ पासून भोळे वेतनश्रेणी लागू करण्यात यावी.

**ठराव क्र. ७ :**

भटक्या जमातीचे निकष लागू असलेल्या जमातींच्या शासकीय यादीत गणना व्हावी. भटक्यांच्या गरीब गरजुंना जमातीचे प्रमाणपत्र सहज व सुलभरित्या मिळावे, खोटे प्रमाणपत्र सादर करून गैरफायदा घेणाऱ्याना पायबंद बसावा म्हणून समिती नेमावी.

**ठराव क्र. ८ :**

वसंतराव नाईक भटक्या विमुक्त जमाती विकास महामंडळाचे तात्काळ जिल्हा व तालुका पातळीवर कार्यालये सुरू करावीत.

**ठराव क्र. ९ :**

राखीव जागांच्या नियमांची चोख अंमलबजावणी करावी.

**ठराव क्र. १० :**

खाजगी कारखान्यात भटक्या विमुक्तांना राखीव जागा ठेवण्याचा नियम सरकार करू शकत नसले तरी शिफारस जरूर करता येते. म्हणून प्रत्येक जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांनी जिल्ह्यातल्या सर्व कारखानदारांची संयुक्त बैठक बोलावून त्यांच्या कारखान्यात भटक्या विमुक्त जमातींच्या योग्य उमेदवारास प्राधान्य देण्याचे आवाहन करावे.

**ठराव क्र. ११ :**

महाराष्ट्रात भटक्या विमुक्तांची लोकसंख्या सुमारे साठ लाख आहे. विस्कळीत असल्यामुळे गठ्ठा मतांच्या जोरावर त्यांची राजकीय शक्ती निर्माण होऊ शकत नाही. हा समाज त्यामुळे सत्तेपासून वंचित राहिलेला आहे. म्हणून विधानसभा ते ग्रामपंचायतीपर्यंतच्या सर्व स्तरावर होणाऱ्या निवडणुकांमध्ये सर्व राजकीय पक्षांनी त्यांच्या लोकसंख्याच्या प्रमाणात त्यांना प्रतिनिधित्व देणे आवश्यक आहे. शिवाय प्रत्येक शासकीय मंडळावर व प्रत्येक समितीवर भटक्याविमुक्तांना योग्य प्रतिनिधित्व द्यावे.

**ठराव क्र. १२ :**

भटक्या विमुक्त जमाती आजही आदिम अवस्थेत जीवंत आहेत. आदिवासींना व अस्पृश्यांना लागू असलेले निकष त्यांना पण लागू आहेत. त्यांचाही खास अभ्यास व खास विचार होणे आवश्यक आहे, असा लोकुर कमिटीचा अहवाल आहे. काकासाहेब कालेलकर कमिशननेसुद्धा या जमाती अत्यंत मागासलेल्या आहेत असा अहवाल दिलेला आहे. राष्ट्रीय पातळीवर या जमातीचा नीट अभ्यास झालेला नाही. त्याच्यासाठी एक निश्चित स्वरूपाचे धोरण स्वीकारलेले दिसत नाही. यांच्यापैकी अनेक जमाती निरनिराळ्या राज्यात निरनिराळ्या यादीत आहेत. सर्वसाधारण समाजापासून अलिप्त, प्राचीन लक्षणे, सामाजिक अप्रतिष्ठा, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण इतर समाजात मिळण्याबाबत भय व न्यूनगंड हे यांचे निकष आहेत. या जमातींना आदिवासींच्या यादीत समावेश करावा किंवा यांची तिसरी सूची निर्माण करून त्यांना केंद्र शासनाच्या सवलती द्याव्यात.

**ठराव क्र. १३ :**

राज्य शासनाच्या १९६० सालाच्या अंदाजाप्रमाणे भटक्या विमुक्तांची लोकसंख्या चार टक्के आहे. १९६० नंतर आजपर्यंत अनेक नवीन जमाती व तत्सम जमातींचा समावेश यादीत केल्यामुळे निश्चितच त्यांच्या लोकसंख्येचे प्रमाण वाढलेले आहे. राखीव जागा लोकसंख्येच्या प्रमाणात ठेवण्याचा संकेत शासनाने स्वीकारलेला आहे. म्हणून वाढीव लोकसंख्या लक्षात घेऊन शासनाने



तात्काळ भटक्या विमुक्तांच्या राखीव जागेच्या टक्केवारीत चार ऐवजी आठ टक्के एवढी वाढ करावी.

**ठराव क्रमांक १४ :**

भटक्या जमातींना स्थिर करणे हे शासनाचे प्रथम ध्येय होय. म्हणून राज्यात जेथे जेथे भटक्या विमुक्त जमातीच्या लोकांनी शेतजमिनी किंवा घरासाठी जागा घेतलेल्या आहेत त्या जागा दुसऱ्या कोणत्याही कारणासाठी सरकारने ताब्यात घेऊ नयेत.

**ठराव क्र. १५ :**

शासनाच्या नियमाप्रमाणे बेघरांची यादी तलाठी व सरपंचाच्या शिफारशीप्रमाणे केली जाते. अमूक गावचा बेघर माणूस म्हणवून घ्यायचे असेल तर तो माणूस त्या गावचा रहिवासी असला पाहिजे. एखाद्या गावचा रहिवासी त्यालाच म्हटले जाते जो गेल्या तीन वर्षांपासून सतत त्या गावात रहात आहे. या व्याख्येमुळे भटक्या जमातींच्या लोकांची बेघरांच्या यादीत नोंदच होत नाही. दारिद्र्य रेषेखालच्या यादीबाबतही याच अडचणी आहेत. तिथे जातपात वशिला–भ्रष्टाचार या सर्व गोष्टींचा प्रभाव पडून केवळ भटके विमुक्त वगळले जातात असा अनुभव आहे. संघटनेच्या संपर्कातून हे स्पष्ट झाले आहे की, दारिद्र्य रेषेखाली असलेल्या ९०% लोकांची शासनाच्या यादीत नोंदच झालेली नाही.

**ठराव क्र. १६ :**

ब्रिटिश सरकारने १९७१ साली पास केलेल्या कायद्याने अस्तित्वात आलेल्या तार कंपौंड (सेटलमेंट कॉलनी) ची मालमत्ता जतन करण्यासाठी वेगळ्या मंडळाची स्थापना व्हावी.

(‘बंद दरवाजा’ च्या सौजन्याने)



# संवाद

प्रिय संपादक त्रैमासिक 'हाकारा' यांस स. न. वि. वि.

स्त्री विशेषांक दर्जेदार वाटला. या अंकात आदिवासी स्त्री च्या जीवनाविषयी सांस्कृतिक, आर्थिक आणि सामाजिक जाणिवांची बरीच दखल घेतल्याचं आढळलं. ज्यांनी खऱ्या अर्थाने लिहावयाला पाहिजे ते लिहित नाहीत याची खंत मनाला डिवचत असते. या अंकातील 'आदिवासी संस्कृतीत स्त्रियांचे स्थान,' व 'सामाजिक चळवळीत स्त्रियांचा सहभाग' हे दोन्ही वाहरू सोनवणेंचे लेख पोषक वाटलेत. सर्व लेखातून आदिवासी स्त्रियांचे समाजातील (प्रगतीशील) स्थान कुठे आहे हे निश्चित कळून येते. अशाच प्रकारे आदिवासींची वैचारिक स्थिती सुधारण्यास व योग्य स्थान मिळवून देण्यास 'हाकारा' नेहमी प्रयत्नशील राहील ही अपेक्षा.

आपला,
**सुभाष आडे**
वणी

(२)

संपादक 'हाकारा'

सादर प्रणाम.

जानेवारी महिन्यात भिलई येथे वनवासी कल्याण आश्रमातर्फे अखिल भारतीय वनवासी व नागरी महिला कार्यकर्त्यांचे संमेलन होते. त्याला जाण्याचा योग आला. २३ राज्यांतून आलेल्या ५०० नागरी व ६३० वनवासी कार्यकर्त्यांच्या व्यापावरून या कामाचे स्वरूप किती भव्य आहे हे कळत होते. तिथे रण-रागिणी नागाराणी गायडेनस्यू यांचा परिचय करून दिला गेला. वयाच्या १६ व्या वर्षापासून नागालँडच्या स्वातंत्र्याकरता ब्रिटीश सरकारशी आणि नागालँडमध्ये धर्मप्रसार करून नागालँड दुभंगू पाहणाऱ्या शक्तींशी लढली. आता वय वर्षे सत्तर. धर्मांतर हे राष्ट्रांतर मानते. माझ्यासारख्या सामान्य महाराष्ट्रीय गृहिणीला हा प्रश्न एवढ्या तीव्रतेने कधीच जाणवला नव्हता आणि आता जाणवला. पण मागासलेपण, शिक्षण, दारिद्र्य, अंधश्रद्धा, सामाजिकदृष्ट्या स्त्रियांचे प्रश्न लग्न, मुले, नवऱ्याचा दारुबाजपणा, सामाजिक रूढी; या सर्वांशी लढा कसा लढणार?

या संमेलनाच्या निमित्ताने एक जाणवले की वनवासी स्त्री, अगदी मातृसत्ताक पद्धतीमुळे नव्हे, पण त्या समाजाची फार मोठी शक्ती आहे. वनवासी समाजात उभ्या राहिलेल्या अनेक आंदोलनात स्त्रीच उभी राहिलेली आहे. ही स्त्री जागृत झाली तर शोषण थांबविता येईल.

आता वाटायला लागले, आपण आपुलकीने वनात जाऊ या. वेदना समजून घेऊ या. प्रश्न समजणे म्हणजे उत्तर नव्हे. पण प्रश्न तर समजू द्या.

**— शुभदा दत्तात्रय नाईक**
नाशिक

# हाकारा–लेखनसूची १९८४

## 'हाकारा' सतरावा जानेवारी–जून १९८४ 'आदिवासी स्वयंसेवी कार्य' खास विभाग

| | |
|---|---|
| आदिवासींचा राजकीय पक्षांकडून इंधनासारखा वापर | सविता तारे |
| चुकत चुकत शिकायला मिळत | प्रदीप गायकवाड |
| जंगल, आदिवासी आणि धरण | मोहन हिराबाई हिरालाल |
| अस्मिता जागृतीचा कार्यक्रम | प्रमोद करंदीकर |
| भूमिसेना व काळुरामची हकिकत | वसंत देशपांडे |
| हळबांच्या सवलती आणि आदिवासींचा विकास | मदन धक्कर |
| आदिवासी सेवा व मसूद प्रकरण– | |
| आदिवासींसाठीं स्वतंत्र न्याययंत्रणेची गरज | उल्हास देसाई |
| पारंपारिक आरोग्य पद्धती | आर. पी. पालेकर |
| ग्रामसेवक कसा हवा ? | नानासाहेब ठकार |
| धर्मांतर झाले पण विचारक्रांती नाही : 'अवतरण' | ना. ग. गोरे |
| म्हैसाळ प्रयोगाचे मूल्यमापन : पुस्तक परिक्षण | सुषमा सोनक |
| आदिवासी विकास, शासन आणि स्वयंसेवी संस्था | शरद कुलकर्णी |
| शोषणमुक्त समाज स्थापण्याचा प्रयत्न | शोभा मुळे |
| चला आपून बघायाला | प्रदीप गायकवाड |
| इंचमपल्ली धरणास विरोध करावा | बाबा आमटे |
| पुस्तक परिक्षण : जागतो संयमी जिथे (नानासाहेब ठकार) | सुधीर जोग |
| भौतिकी मानवशास्त्र (प्रा. वि. श्री. कुलकर्णी) | बाबूल पठाण |
| संस्था परिचय : विकास भारती | सुधीर जोग |

## 'हाकारा' अठरावा जुलै–सप्टेंबर १९८४ आदिवासी स्त्री खास विभाग

| | |
|---|---|
| गिरीजा | अनुताई वाघ |
| राजकीय व सामाजिक आघाडीवर ठाकर महिला | नान्सी गायकवाड |
| आदिवासी स्त्रियांचे आरोग्य | सु. ल. काटे व जॉन गायकवाड |

| | |
|---|---|
| कविता | संघजा मेश्राम |
| आदिवासी संस्कृतीत स्त्रियांचे स्थान | वाहरू सोनवणे |
| सामाजिक चळवळीत स्त्रियांचा सहभाग | वाहरू सोनवणे |
| आदिवासी मुलींचे शिक्षण | वि. द. पटवर्धन |
| आदिवासी स्त्रिया आणि शिक्षण | जॉन गायकवाड |
| स्त्रीत्व आणि पुरुषत्व यांची नव्याने ओळख करून घेण्याचा यत्न–'अवतरण' | सुधीर बेडेकर |
| कोकणी स्त्री | अनसूया भोये |
| पिण्याच्या पाण्यासाठी | प्रदीप गायकवाड |
| स्त्री मुक्तीचा संकुचित दृष्टीकोन | |
| आदिवासी विकासाकरिता हवे आहे शिक्षण व दळणवळण | ज्ञानेश्वर गाजरे |
| पुस्तक परिक्षण–आभरान | रमाकांत रामचंद्र |
| संस्था परिचय–कष्टकरी महिलांची 'सेवा' | शरद कुलकर्णी |


**'हाकारा' एकोणिसावा ऑक्टोबर–डिसेंबर १९८४ 'आरोग्य व शिक्षण' खास विभाग**

| | |
|---|---|
| वैदू: परंपरागत आरोग्य व्यवस्था | मोहन मुत्यलवार |
| वैदूंच्या मुलाखती | शुभदा देशमुख |
| स्त्री आरोग्यप्रबोधनविषयक चल शिबीर | शैलजा देवगावकर |
| मागासवर्गीय मुलांच्या शिक्षणातील अडचणी | मॅक्सिन बर्गसन |
| आदिवासी मुलांसाठी अनौपचारिक शिक्षण प्रकल्प | कमल पाध्ये |
| आदिवासी बोलीभाषा प्रकल्प | सुनीता जोशी |
| आदिवासी भागातील औषधी वनस्पती | रमेश नानल |
| कविता | भुजंग मेश्राम |
| कायदेशीर हस्तांतरित जमिनी | शरद कुलकर्णी |
| आश्रमशाळांच्या सुधारणेसाठी शिफारसी | पुरुषोत्तम शिरसाळकर |
| पुस्तक परिक्षण : बंद दरवाजा (लक्ष्मण माने) | रमाकांत रामचंद्र |
| वैद्यकसत्ता (आनंद नाडकर्णी) | सुषमा सोनक |
| पाठ परिवर्तनाचे | सुधीर जोग |
| संस्था परिचय–राजमाची ग्रामसहाय्य योजना | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 'हाकारा' | पहिला, जानेवारी-मार्च | १९८० | – | जबरन जोत जंगल जमीन |
| 'हाकारा' | दुसरा, एप्रिल-जून | १९८० | – | आदिवासी व शिक्षण |
| 'हाकारा' | तिसरा, जुलै-सप्टेंबर | १९८० | – | आदिवासी व वनसंवर्धन |
| 'हाकारा' | चौथा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८० | – | आदिवासी साहित्य व कला |
| 'हाकारा' | पाचवा, जानेवारी-मार्च | १९८१ | – | दलितांना सवलती व राखीव जागा माहिती |
| 'हाकारा' | सहावा, एप्रिल-जून | १९८१ | – | आदिवासी व आरोग्य |
| 'हाकारा' | सातवा, जुलै-सप्टेंबर | १९८१ | – | वनशेती व वनसंवर्धन |
| 'हाकारा' | आठवा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८१ | – | रोजगार हमी योजना |
| 'हाकारा' | नववा, जानेवारी-मार्च | १९८२ | – | उत्तरा खंड अभ्यास मोहिम |
| 'हाकारा' | दहावा, एप्रिल-जून | १९८२ | – | धरणे व विकास |
| 'हाकारा' | अकरा-बारा, जुलै-डिसेंबर | १९८२ | – | जंगल व्यवस्थापन |
| 'हाकारा' | तेरावा, जानेवारी-मार्च | १९८३ | – | आदिवासी व दारू |
| 'हाकारा' | चौदावा, एप्रिल-जून | १९८३ | – | आदिवासींच्या सामाजिक/राजकीय चळवळी |
| 'हाकारा' | पंधरावा, जुलै-सप्टेंबर | १९८३ | – | प्रा. सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य |
| 'हाकारा' | सोळावा, ऑक्टोबर-डिसेंबर | १९८३ | – | आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न |
| 'हाकारा' | सतरावा, जानेवारी-जून | १९८४ | – | आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य |
| 'हाकारा' | अठरावा, जुलै-सप्टेंबर | १९८४ | – | आदिवासी स्त्री |
| 'हाकारा' | एकोणीसावा, ऑक्टो.-डिसें. | १९८४ | – | आदिवासींचे आरोग्य व शिक्षण |

Registered with the Registrar of News Papers for India Under No. 35835/80

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

(१) आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन.
(२) कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण.
(३) शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.
(४) मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यतः आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.
(५) मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या सर्व उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशांचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**–: मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व :–**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २०० रुपये |
| परिषद वार्षिक सभासद | २० रुपये |
| आदिवासी कार्यकर्ते सभासद | १५ रुपये |

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' ( द महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अँथ्रापॉलॉजिकल सायन्सेस ) यांचे नावे पाठवावी. चेक पाठविल्यास अधिक दोन रुपयांची वटणावळ पाठवावी. मनिऑर्डर पाठविल्यास फॉर्मभागे कृपया आपले नाव व पूर्ण पत्ता लिहावा.

---

• पत्रव्यवहाराचा पत्ता •

**रा. के. मुटाटकर,** सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४/३ आनंद पार्क, औंध, पुणे–४११ ००७.

---

❋ आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे ! ❋